Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

वर्ष ३४, अंक २३३, **५ रुपये**, शहर आवृत्ती

सहदैनिकासह पृष्ठे १८

पुणे, मंगळवार, ३० नोव्हेंबर २०२१

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

LOKSATTA.COM FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS

| तापमान | कमाल | किमान |
|---|---|---|
| | २८.१° से | १२.४° से |

**हवामानाचा अंदाज**

आकाश दुपारनंतर सामान्यतः ढगाळ राहून मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता.



क्रीडा
भारताचा विजय निसटला!

# शाळा उद्यापासूनच!

## मुलांना टप्प्याटप्प्याने प्रवेश; शिक्षण विभागाच्या मार्गदर्शक सूचना

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** करोनाच्या ओमायक्रॉन या उत्परिवर्तित विषाणूमुळे राज्यातील प्राथमिक शाळा बुधवार, १ डिसेंबरपासून सुरू करण्याबाबत वेगवेगळे मतप्रवाह असले तरी शाळा नियोजित तारखेनुसारच सुरू होणार असल्याचे शिक्षण विभागाने सोमवारी स्पष्ट केले. याबाबत आरोग्य विभागापाठोपाठ शिक्षण विभागानेही मार्गदर्शक सूचनाही प्रसृत केल्या असून, गर्दी टाळण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना आखण्याचे निर्देश शाळांना दिले आहेत.

सध्या राज्यातील ग्रामीण भागांत पाचवी ते बारावी आणि शहरी भागांत आठवी ते बारावीच्या शाळा सुरू आहेत. आता १ डिसेंबरपासून पहिलीपासूनचे सर्व वर्ग सुरू करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने जाहीर केला होता. आरोग्य विभागाने आणि डॉक्टरांच्या कृतिगटाने त्यास मंजुरी दिली होती. मात्र, ओमायक्रॉनच्या भीतीमुळे प्राथमिक शाळा सुरू करायच्या की नाही, असा प्रश्न निर्माण झाला.

ओमायक्रॉनचा प्रसार वेगाने होतो. लहान मुलांचे लसीकरण झालेले नाही. नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले, तरी शाळांचे दररोज निर्जंतुकीकरण करावे लागेल. सुरक्षित *(पान २ वर)*



**मुंबईतील शाळांबाबत संभ्रम**

**राज्यातील शाळा सुरू होणार असल्या तरी मुंबईत पहिलीपासूनचे सर्व वर्ग सुरू होणार का, याबाबत अद्यापही संभ्रम आहे. पालिका क्षेत्रातील शाळा सुरू करण्याबाबत आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल आणि त्यानंतर निर्णय जाहीर करण्यात येईल, अशी भूमिका शिक्षणाधिकाऱ्यांनी विभागाच्या बैठकीत घेतल्याचे समजते आहे.**

### मंत्रिमंडळ बैठकीत ओमायक्रॉनबाबत चिंता

मुंबई : ओमायक्रॉन विषाणूच्या धोक्याबाबत चिंता व्यक्त करत सोमवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत करोनास्थितीबाबत चर्चा करण्यात आली. परदेशातून येणाऱ्या प्रवाशांबाबत सतर्क राहण्याची सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. १० नोव्हेंबरपासून दक्षिण आफ्रिकेतून एक हजाराच्या आसपास प्रवासी मुंबईत आले असून, त्यांच्याशी संपर्क साधला जात असल्याचे पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

### जगाला सज्ज राहण्याचा 'डब्ल्यूएचओ'चा इशारा

संयुक्त राष्ट्रे : 'ओमायक्रॉन' हा अन्य करोना विषाणूंच्या तुलनेत अधिक संसर्गजन्य किंवा घातक असल्याचे अद्याप स्पष्ट झालेले नाही, परंतु त्याचा फैलाव जगभर वेगाने होण्याची शक्यता आहे, अशी भीती व्यक्त करीत जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) जगाला सज्ज राहण्याचा इशारा दिला आहे. 'ओमायक्रॉन'ने मृत्यू झाल्याची नोंद नाही. परंतु आधीचा संसर्ग त्याचबरोबर लशीमुळे निर्माण झालेल्या रोगप्रतिकारकशक्तीला तो कसा प्रतिसाद देतो, याचा अभ्यास करण्याची गरज आहे, असे 'डब्ल्यूएचओ'ने म्हटले आहे. दरम्यान, आतापर्यंत १३ देशांमध्ये 'ओमायक्रॉन'चे रुग्ण आढळले आहेत.

# राज्यसभेतील विरोधी पक्षांचे १२ खासदार निलंबित

## शिवसेनेचे अनिल देसाई, प्रियंका चतुर्वेदी यांचा समावेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनात बेशिस्त वर्तन केल्याच्या कारणास्तव विरोधी पक्षांच्या राज्यसभेतील १२ खासदारांना हिवाळी अधिवेशनच्या पहिल्याच दिवशी, सोमवारी निलंबित करण्यात आले. त्यात शिवसेनेचे अनिल देसाई, प्रियंका चतुर्वेदी यांचा समावेश आहे. विरोधी पक्षांनी या कारवाईचा निषेध केला आहे.

काँग्रेसचे सहा, तृणमूल काँग्रेसचे दोन आणि भाकप-माकपच्या प्रत्येकी एका खासदाराला निलंबित करण्यात आले आहे. निलंबित खासदारांना संपूर्ण हिवाळी अधिवेशनातील कामकाजात सहभागी होता येणार नाही.

कृषी कायदे रद्द करण्याचे विधेयक संमत झाल्यानंतर, राज्यसभेचे कामकाज अर्ध्या तासासाठी तहकूब करण्यात आले. कामकाज सुरू होताच, केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी खासदारांच्या निलंबनाचा ठराव मांडला आणि उपसभापती हरिवंश यांनी तातडीने आवाजी मतदानाने तो मंजूरही केला.

खासदारांनी अभूतपूर्व गैरवर्तन, अवमानकारक कृती, हिंसक आणि बेशिस्त वर्तन केले. त्याचबरोबर सुरक्षा कर्मचाऱ्यांवर हेतुपुरस्सर हल्ले केले, असे संसदीय कामकाजमंत्र्यांनी मांडलेल्या निलंबन प्रस्तावात म्हटले आहे.

अचानक झालेल्या या कारवाईमुळे विरोधी पक्षांचे सदस्य अवाक झाले होते. प्रस्ताव *(पान २ वर)*



### वादग्रस्त कृषी कायदे संसदेत रद्द

नवी दिल्ली : गेल्या वर्षभरापासून शेतकरी ज्यांच्या विरोधात आंदोलन करत आहेत, ते तीन वादग्रस्त कृषी कायदे रद्द करणारे विधेयक संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, सोमवारी दोन्ही सभागृहांत चर्चेशिवाय आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. कृषी कायदे रद्द करणारे विधेयक केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी लोकसभेत मांडले. या विधेयकावर चर्चा करण्यात यावी, अशी मागणी विरोधकांनी केली, परंतु ते चर्चेविना मंजूर करण्यात आले.

केंद्र सरकारची चर्चेतून पळवाट ! / पान १६

# जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या सदस्य संख्येत वाढ

## मंत्रिमंडळाचा निर्णय; हिवाळी अधिवेशनात विधेयक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील महानगरपालिकांमधील नगरसेवकांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य सरकारने आता राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितींमधील सदस्यांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील जिल्हा परिषद सदस्यांची एकूण संख्या दोन हजारांवरून २२४८ तर पंचायत समिती सदस्यांची संख्या चार हजारांवरून ४४९६ होईल. याबाबतचे विधेयक विधिमंडळाच्या २२ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात मांडले जाईल.


लोकसंख्येनुसार राज्यातील महापालिकांमधील नगरसेवकांची संख्या वाढवण्याचा निर्णय महिनाभरापूर्वी राज्य मंत्रिमंडळाने घेतला होता. त्याच धर्तीवर आता जिल्हा परिषदेच्या सदस्यांची संख्या वाढवण्यात येत आहे. सध्या राज्यातील जिल्हा परिषद सदस्यांची संख्या लोकसंख्येनुसार कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ७५ आहे. सोमवारी मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ९ (१) मध्ये सुधारणा करून जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीतकमी ५५ व जास्तीत जास्त ८५ करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य निवडणूक आयोग, जिल्ह्याातील निर्वाचक गटांतून थेट निवडणुकीद्वारे *(पान २ वर)*

### जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ



**मुंबई : महानगरपालिका, नगर परिषद, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लढविणाऱ्या व्यक्तींना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी १२ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय सोमवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संदर्भातील वटहुकूम राज्यपालांच्या मान्यतेने काढण्यात येईल.** -सविस्तर/पान २

# पाऊस, थंडीसह उन्हाचा चटकाही



**पुणे :** यंदाचा नोव्हेंबर लहरी हवामानाचा उत्तम नमुना ठरला. या एकाच महिन्यात नागरिकांना तीनही ऋतूंची अनुभूती मिळाली. प्रत्येक आठवड्याला हवामानात झपाट्याने बदल झाले. कमी दाबाच्या पट्ट्यांमुळे पाऊस, कोरड्या हवामानामुळे उन्हाचा चटका आणि उत्तरेकडील थंड वाऱ्यांमुळे हलक्या थंडीचाही अनुभव नागरिकांनी घेतला. ढगाळ हवामानामुळे दिवसाच्या कमाल तापमानात मोठ्या प्रमाणावर वाढ होत नसल्याने 'ऑक्टोबर हीट'चा कालावधी यंदाही लुप्त झाला होता. **वृत्त...४**

एन ई सी सी
नॅशनल एग कोऑर्डिनेशन कमिटी
Vencobb
एन. ई. सी. सी. आणि व्हेनकॉब प्रकाशित करीत आहे अंड्यांचे आणि ब्रॉयलर चिकनचे आजचे दर
एक्स् फार्म ब्रॉयलर चिकनचा दर*
८३ रु. प्रति किलो
किरकोळ विक्रीचा दर*
जिवंत कोंबडी
१११ रु. प्रति किलो
ड्रेस्ड (स्किनसह) दर*
१३६ रु. प्रति किलो
अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर*
६४ रु. प्रति डझन
ग्राहकांच्या हितासाठी

नवीन आकडेवारी तसेच राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या नवीन अभ्यासक्रमानुसार
भगीरथ प्रकाशन पुणे
श्री रंजन कोळंबे लिखीत
भारतीय अर्थव्यवस्था
सुधारीत चौदावी आवृत्ती
BY RANJAN KOLAMBE
25 नोव्हेंबर पासून उपलब्ध
9970298197 / 9090906777

**काय चाललंय काय !**

प्रशांत कुलकर्णी




गोंधळ, सभात्याग, तहकूब, निलंबन वगैरे शब्द आता ऐकू आले ! लोकशाही वाचवण्याचं काम बहुधा सुरू झालं असावं !!

▪ अग्रलेख ▪
सुधारणांचा सहजमार्ग!

लोकसत्ता सहज बोलता बोलता
ग्रॅंडमास्टर अभिजित कुंटे यांच्याशी वेबसंवाद - पान ४

## पराग अग्रवाल ट्विटरचे 'सीईओ'

**सॅन फ्रॅन्सिस्को :** ट्विटर या समाजमाध्यम मंचाचे सहसंस्थापक जॅक डॉर्सी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पदावरून लवकरच पायउतार होणार आहेत. त्यांचे उत्तराधिकारी म्हणून ट्विटरचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी (सीटीओ) पराग अग्रवाल यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे कंपनीने सोमवारी जाहीर केले.



पराग अग्रवाल हे आयआयटी, मुंबईचे माजी विद्यार्थी आहेत. ते २०११पासून कंपनीच्या सेवेत आहेत. २०१७ मध्ये त्यांची कंपनीचे 'सीटीओ' म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. जॅक डॉर्सी सीईओपदाचा राजीनामा देणार असले तरी कंपनीच्या संचालक मंडळावर मुदत संपेपर्यंत म्हणजे २०२२ पर्यंत राहणार आहेत. अग्रवाल यांनी जॅक आणि संपूर्ण चमूबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारे ट्वीट केले. जग आपल्याकडे पूर्वीपेक्षाही अधिक अपेक्षेने पाहत आहे. आपण ती अपेक्षापूर्ती करूया, असे अग्रवाल यांनी म्हटले आहे. जागतिक तंत्रज्ञानविषयक कंपन्यांच्या 'सीईओ'पदी अनेक भारतीय विराजमान आहेत. मायक्रोसॉफ्टचे सत्य नडेला, गुगलचे सुंदर पिचई, 'आयबीएम'चे अरविंद कृष्ण, 'अ‍ॅडोब'चे शंतनू नारायण यांच्यापाठोपाठ अग्रवाल यांचेही नाव या यादीत समाविष्ट झाले आहे.

## विधिमंडळ अधिवेशन २२ ते २८ डिसेंबरदरम्यान

**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन २२ ते २८ डिसेंबरदरम्यान मुंबईत होणार आहे. अधिवेशनाचा कालावधी कमी ठेवल्याबद्दल विरोधकांनी टीका केली असून, अधिक वेळ देण्याची मागणी केली.

विको
— विश्वसनीय आयुर्वेद —
१९५२ पासून
Go natural आयुर्वेदिक औषधी
"मी रोज रात्री लावते विको टर्मरिक क्रीम"
यात आहेत हळद आणि चंदनाचे गुण
हे त्वचेला रात्री रिपेअर करुन, सकाळपर्यंत हेल्दी बनवितात.




यामधील हळद आणि चंदनाचे गुण हे त्वचेला रिपेअर करतात आणि सकाळपर्यंत हेल्दी बनवितात. म्हणूनच तर स्ट्रेसमुळे होणारे पिंपल्स, डार्क सर्कल्स आणि एजिंग तुम्हाला चेहऱ्यावर दिसत नाहीत. तुम्हीसुद्धा रोज रात्री वापरा, विको टर्मरिक स्कीन क्रीम आणि **स्वदेशी आयुर्वेदाच्या** सोबतीने उजळत रहा.
त्वचेला द्या हेल्दी चमक
संपूर्ण स्वदेशी
सर्व मेडिकल स्टोअर्स मध्ये उपलब्ध
www.viccolabs.com • Like us on /ViccoLabs • Shop online at www.viccoestore.com • Customer Care Cell No. 0712-2420890

सगळ्यात आधी लाइफ इन्शुरन्स




आकर्षक लाभांसह आयुर्विमा सुरक्षा

| पॉलिसीची मुदत | प्रीमियम भरण्याची मुदत |
|---|---|
| 16 | 10 |
| 21 | 15 |
| 25 | 16 |

एलआयसीचा जीवन लाभ
लिमिटेड प्रीमियम एंडॉवमेंट प्लॅन
Plan No.: 936 UIN No.: 512N304V02

- किमान मूळ विमा रक्कम : ₹200,000/-
- कमाल मूळ विमा रक्कम : कोणतीही मर्यादा नाही
- प्रवेशाच्या वेळचे किमान वय : 8 वर्षे
- प्रवेशाच्या वेळचे कमाल वय : 25/21/16 वर्षांच्या पॉलिसी मुदतीसाठी 50/54/59 वर्षे

आपल्या एजंट/शाखेशी संपर्क साधा किंवा www.licindia.in ह्या आमच्या वेबसाइटला भेट द्या किंवा 56767474 वर तुमच्या शहराचे नाव SMS करा.
Follow us : LIC India Forever
IRDAI Regn No.: 512
भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय कोणत्याही पॉलिसीजची विक्री, बोनस घोषित करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक करणे यासारख्या कामकाजात सहभागी होत नाही. अशा प्रकारचे कॉल्स स्वीकारणाऱ्या जनतेस पोलीसात तक्रार करण्याची विनंती करण्यात येत आहे.
LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
LIC/AR/19-20/31/MAR
विक्री व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी जोखमीचे घटक, अटी आणि शर्ती ह्याबाबतच्या अधिक तपशीलवार माहितीसाठी कृपया सेल्स ब्रोशर काळजीपूर्वक वाचा.
जीवनासोबतही, जीवनानंतरही.

## विनोद तावडे यांची पंतप्रधानांशी चर्चा

**मुंबई :** भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्यावर विनोद तावडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोमवारी भेट घेतली. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रीय स्तरावर प्रभावीपणे काम करण्याबाबत तावडे यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून राजकीय व संघटनात्मकदृष्ट्या अनेक अपेक्षा पक्षाला तुमच्याकडून आहेत, असे मोदी यांनी तावडे यांना सांगितले. तुमच्या राजकीय जीवनामध्ये मिळालेली जबाबदारी ही एक मोठी संधी असून त्याचे तुम्ही सोने कराल, असा विश्वास मोदी यांनी तावडे यांच्याशी बोलताना व्यक्त केला.

## मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाची जबाबदारी ही केंद्र सरकारची

**मुंबई :** मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गाची जबाबदारी ही केंद्र सरकारची असून महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी जागा संपादित करणे, ती हस्तांतरित करणे आणि कामावर देखरेख ठेवणे ही कामेच केवळ राज्य सरकारच्या अखत्यारीत येत असल्याचा दावा राज्य सरकारतर्फे सोमवारी उच्च न्यायालयात करण्यात आला. चौपदरीकरणाच्या कामादरम्यान महामार्गावर पडलेले खड्डे न्यायालयाच्या आदेशानुसार बुजविण्यात आले आहेत व आता केवळ तीन किमीहून अधिक रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम अद्याप शिल्लक असल्याचा दावाही सरकारतर्फे महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी न्यायालयात केला.

## चूकभूल

सोमवार, २९ नोव्हेंबरच्या 'अर्थ वृत्तान्त'मधील 'गोष्ट रिझव्‍‌र्ह बँकेची' या सदरातील लेखात, मोहन दांतवाला यांच्या ऐवजी डॉ. राम मनोहर लोहिया यांचे छायाचित्र अनवधानाने प्रसिद्ध झाले.

## दिनदर्शिका

**मंगळवार, ३० नोव्हेंबर २०२१**
भारतीय सौर ९ अग्रहायण शके १९४३. मिती कार्तिक कृष्णपक्ष तिथी एकादशी उ.रा. : ०२ : १४ पर्यंत
नक्षत्र : हस्त : २०:३४
चंद्र - कन्या
**मेष** - व्यवहार जपून करा.
**वृषभ** - मुलांमध्ये गुंतून राहाल.
**मिथुन** - चिकाटीने कामे कराल.
**कर्क** - कुटुंबाचे प्रोत्साहन मिळेल.
**सिंह** - काटकसर जमेल.
**कन्या** - दिवस उत्साहाचा.
**तूळ** - नियोजन करा.
**वृश्चिक** - नात्यांत वाढ होईल.
**धनू** - घराची डागडुजी कराल.
**मकर** - परिवाराचे सुख मिळेल.
**कुंभ** - अतिउत्साह टाळा.
**मीन** - मिळतेजुळते घ्याल.
**शुभ राशी - वृषभ, वृश्चिक**

# मंत्रिमंडळात करोनाबाबत चिंता

## दक्षिण आफ्रिकेतून हजारभर प्रवासी मुंबईत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** करोनाच्या ओमायक्रॉन विषाणूच्या धोक्याबाबत चिंता व्यक्त करत सोमवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत या विषाणूचा संसर्ग रोखण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. परदेशातून येणाऱ्या प्रवाशांबाबत सतर्क राहण्याच्या व त्यांच्यावर प्रशासन लक्ष ठेवत असल्याबाबत काळजी घेण्याची गरज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली. तर १० नोव्हेंबरपासून दक्षिण आफ्रिकेतून एक हजाराच्या आसपास प्रवासी मुंबईत आले असून त्यांच्याशी संपर्क साधला जात असल्याचे पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी राज्यातील पोलीस व प्रशासकीय अधिकाऱ्यांसह झालेल्या करोनाबाबतच्या बैठकीची माहिती



मंत्रिमंडळ बैठकीत दिली. ज्या देशांमध्ये पुन्हा एकदा करोनाचा उद्रेक झाला आहे तेथील लाट मोठी असून फ्रान्स, जर्मनी, नेदरलँड, ऑस्ट्रिया या देशांमध्ये दररोज ३० हजारांपेक्षा जास्त लोकांना करोनाची लागण होत असल्याचे आढळले आहे. ओमायक्रॉन विषाणूचे ५० पेक्षा अधिक जास्त उत्परिवर्तन आहेत. सध्याच्या आरटीपीसीआर चाचणीत या प्रकाराची लागण असल्यास एस जिन आढळणार नाही. सध्या तरी प्रतिबंधासाठी मुखपट्टी सर्वात जास्त आवश्यक आहे. केंद्र सरकारने १२ देशांतल्या प्रवाशांची तेथून विमानात बसण्यापूर्वी ७२ तास अगोदर आरटीपीसीआर चाचणी आवश्यक केली असून उतरल्यावर परत एकदा आरटीपीसीआर चाचणी बंधनकारक केली आहे. तसेच ७ दिवसांसाठी विलगीकरण आवश्यक आहे, असे मुख्यमंत्र्यांनी बैठकीत सांगितले.

१० नोव्हेंबरपासून दक्षिण आफ्रिकेतून एक हजाराच्या आसपास प्रवासी मुंबईत आले आहेत. आतापर्यंत जे लोक आले त्यांची माहिती राज्य सरकारने मिळवली आहे. जे मुंबईत आहेत त्यांना महापालिकेकडून संपर्क साधला जात आहे.

याशिवाय परदेशातून गेल्या १० दिवसांत परत आलेल्या सर्वांशी संपर्क साधून त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली जात असल्याचे आदित्य ठाकरे यांनी नंतर सांगितले. तसेच परदेशातून येणाऱ्या प्रवासी-रुग्णांसाठी संस्थात्मक विलगीकरणाची व्यवस्था केली जात असल्याचेही ठाकरे म्हणाले.

**पंतप्रधानांकडे मागणी**

परदेशातून येणारे प्रवासी थेट मुंबईत किंवा महाराष्ट्रातील इतर विमानतळांवर न उतरता देशात इतरत्र उतरून नंतर देशांतर्गत विमान सेवेने किंवा रस्ते आणि रेल्वेमार्गे आल्यास त्यांची तपासणी कशी करणार हा सध्याचा प्रश्न असून पंतप्रधानांनादेखील यासंदर्भात माहिती द्यावी यावर मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाली. तसेच देशभरातील आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत विमानसेवांनी प्रवाशांची माहिती नियमितपणे एकमेकांना दिल्यास रुग्ण प्रवासी तसेच त्यांच्या संपर्कातील प्रवासी शोधणे सोपे जाईल असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बैठकीत सांगितले.

### शाळा सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे

# मुलांना टप्प्याटप्प्याने शाळांमध्ये प्रवेश

**मुंबई :** शाळा सुरू करताना गर्दी होऊ नये म्हणून खबरदारीचे उपाय योजण्याची सूचना शिक्षण विभागाने शाळांना केली आहे. यानुसार मुलांना टप्प्याटप्प्याने शाळांमध्ये बोलिवण्यात यावे तसेच शिक्षकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून प्रवास करू नये, अशी खबरदारी घेण्यास सांगण्यात आले आहे.

राज्यात येत्या बुधवारपासून पहिलीपासूनच्या शाळा सुरू करण्यास शालेय शिक्षण विभागाने मान्यता दिली असून यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सर्व शाळांनी या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी केले आहे.

शिक्षण खात्याने परिपत्रक सोमवारी जारी केले आहे. शाळा सुरू करण्यापूर्वी आरोग्य, स्वच्छता आणि इतर सुरक्षाविषयक उपाययोजनांना प्राधान्य देण्यात आले आहे. या



मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे करोना लसीकरण (दोन्ही लसी) बंधनकारक असून त्यांनाच शाळा व कार्यालयामध्ये प्रवेश देण्यात यावा. विद्यार्थ्यांचे नाक व तोंड मुखपट्टीने पूर्णतः झाकलेले असले पाहिजे, याबाबत विद्यार्थ्यांना सातत्याने सांगावे.

शाळेतील परिपाठ, स्नेह संमेलन व इतर गर्दीचे कार्यक्रम अथवा एकमेकांशी संपर्क होईल, अशा कार्यक्रमांच्या आयोजनावर कडक निर्बंध असतील. शिक्षक-पालक बैठका देखील शक्यतो ऑनलाइन घ्याव्यात. शाळेत हात धुण्यासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वर्गामध्ये एका बाकावर एक विद्यार्थी याप्रमाणे बैठकव्यवस्था असावी. विद्यार्थ्यांनी शाळेत उपस्थित राहण्यापूर्वी त्यांच्या पालकांची संमती आवश्यक असणार आहे.

शाळा सुरू करण्यापूर्वी त्या गावातील करोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला असावा. पालकांना शाळांच्या आवारात परवानगी देण्यात येऊ नये. एका वर्गात जास्तीत जास्त १५ ते २० विद्यार्थी असावेत. शाळेतील एखादा विद्यार्थी करोनाग्रस्त आढळल्यास तात्काळ शाळा बंद करण्याची सूचना करण्यात आली आहे. शिक्षकांची गावांमध्येच शक्यतो मुक्कामाची व्यवस्था करावी. शिक्षकांकडून शक्यतो सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे. १ तारखेला शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी स्वागत करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्याची सूचना करण्यात आली आहे.

### राखीव जागांवरील उमेदवारांना दिलासा

# जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** महानगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लढविणाऱ्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी १२ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय सोमवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संदर्भातील वटहुकूम राज्यपालांच्या मान्यतेने काढण्यात येईल.

महानगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका राखीव जागांवर लढवू इच्छिणाऱ्या व्यक्तींना नामनिर्देशन पत्रासोबत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागते. पण इतक्या मोठ्या प्रमाणातील उमेदवारांना कमी वेळेत जात वैधता प्रमाणपत्र मिळणे शक्य नसल्याची व्यावहारिक अडचण लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. तसेच जात पडताळणी समितीमधील कामकाज वेगाने व्हावे यासाठी तेथील रिक्तपदे डिसेंबरअखेरपर्यंत भरण्याचा निर्णयही घेण्यात आला.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या दिनांकापूर्वी ज्या व्यक्तीने आपल्या जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केला असेल परंतु नामनिर्देशन पत्र भरण्याच्या दिनांकाला त्या व्यक्तीस वैधता प्रमाणपत्र मिळाले नसेल अशी व्यक्ती ती निवडून आल्याचे घोषित झाल्यापासून १२ महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे हमीपत्र देईल. त्यात कसूर झाल्यास त्या व्यक्तीची निवड रद्द करण्यात यावी अशी तरतूद देखील करण्यास आज मान्यता देण्यात आली.

# राज्यसभेतील विरोधी पक्षांचे १२ खासदार निलंबित



*(पान १ वरून)*

संमत झाल्यावर उपसभापतींनी सभागृह दिवसभरासाठी तहकूब केल्यामुळे विरोधकांना विरोधही व्यक्त करता आला नाही. कामकाज संपल्यानंतर प्रियंका चतुर्वेदी, दिग्विजय सिंह आदी खासदार संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांच्याशी वाद घालत होते. आपल्याला म्हणणे मांडण्याची संधी न देताच तुम्ही कारवाई कशी केली, असा सवाल चतुर्वेदी यांनी तहकूब झालेल्या सभागृहात जोशी यांना केला. विरोधी बाकांवरील काँग्रेसचे नेते घोळक्याने, 'आता काय करायचे', या विचारात पडले होते. त्यांनी सभागृहाचे नेते पीयूष गोयल यांच्याशीही बोलण्याचा प्रयत्न केला, परंतु सभागृह तहकूब झाल्याने खासदारांना निलंबनाची कारवाई स्वीकारण्याशिवाय पर्याय उरला नाही.

### पावसाळी अधिवेशनात काय घडले?

- राज्यसभेत अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी अभूतपूर्व गोंधळ झाला होता.
- काँग्रेस, तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी सभापतींसमोरील हौदात घोषणाबाजी केली होती.
- काँग्रेसचे प्रतापसिंह बाजवा, आपचे संजय सिंह, तृणमूलच्या डोला सेन आदींनी प्रचंड गदारोळ केला.
- राज्यसभेच्या नियमांचे जाडजूड पुस्तक सभापतींच्या खुर्चीकडे भिरकावण्यात आले होते.
- कृषी कायदे तसेच, अन्य मुद्द्यांवर चर्चा करण्याच्या मागणीसाठी विरोधक आक्रमक झाले होते.
- सभागृहात महिला मार्शलना धक्काबुक्कीही झाली होती.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ११ ऑगस्ट रोजी राज्यसभेत अभूतपूर्व गोंधळ झाला होता. या संपूर्ण अधिवेशनात काँग्रेस तसेच, तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी सभापतींच्या समोरील हौदात येऊन घोषणाबाजी केली होती. अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी काँग्रेसचे प्रतापसिंह बाजवा, आपचे संजय सिंह तसेच तृणमूल काँग्रेसच्या डोला सेन आदी खासदारांनी प्रचंड गदारोळ केला होता. राज्यसभेच्या नियमांचे जाडजूड पुस्तक सभापतींच्या खुर्चीकडे भिरकावण्यात आले होते. कृषी कायदे तसेच, अन्य मुद्द्यांवर चर्चा करण्याच्या मागणीसाठी विरोधक आक्रमक झाले होते. सभागृहात मात्र आयुर्विमेतर विमा कायद्यातील दुरुस्ती विधेयकावर चर्चा केली जात होती. खासदारांनी गोंधळ घातल्यामुळे त्यांच्यावर राज्यसभेच्या कामकाजाचा नियम २५६नुसार शिस्तभंगाचे कारण देत कारवाई करण्यात आली.

सभागृहात महिला मार्शलना धक्काबुक्कीही झाली होती आणि त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल सभापती व्यंकय्या नायडू यांनी घेतली होती. या प्रकरणी समिती नेमून खासदारांवर कारवाई करण्यात येईल, असेही नायडू यांनी स्पष्ट केले होते. नायडू यांनी राज्यसभेच्या माजी महासचिवांशी चर्चा केल्यानंतर निलंबनाची कारवाई केली आहे.

**विरोधकांतर्फे निषेध**

निलंबनाच्या कारवाईचा १४ विरोधी पक्षनेत्यांनी निवेदनाद्वारे निषेध केला आहे. खासदारांचे निलंबन लोकशाहीविरोधी असून ही कारवाई राज्यसभेच्या कामकाज नियमांचा भंग करणारी असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

काँग्रेस, द्रमुक, सप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रीय जनता दल, माकप, भाकप, आययूएमएल, एलजेडी, जेडीएस, एमडीएमके, टीआरएस आणि आप या पक्षांनी संयुक्त निवेदन प्रसिद्धीस दिले आहे.

**निलंबित खासदार**

प्रियंका चतुर्वेदी आणि अनिल देसाई (शिवसेना), एलामारन करीम (माकप), फुलोदेवी नेताम, छाया वर्मा, रिपूण बोरा, राजमणी पटेल, नासीर हुसैन, अखिलेश सिंह (काँग्रेस), बिनय विश्वाम (भाकप), डोला सेन आणि शांता छेत्री (तृणमूल काँग्रेस), प्रतापसिंह बाजवा, संजय सिंह यांना वगळले!

पंजाबमध्ये विधानसभेची निवडणूक होणार असल्यामुळेच काँग्रेसचे खासदार प्रतापसिंह बाजवा आणि 'आप'चे खासदार संजय सिंह यांच्यावर निलंबनाची कारवाई केली नसल्याची चर्चा आहे. पंजाबमध्ये बाजवा आणि सिंह यांनी निलंबनाचे भाजपविरोधात राजकीय भांडवल केले असते, हे लक्षात घेऊन दोघांनाही कारवाईतून वगळण्यात आल्याचे मानले जाते.

## २२ ते २८ डिसेंबर दरम्यान विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन २२ ते २८ डिसेंबर या काळात मुंबईत होणार आहे. अधिवेशनाचा कमी कालावधी ठेवल्याबद्दल विरोधकांनी टीका केली असून, कामकाजासाठी अधिक वेळ देण्याची मागणी केली.

हिवाळी अधिवेशन नागपूरऐवजी मुंबईत घेण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने गेल्याच आठवड्यात घेतला होता. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत २२ ते २८ डिसेंबर या काळात अधिवेशनाचे कामकाज होईल, असा निर्णय घेण्यात आला. २४ तारखेला समितीची पुन्हा बैठक होईल व त्यात कामकाजाचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल.

भाजपची टीका

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा कालावधी वाढविण्याची तसेत अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्चमध्ये नागपूरला घ्यावे अशा मागण्या विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत केल्या. गेल्या दोन वर्षांत तारांकित व अतारांकित प्रश्नांनाही उत्तरे दिली नाहीत. सरकारला उत्तरेही द्यायची नाहीत, हे गंभीर असल्याची टीका फडणवीस यांनी केली.

पाच दिवसांचे कामकाज ठरविण्यात आले. पण हा कालावधी कमी असून सरकारला जनतेच्या प्रश्नांवर उत्तरेही द्यायची नाहीत. अधिवेशनात प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना हे कामकाजही व्हावे व कालावधी वाढविण्यात यावा, अशी मागणी फडणवीस यांनी केली.

करोनाच्या कारणास्तव नागपूरला अधिवेशन झाले नसून आता मार्चमध्ये तरी ते घेण्यात यावे. आमच्या मागण्यांवर लवकरच निर्णय होईल, असे आश्वासन सत्ताधाऱ्यांकडून देण्यात आल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

# शाळा उद्यापासूनच!

*(पान १ वरून)* अंतराचे पालन करणे शक्य होणार नाही. अनेक शाळांमध्ये वर्गखोल्या मर्यादित असल्याने मुलांची वर्गात गर्दी होईल. या सर्व बाबींचा विचार करून शाळा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जावा, अशी मागणी केली जात आहे.

दुसरीकडे, शिक्षण विभागाने बुधवारपासून शाळा सुरू करण्याची तयारी केली आहे. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सोमवारी झालेल्या बैठकीत शाळा सुरू करण्यावर चर्चा करण्यात आली. ओमायक्रॉनच्या भीतीमुळे शाळा सुरू करण्याचा निर्णय लांबणीवर टाकावा, अशी मागणी होत असली तरी बुधवारपासून शाळा सुरू केल्या जातील, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. काही पालकांनी शाळा सुरू करण्यास विरोध दर्शविला आहे. ओमायक्रॉनमुळे मुलांना शाळेत पाठवण्याबाबत अनेक पालक संभ्रमावस्थेत असल्याचे दिसते.

शाळा सुरू करण्यास आरोग्य विभागाचा हिरवा कंदील असल्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले. आरोग्य विभागापाठोपाठ शाळा सुरू करण्याबाबत शिक्षण विभागानेही मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. मात्र, पालक अद्यापही संभ्रमावस्थेत असल्याने शाळांमधील उपस्थितीवर परिणाम होऊ शकतो, असे मानले जाते.

### सूचना काय?

- शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे करोना लसीकरण (दोन्ही मात्रा) बंधनकारक असून त्यांनाच शाळा व कार्यालयामध्ये प्रवेश देण्यात यावा.
- विद्यार्थ्यांचे नाक व तोंड मुखपट्टीने पूर्णतः झाकलेले असले पाहिजे, याबाबत विद्यार्थ्यांना सातत्याने सांगावे. शाळेतील परिपाठ, स्नेह संमेलन व इतर गर्दीचे कार्यक्रम अथवा एकमेकांशी संपर्क होईल, अशा कार्यक्रमांच्या आयोजनावर कडक निर्बंध असतील.
- शिक्षक-पालक बैठका देखील शक्यतो ऑनलाइन घ्याव्यात. शाळेत हात धुण्यासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वर्गामध्ये एका बाकावर एक विद्यार्थी याप्रमाणे बैठकव्यवस्था असावी. विद्यार्थ्यांनी शाळेत उपस्थित राहण्यापूर्वी त्यांच्या पालकांची संमती आवश्यक आहे.
- शाळा सुरू करण्यापूर्वी त्या गावातील करोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला असावा. गर्दी टाळण्याकरिता पालकांना शाळांच्या आवारात परवानगी देण्यात येऊ नये. एका वर्गात जास्तीत जास्त १५ ते २० विद्यार्थी असावेत.
- शाळेतील एखादा विद्यार्थी करोनाग्रस्त आढळल्यास तात्काळ शाळा बंद करण्याची सूचना. शिक्षकांची गावांमध्येच शक्यतो मुक्कामाची व्यवस्था करावी.

# जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या सदस्य संख्येत वाढ

*(पान १ वरून)*

निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या निश्चित करील.

वटहुकमाऐवजी विधेयक

महानगरपालिकांची सदस्य संख्या वाढवण्याचा निर्णय घेतल्यावर त्याबाबतचा वटहुकूम काढण्यात आला होता. मग जिल्हा परिषद व पंचायत समितीबाबत विधेयक मांडण्याचा निर्णय का, अशी विचारणा ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे केली असता मुंबई महापालिकेतील सदस्य संख्या वाढवण्याबाबतच्या वटहुकमाची फाइल स्वाक्षरीसाठी दोन आठवडे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या कार्यालयाकडे पडून असल्याने पुन्हा असा विलंब होऊ नये यासाठी हिवाळी अधिवेशनात विधेयक मांडण्याचा निर्णय घेतल्याचे मुश्रीफ यांनी स्पष्ट केले.



राज्य मंत्रिमंडळाने जिल्हा परिषदेतील सदस्य संख्या वाढवण्यासाठी राज्यपालांच्या स्वाक्षरीने वटहुकूम काढण्याऐवजी विधेयक मांडण्याचा निर्णय सकाळी बैठकीत घेतल्यानंतर सोमवारीच राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुंबई महानगरपालिकेतील सदस्य संख्या वाढवण्याच्या वटहुकूमावर स्वाक्षरी केली.

मुंबई महापालिकेतील सदस्य संख्या २२७ वरून २३६ होण्याचा व त्यानुसार प्रभागरचना होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## नेटक्लिप्स

लोकसत्ता.COM

- संजय राऊतांच्या मुलीच्या लग्नात पवार कुटुंबीय वऱ्हाडी; शरद पवारांनी सपत्निक लावली हजेरी
- दक्षिण आफ्रिकेतून डोंबिवलीत आलेला तरूण करोनाबाधित

हे व्हिडीओ बघण्यासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा..

## सर्वाधिक वाचकपसंती

- अग्रलेख - वर्धापनाच्या तुटीची जमा!
- ओमिक्रॉन : दक्षिण आफ्रिकेतून गेल्या १९ दिवसांत एक हजारांच्या आसपास प्रवासी मुंबईत; आदित्य ठाकरेंची धक्कादायक माहिती
- 'आरबीआय'चा कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव; डिजिटल चलनासही 'बँक नोट'प्रमाणे पाहावे!
- हिवाळी अधिवेशन : विरोधी पक्षातील १२ खासदारांचे निलंबन; शिवसेनेच्या दोन खासदारांचा समावेश

# समृद्धी महामार्गाचा गोंदियापर्यंत विस्तार

## नागपूर ते गोंदियादरम्यान १५० किमी महामार्ग; व्यवहार्यता अभ्यासणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई ते नागपूर समृद्धी मार्गाचा आता नागपूर गोंदियापर्यंत विस्तार करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) घेतला आहे. त्यानुसार नागपूर ते गोंदियादरम्यानच्या विस्तारीकरणासाठी व्यवहार्यता अभ्यास करण्यात येणार आहे. या कामासाठी सल्लागार कंपनीची नियुक्ती करण्यासाठी एक-दोन दिवसांत निविदा काढण्यात येण्याची शक्यता आहे. नागपूर ते गोंदिया असा साधारणतः १५० किमी महामार्ग असेल. हे विस्तारीकरण झाल्यास मुंबई ते गोंदिया अंतर काही तासांत पार करणे शक्य होणार आहे.

मुंबई ते नागपूर हे अंतर आठ तासांत पूर्ण करण्यासाठी ७०१ किमी लांबीचा समृद्धी महामार्ग बांधण्यात येत आहे. ५५,३३५.३२ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येणाऱ्या या प्रकल्पाचे आतापर्यंत ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यातही नागपूर ते शिर्डी या पहिल्या टप्प्याचे ९० टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झाले आहे.

हा पहिला टप्पा येत्या काही महिन्यांत वाहतुकीसाठी खुला करण्यात येण्याची शक्यता आहे. तर संपूर्ण महामार्ग सप्टेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. या प्रकल्पाची व्याप्ती वाढवून त्याचा फायदा अधिकाधिक नागरिकांना, गावांना आणि जिल्ह्यांना व्हावा या दृष्टीनेही एमएसआरडीसीकडून प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून समृद्धी महामार्गाचा जालना ते नांदेड असा अंदाजे २०० किमी विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विस्तारीकरणाचा आराखडा तयार करण्यात येत आहे. तर आता समृद्धी महामार्गाचा नागपूर ते गोंदिया असाही विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

समृद्धी महामार्गाचे नागपूर ते गोंदिया असे विस्तारीकरण करण्यात येणार असल्याची माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांनी दिली. नागपूर ते गोंदिया असा अंदाजे १५० किमीचा विस्तार करण्यात येणार असून हा निर्णय आता प्राथमिक स्तरावर आहे. त्यामुळे याबाबत अधिक काही सांगता येणार नाही, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

या प्रकल्पाचा व्यवहार्यता अभ्यास केला जाणार आहे. या कामासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात येणार असून त्यासाठी लवकरच निविदा काढण्यात येणार आहे. हा अभ्यास झाल्यानंतरच हा महामार्ग नेमका किती किमी लांबीचा असेल, यासाठी किती खर्च येईल आणि यासह अन्य बाबी स्पष्ट होतील असेही या अधिकाऱ्याने सांगितले.

**...म्हणून विस्तारीकरण**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून जालना ते हैदराबाद महामार्गाचे नियोजन सुरू आहे. त्यामुळे भविष्यातील विचार करून जालना ते नांदेड विस्तारीकरण करण्यात येत आहे. तर दुसरीकडे गोंदिया (गोंदिया सीमेपासून) ते कोलकाता महामार्गाचाही विचार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून सुरू आहे. या पार्श्वभूमीवर भविष्यात कोलकाता ते मुंबई प्रवास करता यावा या दृष्टीने नागपूर ते गोंदिया विस्तारीकरणाचा निर्णय घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# समृद्धी महामार्गाचे बांधकाम करताना थेट कालव्यातच खांब

**वर्धा :** समृद्धी महामार्गाचे बांधकाम करताना थेट कालव्यातच खांब उभारण्याचा प्रकार घडला असून शेतकऱ्यांची सिंचन व्यवस्था बाधित झाली आहे.

वर्धेलगत येळाकेळी परिसरात दहेगाव आष्टा भागात कालव्याच्या मधोमध समृद्धीवरील पुलाचे तीन खांब उभे करण्यात आले आहते. कालव्याच्या मधोमध खांब उभे करण्याची परवानगी कशी देण्यात आली, असा सवाल आमदार डॉ. पंकज भोयर यांनी रस्ते विकास महामंडळ व पाटबंधारे विभागाला केला आहे. चक्क कालव्यातच खांब उभारल्याने तसेच पूल तोडून पाइप टाकल्याने पाण्याचा प्रवाह अडला आहे. शेतात पाणी पोहोचण्याचा मार्गच त्यामुळे ठप्प झाला आहे. या संदर्भात अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्यावर आमदार डॉ. भोयर यांनी कालवा परिसराची पाहणी केली. सेलू



पाठबंधारे उपविभागात येणाऱ्या आष्टा कालव्याला समांतर महामार्गाचा एक किलोमीटर लांबीचा पट्टा आहे. रस्ता बांधण्यापूर्वी शेतकऱ्यांना ये-जा करण्यासाठी कालव्यावर पूल बांधण्यात आला होता.

मात्र महामार्गाच्या बांधकामादरम्यान हा पूल पाडण्यात आला. त्याऐवजी कालव्यात पाइप टाकण्याचा प्रकार करीत मार्ग उपलब्ध करून देण्यात आला. दहेगाव शाखेची मुख्य वितरिका असल्याने आष्टा वितरिकेत पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात असतो. परिणामी पाण्याच्या प्रवाहात अनेक गोष्टी वाहून येतात. कचरा, झाडे व सोबतच जनावरेही पाइपमध्ये अडकण्याची भीती व्यक्त होते. प्रवाह बाधित झाल्याने लगतच्या शेतात पाणी शिरून पिकांचे नुकसान होत आहे. तर अन्य शेतकऱ्यांना पाणी मिळण्याचा मार्ग बंद झाला आहे.

# चित्रपट, नाट्यगृहे ५० टक्के क्षमतेनेच

## खुल्या मैदानातील कार्यक्रमांना २५ टक्के उपस्थितीची मर्यादा कायम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शहरातील चित्रपट आणि नाट्यगृहे ५० टक्के क्षमतेनेच सुरू राहणार आहेत. तसेच खुल्या मैदानातील कार्यक्रमांना २५ टक्के उपस्थितीची मर्यादा कायम ठेवण्यात आली आहे. याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी सोमवारी प्रसृत केले. दरम्यान, शुक्रवारी झालेल्या करोना आढावा बैठकीत चित्रपट आणि नाट्यगृहे पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, दक्षिण आफ्रिकेतील करोना विषाणूचा उत्परिवर्तित ओमायक्रॉनचा प्रसार रोखण्यासाठी राज्य शासनाने दिलेल्या आदेशानुसार चित्रपट आणि नाट्यगृहे यापुढेही ५० टक्के क्षमतेने सुरू राहणार आहेत.

शहरासह जिल्ह्यातील करोना सद्यःस्थिती आढावा बैठक शनिवारी (२७ नोव्हेंबर) राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यामध्ये करोनाविषयक सर्व नियमांचे पालन करून संपूर्ण क्षमतेने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यास, तसेच चित्रपट आणि नाट्यगृहे १०० टक्के प्रेक्षकांच्या उपस्थितीत सुरू करण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र, करोना विषाणूचा उत्परिवर्तित ओमायक्रॉनचा प्रसार रोखण्यासाठी राज्य शासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाला लेखी आदेश दिले आहेत. त्यानुसार करोनाविषयक नियम अधिक कडक करण्याबाबत स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचा अधिकार राहील, मात्र नियमांत शिथिलता देण्याबाबत राज्य शासनाच्या आदेशांचे पालन करण्याबाबत कळवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी सोमवारी आदेश प्रसृत केले आहेत.

दरम्यान, चित्रपट आणि नाट्यगृहे, मंगल कार्यालय आणि सभागृह अशा बंदिस्त जागेत घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमात क्षमतेच्या ५० टक्के लोकांना परवानगी राहील. खुल्या जागांमध्ये घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांना जागेच्या क्षमतेच्या २५ टक्के इतक्या उपस्थितीस मुभा राहणार आहे. तसेच खुल्या जागांमधील कार्यक्रमांना येणाऱ्या लोकांची संख्या एक हजारपेक्षा अधिक असल्यास याबाबत स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला आधी माहिती देणे बंधनकारक आहे, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

कालनिर्णय अवधूत पंचांग
खास स्वामीभक्तांसाठी!
आता सर्वत्र उपलब्ध
कालनिर्णय अवधूत पंचांग
₹२०/-
तू निरंजन तुज म्हणती निर्गुण तूच जगाचे कारण अहंभावे प्रगटसी
कालनिर्णय ५०

श्रीस्वामी समर्थ संप्रदायाच्या 'श्रीगुरुलीलामृत' या पोथीनुसार देण्यात आलेले शास्त्रार्थ

## ग्राहकाने मुखपट्टी परिधान न केल्यास दुकानदाराला दंड

### व्यापारी महासंघाचा विरोध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** खरेदीसाठी आलेल्या ग्राहकाने मुखपट्टी परिधान न केल्यास दुकानदाराला दहा हजार रुपये दंड करणारा राज्य शासनाचा नियम जाचक असून या निर्णयाला पुणे शहर व्यापारी महासंघाचा विरोध असल्याचे महासंघातर्फे सांगण्यात आले. शहरातील दुकानदार तसेच खासगी कार्यालयांच्या चालकांकडून दहा हजार रुपये दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.

दुकानात, कार्यालयात एखाद्याने मुखपट्टी परिधान न करता प्रवेश केल्यास किंवा त्याचा वावर असल्याचे आढळून आल्यास त्या व्यक्तीकडून एक हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे. संबंधित दुकानदार तसेच कार्यालयाच्या मालकाकडून दहा हजार रुपये दंड आकारण्याची तरतूद राज्य शासनाने नव्या नियमावलीत केली आहे. या निर्णयास शहरातील व्यापाऱ्यांची शिखर संघटना असलेल्या पुणे व्यापारी महासंघाने विरोध केला असून याबाबत राज्य सरकारकडे दाद मागण्यात येणार असल्याचे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फत्तेचंद रांका आणि सचिव महेंद्र पितळीया यांनी यांनी सांगितले.

व्यापारी महासंघाचा मुखपट्टीला अजिबात विरोध नाही. प्रत्येकाने मुखपट्टी परिधान केली पाहिजे. मात्र, देशातील अन्य कोणत्याही राज्यात दुकानदार किंवा खासगी कार्यालयाच्या मालकाकडून दंड आकारण्याचा नियम नाही. शहरातील व्यापाऱ्यांनी प्रत्येक दुकानाबाहेर नो मास्क नो एंट्री असे फलक लावले आहेत, असे त्यांनी नमूद केले.

## शहर, जिल्ह्यातील शाळा उद्यापासून

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील पहिली ते सातवी, तर उर्वरित ग्रामीण भागातील पहिली ते चौथीच्या शाळा बुधवारपासून (१ डिसेंबर) सुरू करण्यात येणार आहेत. याबाबत राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने सोमवारी शासन आदेश प्रसृत केला. त्यामुळे आता १ डिसेंबरपासून शहरासह जिल्ह्यातील प्राथमिक शाळा सुरू करण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. पुणे महापालिकेकडून प्राथमिक शाळा सुरू करण्याबाबतचे स्वतंत्र आदेश मंगळवारी (३० नोव्हेंबर) प्रसृत करण्यात येणार आहेत.

राज्य सरकारने १ डिसेंबरपासून प्राथमिक शाळा सुरू करण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी जाहीर केला होता. मात्र, दक्षिण आफ्रिकेत ओमायक्रॉन नावाचा नवा करोनाचा उत्परिवर्तित विषाणू सापडल्याच्या पार्श्वभूमीवर शहरासह जिल्ह्यातील शाळा सुरू करण्याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, शिक्षण विभागाने शाळा सुरू करण्यासंदर्भात सोमवारी सायंकाळी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्याने शाळा सुरू होणार हे निश्चित झाले आहे. या शासन निर्णयामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये असलेला संभ्रमही दूर होणार आहे.

दरम्यान, शासनाच्या आदेशानुसार महापालिकेच्या सर्व माध्यमांच्या शाळा १ डिसेंबरपासून सुरू करण्यात येणार असून शाळांच्या साफ-सफाईसह सर्व पूर्वतयारी करण्यात आली आहे. महापालिकेच्या सर्व माध्यमाच्या २५५ शाळा बुधवारपासून सुरू करण्यात येणार आहेत. याबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सर्व तयारी करण्यात आली आहे. सर्व मुख्यध्यापकांना सूचना देण्यात आल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ज्ञानेश्वर मोळक यांनी दिली. तसेच ग्रामीण भागातील शाळा शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून सुरू करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष रणजित शिवतरे यांनी स्पष्ट केले.

### मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी बंधनकारक

राज्याच्या आरोग्य विभागाने रविवारी शाळा सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. शिक्षण विभागाने या मार्गदर्शक सूचनांचा समावेश नव्या शासन आदेशामध्ये केला असून त्याचे पालन करण्याच्या सूचना शाळांना केल्या आहेत. या सूचनांचे पालन होते किंवा कसे याबाबत संबंधित गट शिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी यांची जबाबदारी असणार आहे. शिक्षण विभागातील स्थानिक अधिकाऱ्यांनी सातत्याने शाळांना भेटी देऊन शाळांमध्ये केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती संकलित करावी, शाळा सुरू करताना विद्यार्थ्यांची शाळेत गर्दी होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने शाळेत बोलवावे, असे शालेय शिक्षण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

तन्वी हर्बल्स फ्री फोन कन्सल्टेशन

Tanvi HERBALS हर्बल तन्वीपॅथी
तन्वी हर्बल्स ॲप
वर तन्वी संचालिका डॉ मानसी यांचा फोनवर सल्ला घ्या. तन्वी हर्बल्स ॲप किंवा वेबसाइट www.tanviherbals.com वर अपॉइंटमेंट घ्या व ऑनलाईन प्रिस्क्रिप्शन, औषधे मिळवा . अधिक माहितीसाठी तन्वी संचालक प्रतीक पै यांना आजच फोन करा : 9324900029 GET IT ON Google Play
फ्री व्हाटसॲप सल्ल्यासाठी मेसेज करा. डॉ. मेधा : 7045589981
तन्वी ऑफिस : 9167233862 | वर तन्वी डॉक्टरांच्या हेल्थ टिप्स जरूर पहा.

PIMPRI CHINCHWAD EDUCATION TRUST (PCET)
A Trusted Brand in Education Since 1990 | Quality Education from KG to Ph.D
Institutes Approved By AICTE New Delhi, DTE Maharashtra, UGC, MSBTE, SPPU, DBATU, Council of Architecture, CBSE
PCET Institutes Accredited by NAAC, NBA
Thinking of Placements, Disciplined Academics & Research? Think PCET
25,220+ PLACEMENTS | 650+ FACULTIES | 450+ PATENTS | 2,500+ RESEARCH PAPERS | 65+ ACRES 3 CAMPUSES | 49,000+ ALUMNI | 14,500+ STUDENTS ON CAMPUS EACH YEAR | 500+ RECRUITERS EVERY YEAR

B.Tech
Pimpri Chinchwad College of Engineering (PCCOE) (Autonomy by UGC) & Degree by S.P. Pune University — DTE CODE : 6175 — www.PCCOEpune.com
Nutan College of Engineering & Research (NCER) — DTE CODE : 6419 — www.NCERpune.in
MBA
S. B. Patil Institute of Management (SBPIM) — DTE CODE : 6192 — www.SBPATILMBA.com
BE
Pimpri Chinchwad College of Engineering & Research (PCCOE&R) — DTE CODE : 6822 — www.PCCOER.com
Nutan Maharashtra Institute of Engg. & Technology (NMIET) — DTE CODE : 6310 — www.NMIET.edu.in
B.Arch
S. B. Patil College of Architecture and Design (SBPCOAD) — DTE CODE : 680 — www.SBPATILARCHITECTURE.com
Nutan Maharashtra Vidya Prasarak Mandal's NMIET & NCER are under Management Support of Pimpri Chinchwad Education Trust (PCET)

ACHIEVEMENTS
+ 323 students of 2020-2021 (Final Year) got selected in Capgemini (Salary 6.8 & 3.8 Lacs).
+ International Placements with Highest Salary of 20 Lacs in Japan.
+ Around 2,000 Job Offers each Yr.
+ Accredited by reputed companies like Capgemini, Accenture, Cognizant, KPIT, Wipro, TCS, L&T.
+ Famous across Maharashtra for Off Campus/ Pool Campus Recruitment Drives.
PCET is registered as approved Scientific and Industrial Research Organisation (SIRO) by DSIR, Govt. of India.

Quality Placement for Academic Year 2021-2022
+ 1,450 Job Offers for current final year students

| Salary (In Lacs) | Job Offers 2021-22 |
|---|---|
| Above 7 Lacs | 240 |
| Between 5 to 7 Lacs | 270 |
| Between 4 to 5 Lacs | 871 |
| Less than 4 Lacs | 69 |

International Collaboration with Foreign Universities
+ PCET has signed MoU with Universities from Malaysia, Japan, Italy, Thailand, Russia, UK etc.
+ PCET has signed MoUs with several international universities for Joint Workshops/ Symposia/ Conferences/ Publications, etc.
+ Exchange of Faculty & Students

Courses : KG-10th, Jr. College, Diploma, BE, B.Tech., B.Voc, Architecture, M.Tech., MCA, MBA, PGDM, Ph.D
FOR ADMISSIONS : 7385080604 / 9975273889
www.PCET.org.in

INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY BOMBAY
Powai, Mumbai-400 076
ADVT No.H-6/21-22
Dean (IPS), on behalf of Director, IIT (B) invites Tender (percentage rate bid) for **"Construction of New Annexe to HSS Building (Basement +Ground + 6 floors) including all Finishing, Fire fighting, MEP and Development works for Indian Institute of Technology Bombay"** Powai, Mumbai - 400076
For details refer https://www.iitb.ac.in/deanpl/tender.html
Last date of submission is 30.12.2021 up to 15:00 hrs
IITB/DEAN (IPS)/CACI/HSS/Tender/01 dt: 30.11.2021
Dean (IPS)

## आळंदी यात्रेनिमित्त आज शहरासह जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांना सुटी

**पुणे :** आळंदी यात्रेनिमित्त जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी शासकीय कार्यालयांना सुटी जाहीर केली आहे. त्यामुळे मंगळवारी (३० नोव्हेंबर) शहरासह जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये बंद राहणार आहेत. तसेच शहरासह जिल्ह्यातील दस्त नोंदणी कार्यालयेही बंद ठेवण्यात येणार आहेत.

शहर आणि ग्रामीण भागात ५६ दस्त नोंदणी कार्यालये आहेत. त्यामध्ये शहरात ३४ आणि ग्रामीण भागात २२ कार्यालये आहेत. जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी आळंदी यात्रेनिमित्त सरकारी कार्यालयांना सुटी जाहीर केली आहे. त्यामुळे दस्त नोंदणी कार्यालयेही बंद राहणार असल्याचे नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून सांगण्यात आले.

जाहिर नोटीस
सर्व लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. हवेली सब रजिस्ट्रार साहेब हवेली तसेच पूर्णे म.न.पा. यांचे हद्दीमध्ये गांव मौजे बिबवेवडी येथील फ्लॅट मिळकत यांसी स.नं. ६६२ हिस्सा नं १+२ यांसी सीस.नं ८२५ हया मिळकती वर बांधण्यात आलेल्या दुर्गा ईमारती मधिल आकराव्या मजल्या वरील फ्लॅट नं ६३ यांसी क्षेत्र ११०. १३ स्के मि. लगतचे टेरेस ७.८२ स्के मि व १ कव्हर्ड कार पार्कींग १३.९४ स्के मि. ही मिळकत वर्णन केलेली मिळकत ही १. श्री. अमर दिनकर मराठे व सौ रमा अमर मराठे यांच्या मालकीची कब्जेवहिवाटीची असून सदर विद्यमान मालकांनी सदर मिळकतीचे संदर्भातिल मोहन कृष्णाजी दाते व मंजु अविनाश वार्देकर यांचे मध्ये झालेल्या डिड ऑफ असाईनमेंट / आर्टीकल ऑफ ॲग्रिमेंट हवेली १० दस्त नं ४९२० / २००४ आन्वये नोदविन्यात आलेला मूळ दस्त व इंडेक्स II तसेच सदर मिळकतीचे संदर्भातिल मंजु अविनाश वार्देकर व जितेन्द्र डेव्हलपर्स यांचे मध्ये झालेल्या डिड ऑफ असाईनमेंट / आर्टीकल ऑफ ॲग्रिमेंट हवेली १० दस्त नं १९०३ / २००३ आन्वये नोंदविन्यात आलेला मुळ दस्त व इंडेक्स II हारवले आहेत. तसेच या संदर्भात रीतसर कायदेशिर फिर्याद ४४०८१/२०२१ आन्वये दाखल केलेली आहे. सदर मिळकती संदर्भात अन्य कोणाचाही अधिकार अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत मूळ कागदपत्रांसह आमच्याकडे प्रत्यक्ष येवून आमची खात्री पटवून दयावी त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकाराची तकार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
पुणे
दि. ३०/११/२०२१
ॲडव्होकेट
नितीन भाऊसाहेब वाघमोडे
फाले नगर, क्र. ३४/२, वैभव अपार्टमेंट, दुकान क्र. ३ भारती विद्यापीठ, आंबेगाव Bk. ता. हवेली, जिल्हा - पुणे. ४११०४६
Mob No- ७५८८५०५१५४, ९४२१०६५५११

Feel Bharat. Live Bharat.

KESARI 37 Years Legacy
डिसेंबर सहलींसाठी केसरीची-लास्ट चान्स ऑफर.
फेस्टीव ऑफरचा लाभ घ्या. सहलीवर धम्माल करा...
हजारो पर्यटक सहलींवरून आनंदाने परतत आहेत! आता आपणही चला डिसेंबरच्या सहलींना. देशविदेशात फिरण्याचा सर्वोत्तम काळ. ख्रिसमस-न्यू ईयरची धम्माल. या पीक सिझनमध्ये विमानप्रवास, हॉटेल्सचे दर वाढतात. पण चिंता करू नका, केसरीने सवलतीच्या किंमतीत आणले आहेत सर्वसमाविष्ट सहलींचे विविध पर्याय. तेही उत्तम डील्ससह. आवडती सहल लगेच बुक करा आणि सहकुटुंब सेलिब्रेशनला चला!
फेस्टिव ऑफर | क्रेडिट शेल डिस्काऊंट | फुल पेमेंट डिस्काऊंट | सिनिअर सिटीझन डिस्काऊंट | एक्स गेस्ट डिस्काऊंट | माय फेअर लेडी डिस्काऊंट

| फॅमिली टूर्स | |
|---|---|
| SF 07 केरळ कन्याकुमारी इकॉनॉमी | 39,990 |
| RF 07 राजस्थान मेवाड इकॉनॉमी | 40,990 |
| NF 08 नैनिताल मसूरी कॉर्बेटपार्क इकॉनॉमी | 42,990 |
| HC 09 शिमला मनाली अपग्रेड | 44,990 |
| KF 07 काश्मीर वैष्णोदेवी इकॉनॉमी | 45,990 |
| NU 07 मेस्मरायझिंग नॉर्थ ईस्ट | 62,990 |
| KB 09 काश्मीर | 64,990 |
| SN 07 अंदमान | 69,990 |

| हनिमून टूर्स | |
|---|---|
| CK 05 मुन्नार कुमारकोम | 31,990 |
| Y3 08 शिमला मनाली इकॉनॉमी | 35,990 |
| CC 07 मॅजिकल मनाली इकॉनॉमी | 36,990 |
| CJ 06 नैनिताल कॉर्बेटपार्क इकॉनॉमी | 39,990 |
| Y5 07 एन्चँटिंग केरळ | 42,990 |
| CO 07 काश्मीर | 55,990 |
| CR 07 दार्जिलिंग गँगटोक | 58,990 |
| C8 07 मेस्मरायझिंग नॉर्थ ईस्ट इकॉनॉमी | 65,990 |

| ऑफबीट इंडियन टूर्स | |
|---|---|
| RH 07 गोल्डन ट्रँगल | 33,990 |
| MB 15 संपूर्ण मध्य प्रदेश | 34,990 |
| RZ 07 राजस्थान मेवाड स्पेशल नाथद्वारा | 38,990 |
| SE 07 वंडर्स ऑफ केरळ | 41,990 |
| KG 06 श्रीनगर पहलगाम गुलमर्ग इकॉनॉमी | 41,990 |
| HG 07 डलहौसी धर्मशाला अमृतसर | 42,990 |
| SH 08 मैसूर उटी कोडाई | 48,990 |
| NB 10 नैनिताल मसूरी कॉर्बेटपार्क | 55,990 |

| छोटा ब्रेक टूर्स | |
|---|---|
| WN 05 वडोदरा विथ स्टॅच्यु ऑफ युनिटी | 19,990 |
| WX 05 पुरी भुवनेश्वर चिलीका | 24,990 |
| WA 03 अमृतसर | 24,990 |
| W1 04 दिल्ली आग्रा | 24,990 |
| WR 04 गुजरात रण उत्सव | 24,990 |
| W4 04 इंदोर उज्जैन मांडू | 27,990 |
| WN 05 स्टॅच्यु ऑफ युनिटी विथ अहमदाबाद | 28,990 |
| WO 04 पॉंडिचेरी विथ महाबलीपुरम | 31,990 |

| माय फेअर लेडी टूर्स | |
|---|---|
| LM 04 इंदोर उज्जैन मांडू | 26,990 |
| LX 04 गुजरात रण उत्सव | 26,990 |
| LN 05 स्टॅच्यु ऑफ युनिटी विथ अहमदाबाद | 26,990 |
| LZ 04 पॉंडिचेरी | 29,990 |
| L1 08 शिमला मनाली इकॉनॉमी | 37,990 |
| L6 07 राजस्थान मेवाड | 39,990 |
| LO 07 डलहौसी धर्मशाला अमृतसर | 42,990 |
| L5 07 अंदमान | 60,990 |

| इंटरनॅशनल टूर्स | |
|---|---|
| MS 07 श्रीलंका | 79,990 |
| D2 05 बेस्ट ऑफ दुबई | 92,990 |
| D1 06 दुबई अबुधाबी विथ थीमपार्क्स | 1,08,990 |
| EX 06 बेस्ट ऑफ रशिया | 1,44,990 |
| PM 06 बेस्ट ऑफ स्विस - इकॉनॉमी | 1,77,990 |
| VE 08 मिस्ट्रीज ऑफ इजिप्त | 1,59,990 |
| EL 09 स्विस पॅरिस | 2,21,990 |
| EB 11 म्युनिक पॅरिस | 2,45,990 |

*T & C apply.

पुणे 020-66465555, कर्वे रोड 1800 22 1100, औंध 9011948181, बाणेर 7350048048, भोसरी 9922151222, चाकण 9763727561 | इंदापूर 9766310800, हडपसर 9569300300, निगडी 9890941767, नगर रोड 9011757373, पिंपळे सौदागर 9049989533, सिंहगड 9561100444 | सातारा रोड 7028012434, कराड 9823325058, कराड 8976988312, सांगली 9421128340, अहमदनगर 9823140901, अहमदनगर 7350553131 | अकलुज 9657782525, महाबळेश्वर 8975557511, पंढरपूर 8177820503, बारामती 9822848988, इचलकरंजी 9960701188, इस्लामपूर 9766099555 | सोलापूर 9689913325, सोलापूर 9890186186, बार्शी 9420660819, उस्मानाबाद 9960082472, जि.प.ऑफिस 9922992382, राजवाडा 9822791529 | कोल्हापूर 0231-2533222, इंगळे नगर 9420326149, गडहिंग्लज 9423039672, निपाणी 9880224277, बेळगाव 9880733500
All tours are from Mumbai. The USD/EURO will be calculated as per the prevailing rate on the date of payment. All tour prices are per person on twin sharing basis. Indian Tour price do not include to & fro Railfare or Airfare. For Airport to Airport tours return economy class airfare is included in tour cost. Service taxes & govt taxes are appicable & excluded from tour price. All discounts are subject to availability of the discount slabs. Terms & Conditions apply. Office Hours: Monday to Saturday 10 am to 6 pm.
केसरीची कार्यालये व कॉल सेंटर सोमवार ते शनिवार सकाळी १० ते सायंकाळी ६
1800 22 1100 KESARI.in

लोकसत्ता लोकमान्य लोकशक्ती
सहज बोलता बोलता...
विख्यात बुद्धिबळ ग्रँडमास्टर, आशियाई व राष्ट्रकुल पदकविजेते, संयोजक, प्रशिक्षक असे **अभिजित कुंटे** यांचे अनेक पैलू. अलीकडेच ध्यानचंद जीवनगौरव पुरस्काराने ते सन्मानित झाले. बुद्धिबळाच्या विविध पैलूंचा रंजक वेध अभिजित यांच्याशी वेबसंवादाच्या माध्यमातून...
बोलत बोलत सहज सहभागी व्हावे असा कार्यक्रम **लोकसत्ता... सहज बोलता बोलता....**

अभिजित कुंटे, विख्यात बुद्धिबळपटू आणि मेजर ध्यानचंद जीवनगौरव पुरस्कार विजेते
लोकसत्ता सहज बोलता बोलता
कधी : बुधवार, १ डिसेंबर २०२१
वेळ : सायंकाळी ६ वाजता
* नियम व अटी लागू. प्रवेश मर्यादित
त्यांना भेटण्यासाठी तुम्ही करायचं ते इतकंच...
● http://tiny.cc/LS_SahajBoltaBolta_1Dec या लिंकवर जाऊन नोंदणी करा. ● नोंदणी करून झाल्यावर आमच्याकडून तुम्हाला ई-मेल आयडीवर संदेश येईल. ● याद्वारे १ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता या वेब-संवादात सहभागी होता येईल. ● अधिक माहितीसाठी http://www.loksatta.com या संकेतस्थळाला भेट द्या.
किंवा क्यूआर कोड स्कॅन करा

# लसीकरण नसल्यास साहित्य संमेलनात प्रवेशास मज्जाव

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** करोनाच्या नव्या उत्परिवर्तित विषाणूच्या पार्श्वभूमीवर तीन डिसेंबरपासून येथे सुरू होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनात पात्र गटातील ज्यांनी प्रतिबंधक लसीची एकही मात्रा घेतलेली नाही, त्यांना संमेलन स्थळी प्रवेश नाकारण्यात येणार आहे. म्हणजे केवळ लसीकरण झालेल्यांना संमेलनात सहभागी होता येईल. १८ वर्षाखालील विद्यार्थ्यांसाठी मात्र तो निकष असणार नाही.

करोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे मार्चमध्ये येथे होणारे ९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन डिसेंबरपर्यंत पुढे ढकलावे लागले. संमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात असताना करोनाच्या उत्परिवर्तित ओमायक्रॉन विषाणूचे सावट उभे ठाकले आहे. संमेलनात राज्यातील विविध भागासह देशभरातून साहित्यप्रेमी सहभागी होण्याचा अंदाज आहे. संमेलन स्थळी प्रतिबंधक लसीची एकही मात्रा घेतली नसल्यास प्रवेश दिला जाणार नसल्याचे स्वागताध्यक्ष छगन भुजबळ यांनी सांगितले. संमेलनात सहभागी होण्यासाठी किमान एक मात्रा घेतलेली असणे बंधनकारक आहे. १८ वर्षांखालील वयोगटास लसीकरणाचा निकष राहणार नाही. विद्यार्थ्यांना संमेलनात सहभागी होता येईल, असे भुजबळ यांनी सांगितले.

### प्रवेशद्वारावर प्रमाणपत्र पडताळणी, तापमापन

संमेलन स्थळ निरोगी राखण्यासाठी प्रवेशद्वारावर प्रतिबंधक लस घेतल्याचे प्रमाणपत्र तपासले जाणार आहे. तसेच प्रत्येकाचे तापमापन करण्यात येणार आहे. त्यात संशयित आढळलेल्या व्यक्तीची जलद प्रतिजन चाचणी केली जाईल. प्रवेशद्वारावर तापमापन झाल्यानंतर निरोगी व्यक्तीच्या बोटावर हिरव्या रंगाची तर आरोग्याशी संबंधित समस्या असणाऱ्या व्यक्तीच्या हातावर लाल रंगाची निशाणी केली जाणार आहे.

# भारताच्या बुद्धिबळातील प्रगतीचा आढावा

## ‘सहज बोलता बोलता’मध्ये ग्रँडमास्टर अभिजित कुंटे याच्याशी वेबसंवाद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** भारताने बुद्धिबळाच्या जागतिक पटावर चौथ्या स्थानी झेप घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या प्रशिक्षक, संयोजक ग्रँडमास्टर अभिजित कुंटे याच्याशी बुधवार, १ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता ‘लोकसत्ता सहज बोलता बोलता’च्या माध्यमातून देशाच्या बुद्धिबळातील प्रगतीबाबत संवाद साधला जाणार आहे.

१९९७ साली वयाच्या २१व्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेचे जेतेपद मिळवणाऱ्या कुंटेने भारताचा जागतिक बुद्धिबळातील अगदी तळापासून ते महासत्ता बनण्यापर्यंतचा प्रवास खूप जवळून अनुभवला आहे. कुंटेने खेळाडू आणि मग प्रशिक्षक म्हणून केलेल्या कामगिरीची दखल घेत सरकारने त्याला प्रतिष्ठेच्या ध्यानचंद जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले. त्याच्या मार्गदर्शनात भारताने यंदा ‘फिडे’ ऑनलाइन ऑलिम्पियाड बुद्धिबळ स्पर्धेत कांस्य, तर महिलांच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताने रौप्यपदकावर नाव कोरले. या कामगिरीत द्रोणावल्ली हरिकासारख्या अनुभवी खेळाडूसह आर. वैशाली आणि आर. प्रज्ञानंद यांनी बहुमूल्य योगदान दिले. या खेळाडूंच्या कामगिरीबाबतचा आढावा वेबसंवादात घेतला जाईल. ऑलिम्पियाडमध्ये चार वेळा भारताचे प्रतिनिधित्व करणारा कुंटे याला २०००मध्ये ग्रँडमास्टरचा किताब मिळाला. भारतीय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत दोन सुवर्ण आणि चार कांस्यपदके त्याच्या नावे आहेत. बुद्धिबळाच्या राष्ट्रकुल स्पर्धेत दोन, आशियाई स्पर्धेत सात पदके कुंटे याने कमावली आहेत. भारतात हा खेळ आज लोकप्रिय झाला, याचे श्रेय विश्वनाथन आनंद, प्रवीण ठिपसे यांच्याबरोबरच कुंटेलाही द्यावे लागेल. आताचे युवा भारतीय बुद्धिबळपटू झपाट्याने प्रगती करत असून त्यांची यशस्वी वाटचाल सुरू राहण्यासाठी आवश्यक पावलांचाही या संवादामध्ये वेध घेतला जाईल.

लोकसत्ता सहज बोलता बोलता

### अनेक मुद्द्यांवर विश्लेषण...

गेली काही वर्षे कुंटे याने प्रशिक्षणाकडे मोर्चा वळवत भारतासाठी उत्तमोत्तम बुद्धिबळपटू घडवण्याचे कार्य केले. बुद्धिबळातील मोजक्या व्यावसायिक लीगचे यशस्वी आयोजनही त्याने करून दाखवले. बुद्धिबळाची कारकीर्द म्हणून निवड करताना कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागतो, खेळाची राज्यातील आणि देशातील सद्यःस्थिती, राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये बुद्धिबळाकडे केले जाणारे दुर्लक्ष, बुद्धिबळ जगज्जेतेपदाच्या सामन्यात कुणाला अधिक संधी यांसारख्या अनेक मुद्द्यांचे विश्लेषण कुंटे या कार्यक्रमात करतील.

सहभागासाठी http://tiny.cc/LS_SahajBoltaBolta_1Dec येथे नोंदणी करा.



# पाऊस, थंडी आणि उकाडा

## नोव्हेंबरमध्ये राज्याला तीनही ऋतूंची अनुभूती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** यंदाचा नोव्हेंबर महिना हवामानाच्या लहरीपणाचा उत्तम नमुना ठरला असून, या एकाच महिन्यात राज्यातील नागरिकांना तीनही ऋतूंची अनुभूती मिळाली. प्रत्येक आठवड्याला हवामानात झपाट्याने बदल झाले. समुद्रातील कमी दाबाच्या पट्ट्यांमुळे पावसाची हजेरी, कोरड्या हवामानात उन्हाचा चटका आणि उत्तरेकडील थंड वाऱ्यांमुळे हलक्या थंडीचाही अनुभव या महिन्यात नारिकांनी घेतला.

गेल्या काही वर्षांमध्ये मोसमी पावसाचा कालावधी लांबत असल्याने ऑक्टोबरच्या शेवटपर्यंत पावसाळी वातावरण कायम असते. ढगाळ हवामानामुळे दिवसाच्या कमाल तापमानात मोठ्या प्रमाणावर वाढ होत नसल्याने ऑक्टोबर हीटचा कालावधी यंदाही लुप्त झाला. याच चक्रामध्ये थंडीचा कालावधीही पुढे जातो आहे. यंदा ऑक्टोबरमध्ये पाऊस आणि काही प्रमाणात उकाड्याचे वातावरण होते. पण, नोव्हेंबर महिना हवामानाच्या दृष्टीने निराळा ठरला. हवामान अभ्यासकांच्या मते नोव्हेंबर महिन्याच्या कालावधीत बंगालच्या उपसागरात वादळे निर्माण होतात. त्यातून चार ते पाच दिवसांसाठी पावसाळी स्थिती तयार होऊन थंडी गायब होते. मात्र, यंदा काहीसे वेगळे चित्र पाहायला मिळाले.

नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात दिवाळीच्या कालावधीत राज्याला थंडीची प्रतीक्षा होती. पण, अरबी समुद्रातील कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होऊन दिवाळीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी कमी दाबाचे क्षेत्र तीव्र असल्याने या काळात कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी जिल्ह्यात काही भागांत जोरदार पावसाने हजेरी लावली. मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली भागांतही तुरळक ठिकाणी पाऊस झाला. मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी पावसाची हजेरी होती. दुसऱ्या आठवड्यात उत्तरेकडून काही प्रमाणात थंड वाऱ्यांचे प्रवाह राज्याच्या दिशेने येऊ लागल्याने ९ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत राज्याच्या बहुतांश भागात रात्रीच्या किमान तापमानात घट होऊन थंडी अवतरली. हे वातावरण लगेचच निवळले आणि अंदमानच्या समुद्रातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पुन्हा पावसाळी वातावरण तयार झाले. याच काळात दिवसाचे कमाल तापमान वाढून उन्हाचा चटका जाणवला. १५ ते १७ नोव्हेंबर या कालावधीत अनेक भागांत पाऊस झाला. त्यानंतरच्या काळात रात्री ढगाळ वातावरण राहात असल्याने किमान तापमानात मोठी वाढ होऊन रात्रीचा उकाडा वाढत गेला. काही भागात हे तापमान सरासरीपेक्षा ५ ते ८ अंशांनी अधिक होते. आता महिन्याच्या शेवटच्या दिवशीही राज्यात अनेक ठिकाणी पावसाळी वातावरण तयार होत आहे.

### आता तीन दिवस पावसाचे

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील तीन दिवस राज्याच्या अनेक भागांत जोरदार वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे. अरबी समुद्रात ३० नोव्हेंबरला कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होऊन ४८ तासांत त्याची तीव्रता वाढणार आहे. त्यामुळे ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, नगर, कोल्हापूर, सातारा, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद आदी जिल्ह्यांत काही भागात पावसाची शक्यता आहे.



# देयक थकवल्याने जातवैधता प्रमाणपत्राची प्रक्रिया खोळंबली

## सामाजिक न्याय विभागाच्या ढिसाळ नियोजनाचा विद्यार्थ्यांना फटका

**देवेश गोंडाणे, लोकसत्ता**

**नागपूर :** सामाजिक न्याय विभागाच्या जातवैधता प्रमाणपत्राचे ऑनलाइन काम पाहणाऱ्या आयटी कंपनीने अचानक काम बंद केल्याने जातवैधता प्रमाणपत्राची संपूर्ण ऑनलाइन प्रक्रिया खोळंबली आहे. यामुळे अर्जदारांना वेळेत प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत आहेत. विशेष म्हणजे, या कंपनीचे सरकारकडे आर्थिक देणे बाकी असल्याने काम बंद केल्याची माहिती आहे. विभागाच्या अशा ढिसाळ कारभारामुळे जातवैधता प्रमाणपत्राच्या आधारे व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सामाजिक न्याय विभागाने जातवैधता प्रमाणपत्र तयार करून देण्यासाठी ऑनलाइन प्रक्रिया सुरू केली. याचे काम एका खासगी कंपनीला देण्यात आले. यासोबतच जातवैधतेसंदर्भात आवश्यक असणाऱ्या संपूर्ण कागदपत्रांची पडताळणीही ऑनलाइन माध्यमातूनच करण्याची सुविधा देण्यात आली. यामुळे जातवैधता प्रमाणपत्र विभागातील अधिकारी त्यांच्याकडे आलेल्या अर्जांची छाननी आणि कागदपत्रांची पडताळणी ऑनलाइन करून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र उपलब्ध करून देत होते. मात्र, मागील काही दिवसांपासून ऑनलाइन सॉफ्टवेअरची सुविधा पुरवणाऱ्या कंपनीने अचानक काम बंद केले. त्यामुळे ऑनलाइन अर्ज प्रक्रियेसह पडताळणीही खोळंबली आहे. सध्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू आहेत. याकरिता उमेदवारांना जातवैधता प्रमाणपत्राची व जातवैधता प्रमाणपत्र प्रस्ताव दाखल केलेल्या पावतीची आवश्यकता असते. मात्र, प्रमाणपत्र तयार करणाऱ्या कंपनीने काम बंद केल्याने संपूर्ण व्यवस्था खोळंबली आहे. विद्यार्थ्यांना वेळेत प्रमाणपत्र न मिळाल्याने प्रवेशाला मुकण्याचे प्रकार याआधीही समोर आले आहेत.

### आधीचा अनुभवही वाईटच

सामाजिक न्याय विभागामध्ये काम करणाऱ्या अनेक कंपन्या वेतनामुळे अर्ध्यात काम सोडून जात असल्याचा प्रकार याआधीही समोर आला आहे. वेतन विभागाचे काम करणाऱ्या कंपनीनेही काम अचानक बंद केल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले होते. त्यानंतर आता जातवैधता प्रमाणपत्राचे काम पाहणाऱ्या कंपनीचे आर्थिक देणे बाकी असल्याने त्यांनीही काम बंद केल्याची माहिती आहे.

> ११ ते २९ नोव्हेंबरपर्यंत बार्टी अंतर्गत जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भातील संकेतस्थळावर काही तांत्रिक अडचणी होत्या. त्यामुळे संकेतस्थळामध्ये काही काळासाठी चढ-उतार (फ्लक्शन) पाहण्यात आला. त्या अनुषंगाने वेबसाईटमध्ये योग्य त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समितींना ऑनलाइन व ऑफलाइन अर्ज जमा करून घेण्याचे सांगण्यात आले होते. तसेच जात वैधता प्रमाणपत्र संबंधित सॉफ्टवेअर बंद पडले आहे, अनेक प्रमाणपत्र अडकून आहेत, ऑनलाइन काम करणारी कंपनीने पैसे न दिल्याने काम बंद कलेले नाही. सध्यस्थितीमध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी संकेतस्थळ सुरळीत सुरू आहे.
>
> –धनंजय मुंडे, सामाजिक न्याय मंत्री




टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

प्रस्तुत

लोकसत्ता यशस्वी भव! १६६

# इयत्ता १० वी, एस.एस.सी. बोर्ड - भूगोल

दहावी भूगोल


वेळः २ तास | एकूण गुणः ४०

**नमुना उत्तरपत्रिका**

**४. (अ) तुम्हांस पुरवलेल्या ब्राझीलच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची द्या (कोणतेही चार)** ४

१. मॅनॉस बंदर, २.आक्रे, ३. ब्राझिलिया, ४. उरुग्वे नदी, ५. ब्राझीलमधील कमी नागरीकरण असलेले राज्य., ६. पंपास गवताळ प्रदेश

**(आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार):** ४



१. वरील नकाशा काय दर्शवितो?
वरील नकाशा भारतातील **लोहमार्ग व विमानतळ** दर्शवितो.

२. नकाशातील पूर्व किनारपट्टीवरील कोणत्याही दोन विमानतळांची नावे लिहा.
**चेन्नई, विशाखापट्टण** ही दोन विमानतळे पूर्व किनारपट्टीवर आढळतात.

३. कोणत्या राज्यात लोहमार्ग आढळत नाहीत?
नकाशात **सिक्कीम** राज्यात लोहमार्ग आढळत नाहीत.

४. भारताच्या अति दक्षिणेकडील रेल्वेस्थानकाचे नाव लिहा.
**कन्याकुमारी** हे भारताच्या अति दक्षिणेकडील रेल्वे स्थानकाचे नाव आहे.

५. नकाशातील सर्वात उत्तरेकडील विमानतळाचे नाव लिहा?
**दिल्ली** हे सर्वात उत्तरेकडील विमानतळाचे नाव आहे.

**५. भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन):** ६

**१. भारतात मिश्र अर्थव्यवस्था आहे.**

i) सार्वजनिक क्षेत्र व खासगी क्षेत्रांचे सह-अस्तित्व असणारी अर्थव्यवस्था म्हणजे मिश्र अर्थव्यवस्था होय.
ii) भारतात रेल्वे, विद्युतनिर्मिती, लोह व पोलाद उद्योग इत्यादी क्षेत्रातील साधनांची मालकी व व्यवस्थापन यावर प्रामुख्याने शासनाचे नियंत्रण आहे.
iii) भारतात बँका, विमान वाहतूक, आरोग्य, शिक्षण, दूरसंचार इत्यादी क्षेत्रांतील साधनांची मालकी व व्यवस्थापन खासगी उद्योजक व शासन यांत विभागलेले आहे.

अशाप्रकारे, भारतात मिश्र अर्थव्यवस्था आहे.

**२. ब्राझीलच्या वर्षावनांना जगाची फुफ्फुसे म्हणतात.**

i) ब्राझीलमध्ये उत्तर भागात सदाहरित घनदाट वने आहेत.
ii) या वर्षावनांमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणात प्राणवायू उपलब्ध होतो.
iii) तसेच वर्षावनांमुळे वातावरणातील कार्बन डायॉक्साईडचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

म्हणूनच, ब्राझीलच्या वर्षावनांना जगाची फुफ्फुसे म्हणतात.

**३. भारताच्या पश्चिम व पूर्व किनारपट्ट्यांमध्ये विषमता आढळते.**

i) भारताच्या पूर्व आणि पश्चिम दिशांना सागरी किनारपट्टी लाभलेली असून भारताच्या पश्चिमेला अरबी समुद्र तर पूर्वेला बंगालचा उपसागर आहे.
ii) भारताच्या पश्चिम आणि पूर्व या दोन्ही किनाऱ्यांच्या मूलभूत रचनेत खूप फरक दिसून येतो.
iii) पश्चिम घाटातून अनेक डोंगररांगा पश्चिम किनाऱ्यापर्यंत पसरलेले असल्यामुळे भारताची पश्चिम किनारपट्टी तुलनेने खडकाळ असून तिची रुंदीही कमी आहे.
iv) पश्चिम किनाऱ्याला मिळणाऱ्या नद्या लांबीने कमी असून त्या खडकाळ किनाऱ्यावर उतरत असल्यामुळे नद्यांच्या मुखाशी खाड्या तयार झाल्या आहेत तर पूर्व किनाऱ्याला मिळणाऱ्या नद्या लांबीने जास्त असल्यामुळे नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाच्या संचयनामुळे नद्यांच्या मुखाशी त्रिभुज प्रदेश तयार झाले आहेत.

साहजिकच, भारताच्या पश्चिम आणि पूर्व किनारपट्ट्यांमध्ये विषमता आढळते.

**४. ब्राझीलमध्ये पर्यावरणस्नेही पर्यटनाचा अधिक विकास केला जात आहे.**


i) ब्राझीलमध्ये पर्यटन व्यवसायाचा विकास जलद गतीने होत आहे.
ii) पांढऱ्याशुभ्र वाळूच्या पुळणी, आकर्षक व स्वच्छ सागरी किनारे, निसर्गरम्य बेटे, विविध प्रकारचे प्राणी व पक्षी, राष्ट्रीय उद्याने इत्यादी पर्यटन व्यवसायाच्या विकासाची कारणे आहेत.
iii) पर्यटन व्यवसायास अधिक चालना देणे व पर्यावरणाचे संतुलन टिकून ठेवणे यासाठी पर्यावरणस्नेही पर्यटन विकास आवश्यक आहे.
iv) पर्यटन व्यवसायातील वाढीमुळे निर्माण होणारे प्रदूषण, पर्यावरणाची होणारी हानी इत्यादी दुष्परिणाम रोखणे आवश्यक आहेत.

या सर्व कारणांमुळे पर्यावरणस्नेही पर्यटनाचा अधिक विकास केला जात आहे.

**६.(अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे रेषालेख काढा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा:** ६

भारतः नागरीकरणाचा कल (१९६१-२०११)

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|
| नागरीकरणाचा कल | १८.० | १८.२ | २३.३ | २५.७ | २७.८ | ३१.२ |




**प्रश्न :** १. वरील आकडेवारीतील वर्षांतर किती आहे?
वरील आकडेवारीतील वर्षांतर **१० वर्षे** आहे.

२. कोणत्या दशकात नागरीकरणाचा कल सर्वात कमी दिसतो?
**१९६१-१९७१**मध्ये नागरीकरणाचा कल सर्वात कमी दिसतो.

३. कोणत्या दशकात नागरीकरणाचा कल सर्वात जास्त आहे?
**१९७१-१९८१** मध्ये नागरीकरणाचा कल सर्वात जास्त आहे.

**किंवा**

**(आ) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:** ६

**प्रश्नः**

१. वरील दोन्ही आलेख काय दर्शवितात?
वरील दोन्ही आलेख **ब्राझील व भारत या देशांची लिंग गुणोत्तर** रचना दर्शवितात.

२. कोणत्या देशात पुरुषांची संख्या जास्त आहे?
**भारत** या देशात पुरुषांची संख्या जास्त आहे.

३. कोणत्या देशात दरहजारी स्त्रियांची संख्या जास्त आहे?
**ब्राझील** या देशात दरहजारी स्त्रियांची संख्या जास्त आहे.

४. २००१ नंतरकोणत्या देशाच्या स्त्रियांची संख्या झपाट्याने वाढले आहे?
२००१ नंतर **ब्राझील** या देशातील स्त्रियांची संख्या झपाट्याने वाढली आहे.

५. १९६१ साली भारतातील दरहजारी स्त्रियांची संख्या किती होती?
१९६१ साली भारतातील दरहजारी स्त्रियांची संख्या **९४०** एवढी होती.

६. कोणत्या देशात दरहजारी स्त्रियांची संख्या १००० पेक्षा जास्त आहे?
**ब्राझील** या देशात दरहजारी स्त्रियांची संख्या १००० पेक्षा जास्त आहे.

**प्रश्न ७. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन):** ८

**१. क्षेत्रभेटी दरम्यान कचऱ्याचे व्यवस्थापन कसे कराल?**

i) आपण भेट देतो त्या ठिकाणच्या स्वच्छतेला गालबोट लागणार नाही असे वर्तन करणे ही आपली नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे.
ii) त्यामुळे क्षेत्रभेटीदरम्यान आपल्या हातून कचरा इकडे-तिकडे फेकला जाणार नाही, याची काळजी घ्यावी.
iii) खाण्याचे रिकामे पुडे, पाकिटे, पाण्याच्या बाटल्या, उरलेले अन्नपदार्थ कचरापेटीत टाकावेत. तसेच ओला आणि सुका कचरा वेगवेगळ्या पेट्यांमध्ये टाकावा.
iv) आपल्यासोबत कचरा टाकण्यासाठी मोठ्या आकाराच्या पिशव्या घेऊन जाव्यात जेणेकरून क्षेत्रभेटीच्या ठिकाणी कचरापेटी उपलब्ध नसल्यास किंवा ती पूर्ण भरलेली असल्यास आपण केलेला कचरा या पिशव्यांमध्ये टाकून नंतर त्या पिशव्यांची योग्य ती विल्हेवाट लावता येईल.

**२. भारत व ब्राझील या देशांमधील हवामानाची तुलना करा.**

i) भारतात मान्सून प्रकारचे हवामान आढळते. याउलट ब्राझील देशात उष्ण कटिबंधीय स्वरूपाचे हवामान आढळते.
ii) सर्वसाधारणपणे भारताच्या दक्षिण भागात तुलनेने जास्त तापमान व उत्तर भागात तुलनेने कमी तापमान आढळते. याउलट, ब्राझील देशाच्या उत्तर भागात तुलनेने जास्त तापमान दक्षिण भागात तुलनेने कमी तापमान आढळते.
iii) सर्वसाधारणपणे भारताच्या दक्षिण भागात पर्जन्याचे प्रमाण तुलनेने अधिक व उत्तर भागात पर्जन्याचे प्रमाण तुलनेने कमी असते. याउलट, ब्राझीलच्या उत्तर भागात पर्जन्याचे प्रमाण तुलनेने अधिक व दक्षिण भागात पर्जन्याचे प्रमाण तुलनेने कमी असते.
iv) सर्वसाधारणपणे भारताच्या किनारपट्टीच्या प्रदेशात उष्ण व दमट हवामान आढळते. याउलट, ब्राझीलच्या पूर्व किनारपट्टीच्या प्रदेशात तुलनेने सौम्य व समशीतोष्ण हवामान आढळते

**३. भारत व ब्राझील या देशात चालणाऱ्या मासेमारी व्यवसायातील साम्य व फरक लिहा.**

भारत व ब्राझील या देशात चालणाऱ्या मासेमारी व्यवसायातील साम्य

i) भारत व ब्राझील या दोन्ही देशांना अनुक्रमे हिंदी महासागर, अटलांटिक महासागर यांचे सान्निध्य लाभले आहे.
ii) दोन्ही देशांच्या किनारपट्टीच्या भागात व्यवसाय विकसित झाला आहे.
iii) दोन्ही देशांत खोल सागरी (खाऱ्या पाण्यातील) मासेमारी मोठ्या प्रमाणात चालते.

भारत व ब्राझील या देशात चालणाऱ्या मासेमारी व्यवसायातील फरक

i) भारतात नद्या, कालवे, तलाव इत्यादींमध्ये गोड्या पाण्यातील मासेमारी व मत्स्यपालन केले जाते.परंतु ब्राझीलमध्ये नदी परिसरातील प्रतिकूलतेमुळे गोड्या पाण्यातील मासेमारी फारशी विकसित झालेले नाही.
iii) भारतात खाऱ्या पाण्यातील मासेमारी व्यवसाय अनुकूल घटकांमुळे विकसित झाला आहे तर ब्राझीलच्या किनाऱ्याजवळ उष्ण व थंड सागरी प्रवाह एकत्र आल्याने मासेमारीचा पोषक परिस्थिती आहे.

**लेखक – पद्माकर हिरोजी हिरनाईक**
प्राचार्य जनार्दन लक्ष्मण शिर्सेकर शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व)
**समन्वयक – जगदीश इंदलकर** (के. व्ही. के. घाटकोपर स्कूल)

**उद्याचा विषय : विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग १**

महा मेट्रो
PUNE METRO

## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.

(केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त प्रकल्प)

**पुणे मेट्रो रेल प्रकल्प**

१०१, दी ओरियन, डॉन बास्को युथ सेंटर समोर, कोरेगाव पार्क, पुणे ४११००१. दूरध्वनी : ०२०-२६०५१०७२

ई-मेल : tenders.pmrp@mahametro.org | www.punemetrorail.org

**निविदा सूचना क्र. P1S-03/2021 दिनांक 29.11.2021**

**कामाचे स्वरूप :** पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्स सिस्टीमचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वयन

**निविदा प्रपत्रांची किंमत :** रु. ४७,२००/- (रुपये सत्तेचाळीस हजार दोनशे मात्र) जीएसटीसह

इच्छुक निविदाकारांनी पुणे मेट्रो रेलच्या www.punemetrorail.org या संकेतस्थळाला भेट द्यावी अथवा **दि. २९.११.२०२१ रोजी १६:००** पासून https://mahametrorail.etenders.in या आमच्या ई-टेंडर पोर्टलवरून निविदा प्रपत्रे डाउनलोड करून घ्यावी आणि निविदेविषयीची अधिक माहिती घ्यावी.

कार्यकारी संचालक (निविदा व करार)
महा-मेट्रो

**महा मेट्रो, हरित मेट्रो**



## SBI

**भारतीय स्टेट बँक**

**परिसर व मालमत्ता विभाग, स्थानिक मुख्य कार्यालय मुंबई मेट्रो**

**3रा मजला, भारतीय स्टेट बँक, स्थानिक मुख्य कार्यालय, सिनर्जी बिल्डींग, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400 051**

**भारतीय स्टेट बँक, सिनर्जी, बीकेसी एलएचओ, मुंबई येथे संखेने एक असणाऱ्या 300 टीआर चिलरचा पुरवठा आस्थापन परीक्षण व कार्यान्वान**

भारतीय स्टेट बँक **"भारतीय स्टेट बँक, सिनर्जी, बीकेसी, मुंबई मेट्रो सर्कल येथे 300 टीआर चिलर सिस्टीमचा"** पुरवठा, आस्थापन, परीक्षण व कार्यान्वान यासाठी ओइएम आणि त्यांचे अधिकृत वितरक यांचाकडून ऑफर्स मागवित आहे. अधिक माहितीसाठी आणि निविदा दस्तऐवज डाऊनलोड करण्यासाठी बँकेच्या वेबसाईट **www.sbi.co.in** खालील इम्पॉर्टन्ट लिंक 'प्रोक्युरमेन्ट ॲण्ड अदर्स'ला भेट द्या. या कार्यालयात ऑफर सादर करण्यासाठी शेवटची तारीख **16/12/2021** रोजी **दुपारी 3.00** ही किंवा त्यापूर्वी असेल. यासंदर्भात पुढील सूचना/स्पष्टीकरण हे फक्त बँकेच्या वर नमूद केलेल्या वेबसाईटवरच मांडण्यात येईल.

**सहायक महाववस्थापक (पीॲण्डई)**



## BHIMASHANKAR SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD.

Dattatraynagar, Pargaon Via Awasari Bk., Tal - Ambegaon, Dist-Pune pin 412406 (Maharashtra), Phone No.: 9975568130, 8888846990
E-mail: bsskltd@gmail.com **Website : bsskl.sets.co.in**

### E-Tender Notice

We are inviting e-tenders for 16 MW STG Set & Upgradation of Existing boilers. (Excluding civil works), Switchyard and Electrical Works. (Including civil works) & DM Plant upgradation (Excluding civil works) For details of e-tenders visit to our **website : bsskl.sets.co.in.**

**Managing Director** **Vice Chairman** **Chairman**


## टाटा कॅपिटल फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लि.

TATA

शाखेचा पत्ताः 902 - 906, क्वान्टम टॉवर, चिंचोली, गोविंदजी श्रॉफ मार्ग, मालाड पश्चिम, मुंबई 400064

**दिनांकः 29 नोव्हेंबर, 2021**

प्रति,

1. **अगोग टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड**
   **द्वारे त्यांचे प्राधिकृत स्वाक्षरीकार दर्पण जयराज काळे**
   सीटीएस क्र. 371, तिसरा व चौथा मजला, मोरया गावडे कमर्शियल कॉम्प्लेक्स, चापेकर चौक, चिंचवड, पुणे - 411033.
2. **श्री दर्पण जयराज काळे,**
   स.क्र. 165/2, 166, जयंत अपार्टमेंट, बिल्डींग 68, सदनिका क्र. 4, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे - 411033
3. **चिराग सुहास कोरडे**
   सदनिका क्र. 3, सावली बिल्डींग, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे 411033
4. **देवेश ठाकूर**
   सीटीएस क्र. 371, तिसरा व चौथा मजला, मोरया गावडे कमर्शियल कॉम्प्लेक्स, चिंचवड, पुणे - 411033.

**विषयः अचल अनामत मत्तेच्या विक्रीसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) आणि नियम 8(8) अंतर्गत सूचना**

प्रिय महोदय,

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी मे. टाटा कॅपिटल फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड (यापुढे **'सुरक्षित धनको'** असा उल्लेख करण्यात येईल) यांचे वतीने आपणांस आपल्या संपत्तीवरील कर्ज खाते क्र. 3139359 च्या संदर्भात सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यापुढे 'सदर अधिनियम' असा उल्लेख करण्यात येईल) मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत **दि. 16 फेब्रुवारी, 2018** रोजी मागणी सूचना पाठविली ज्यात आपणांस त्यात नमूद कालावधीत संपूर्ण थकबाकीचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. प्रेषितींनी विहित कालावधीत सदर सूचनेचे पालन न केल्याने प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (4) अंतर्गत **दि. 6 ऑगस्ट, 2018** रोजी अचल मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

**मालमत्तेचे वर्णनः**

**सदनिका क्र. 1801 व 1802, चटई क्षेत्रफळ सुमारे 1248 चौ.फू. आणि सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे 1747 चौ.फू., अठरावा मजला, अमरनाथ टॉवर, सात बंगला बगिच्याजवळ, संजीव इस्टेट एन्क्लेव्ह, जे.पी.रोडच्या पलीकडे, अंधेरी पश्चिम, मुंबई - 400058. चतुःसीमा (दि. 09/01/2000 च्या करारात अधिक तपशील दिलेला आहे) पूर्वेसः मोकळे आकाश, पश्चिमेसः इतर, उत्तरेसः लिफ्ट आणि दक्षिणेसः मोकळे आकाश.**

सुरक्षित धनकोने आपल्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत वर नमूद तारण मालमत्तेच्या विक्रीसाठी चार वेळा जाहीर लिलाव सूचना जारी केलेल्या होत्या. पहिली जाहीर लिलाव सूचना **दि. 20 जानेवारी, 2019** रोजी जारी करण्यात आली होती. आपणास असे सूचित करण्यात आले होते की अनुच्छेद 13(2) अंतर्गत सूचनेत मागणी केलेल्या संपूर्ण रकमेचा भरणा न केल्यास सुरक्षित धनकोद्वारे **दि. 20 फेब्रुवारी, 2019** रोजी जाहीर लिलावाद्वारे तारण मालमत्तेची विक्री करण्यात येईल. सुरक्षित धनकोस पहिल्या लिलावासाठी एकही बोली प्राप्त झाली नाही. दुसरी जाहीर लिलाव सूचना **दि. 21 जून, 2019** रोजी जारी / प्रकाशित करण्यात आली होती. आपणास असे सूचित करण्यात आले होते की आपण मागणी केलेल्या संपूर्ण रकमेचा भरणा न केल्यास सुरक्षित धनकोद्वारे दि. 8 जुलै, 2019 रोजी जाहीर लिलावाद्वारे तारण मालमत्तेची विक्री करण्यात येईल. तिसरी जाहीर लिलाव सूचना **1 ऑक्टोबर, 2020** रोजी जारी / प्रकाशित करण्यात आली होती. आपणास असे सूचित करण्यात आले होते की आपण मागणी केलेल्या संपूर्ण रकमेचा भरणा न केल्यास सुरक्षित धनकोद्वारे दि. 21 ऑक्टोबर, 2020 रोजी जाहीर लिलावाद्वारे तारण मालमत्तेची विक्री करण्यात येईल.चौथी जाहीर लिलाव सूचना **11 नोव्हेंबर, 2020** रोजी जारी / प्रकाशित करण्यात आली होती. आपणास असे सूचित करण्यात आले होते की आपण मागणी केलेल्या संपूर्ण रकमेचा भरणा न केल्यास सुरक्षित धनकोद्वारे दि. **28 नोव्हेंबर, 2020** रोजी जाहीर लिलावाद्वारे तारण मालमत्तेची विक्री करण्यात येईल.

आता, सुरक्षित धनकोस खाजगी तडजोडीच्या माध्यमातून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 - उप-नियम 8 च्या तरतुदींच्या अनुषंगाने एका प्रस्तावित खरेदीदाराकडून अनामत मत्तेच्या **रु. 3,03,00,000/- (रुपये तीन कोटी तीन लक्ष फक्त)** एवढ्या रकमेस खरेदीसाठी प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

वरील परिस्थिती पाहता सुरक्षित धनकोद्वारे आपणांस दि. **16 फेब्रुवारी, 2018** रोजीनुसार थकबाकी **रु. 2,34,63,469 (रुपये दोन कोटी चौतीस लक्ष त्रेसष्ट हजार चारशे एकोणसत्तर फक्त)** एवढ्या रकमेचा तीवरील लागू पुढील व्याज व शुल्कांसह सद्य सूचनेच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात येते, तसे न केल्यास प्राधिकृत अधिकारी वर नमूद केल्याप्रमाणे खाजगी तडजोडीद्वारे तारण मालमत्तेच्या विक्रीसाठी पुढील पावले उचलण्यास स्वतंत्र असतील.

*कृपया लक्षात घ्यावे की यापूर्वीची रु. 3,02,00,000/- (रुपये तीन कोटी दोन लक्ष फक्त) साठी खाजगी तडजोड रद्द करण्यात / मागे घेण्यात आलेली असून वरील परिच्छेदामध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमेसाठी टीसीएफएसएल यांना प्राप्त झालेला सद्य प्रस्ताव हा नवीन आहे.*

**आपला,**

**दिनांकः 29 नोव्हेंबर, 2021**
**स्थानः मुंबई, महाराष्ट्र**

**प्राधिकृत अधिकारी**
**(श्री सचिन भालेकर)**
**टाटा कॅपिटल फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड**

## यूनियन बैंक ऑफ इंडिया / Union Bank of India

भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

आन्ध्रा Andhra   कार्पोरेशन Corporation

**पतवसुली तसेच कायदेशीर सेवा विभाग**

**प्रादेशिक कार्यालय :**
**६/७, जीवन प्रकाश, एल.आय.सी. बिल्डिंग, शिवाजीनगर, पुणे ४११००५ महाराष्ट्र फोन - ०२० - २५५५२०१३**

# स्थावर व जंगम मालमत्तेच्या विक्री साठी मेगा ई-लिलाव सूचना

**सेक्युरिटायझेशन आणि वित्तीय मालमत्ताचे पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा (२००२) त्यासह वाचल्या जाणाऱ्या सेक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम २००२ मधील नियम ८(६) च्या अंमलबजावणी अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्री साठी ई- लिलाव द्वारे जाहीर सूचना**

**सदर नोटीस द्वारे सर्व साधारण जनतेस आणि विशेषतः कर्जदार आणि जामिनदारास सूचना देण्यात येते की** खाली नमुद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण / ताब्यात असुन, युनियन बँक ऑफ इडिया (सुरक्षित धनको), याचे अधिकृत अधिकारी यांनी सदर मालमत्तांचा विधायक / प्रत्यक्ष ताबा (जसे लागु असेल त्याप्रमाणे) घेतला असुन सदर मालमत्तांची **जे आहे जेथे आहे, जे आहे जसे आहे आणि जे काही आहे तेथे आहे** या तत्वावर खाली नमुद केलेल्या परिशिष्टानुसार ई-लिलाव प्लॅटफॉर्म द्वारे होईल. मालमत्तेच्या विक्री साठीची राखीव किंमत तसेच अनामत रक्कम खाली नमुद केलेली आहे.

| अ. क्र. | शाखेचे नाव | कर्जदारांचे / हमीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत | अनामत रक्कम रूपये | बोली खालील रकमेनुसार वाढविली जाईल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे कॅम्प (०१३२२) | **उन्नती मेन्झ बायोटेक डेअरी प्रा. ली.** (प्रतिकात्मक ताबा) | **रु. १३,३०,०३,९९५/- (रुपये तेरा करोड तीस लाख तीन हजार नऊशे पंच्याण्णव मात्र) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | खालील मालमत्तेचा सर्व समावेशक भाग - जमीन व इमारत ही सदर प्लांट व मशिनरीसह गट क्र. १७८, जवळी, तालुका - लोहारा, जिल्हा - उस्मानाबाद, महाराष्ट्र. जवळी ग्रामपंचायत हद्दीतील व सदर जागेवर उभारलेल्या सिव्हिल इन्फ्रास्ट्रक्चर सह | रू. १३,९२,००,०००/- (रुपये तेरा करोड ब्याण्णव लाख मात्र) | रू. १,३९,२०,०००/- (रुपये एक करोड एकोणचाळीस लाख वीस हजार मात्र) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| २ | खडकवासला शाखा (१४०३२) | **श्री. संदिप अमृत पाटील** (प्रतिकात्मक ताबा) | **रु. २४,२१,३८८/- (रुपये चोवीस लाख एकवीस हजार तीनशे अठ्ठयांशी मात्र) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | साई मॅजेस्टिक, सदनिका क्र. ३०६, तिसरा मजला, सर्व्हे क्र. २८/२१/२/१६, ऑफ कात्रज - मुंबई बायपास हायवे, आंबेगाव बुद्रुक, पुणे - ४११०४६ | रु. ३५,००,०००/- (रुपये पस्तीस लाख मात्र ) | रु. ३,५०,०००/- (रुपये तीन लाख पन्नास हजार मात्र ) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| ३ | विश्रांतवाडी शाखा (६०६००) | **श्रीमती दीपा जमशेद कॉन्ट्रैक्टर** (प्रतिकात्मक ताबा) | **रु. २१,९७,२३३/- (रुपये एकवीस लाख सत्यांन्नव हजार दोनशे तेहतीस मात्र ) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | खालील मालमत्तेचा सर्व समावेशक भाग - ज्युबिलेशन स्कीम सर्व्हे क्र. ९ / १अ / २ जुना सर्व्हे क्र. ३९/२, कोंढवा बुद्रुक, गाव - येवलेवाडी,ता. हवेली, जिल्हा - पुणे येथील फ्लॅट क्र. ७०४, सातवा मजला, बी विंग, ज्याचे क्षेत्रफळ ३८५ स्के. फूट (३५.७८ स्के. मी.) | रु. २३,५०,०००/- (रुपये तेवीस लाख पन्नास हजार मात्र) | रु. २,३५,०००/- (रुपये दोन लाख पस्तीस हजार मात्र) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| ४ | विश्रांतवाडी शाखा (६०६००) | **श्री. संदिप बबनराव तावरे** (प्रतिकात्मक ताबा) | **रु. १२,५१,९०३/- (रुपये बारा लाख एक्कावन्न हजार नऊशे तीन मात्र ) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | खालील मालमत्तेचा सर्व समावेशक भाग - रहिवासी फ्लॅट क्र. १०४, पहिला मजला, योगीराज कॉम्प्लेक्स, सर्व्हे नं. २३१, हिस्सा नं. १अ, अंदाजे क्षेत्र ३७४ स्के. फूट (३४.७५ स्के. मी.) गाव - हडपसर, तालुका - हवेली, स्वरविहार जवळ, ससाणेनगर, पुणे. | रु. १४,२०,०००/- (रुपये चौदा लाख वीस हजार मात्र) | रु. १,४२,०००/- (रुपये एक लाख बेचाळीस हजार मात्र) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| ५ | विमान नगर, पुणे (५४४३०) | **अजय एम. विश्वकर्मा** (प्रत्यक्षात ताबा) | **रु. ५५,२७,११५/- (रुपये पंचावन्न लाख सत्तावीस हजार एकशे पंधरा मात्र ) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | फ्लॅट क्र. - ९ तसेच ॲटॅच टेरेस, दुसरा मजला, सनी हाईटस, प्लॉट क्र. - ३६ हिस्सा क्र. १/१ तसेच १/२, गल्ली क्र. १०, टिंगरे नगर , धानोरी, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे | रु. ३१,३२,०००/- (रुपये एकतीस लाख बत्तीस हजार मात्र) | रु. ३,१३,२००/- (रुपये तीन लाख तेरा हजार दोनशे मात्र) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| ६ | विमान नगर, पुणे (५४४३०) | **नागेश वाय. देसाई** (प्रत्यक्षात ताबा) | **रु. ३७,२७,८८७/- (रुपये सदोतीस लाख सत्तावीस हजार आठशे सत्यांशी मात्र ) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | शॉप नं, २, तळ मजला, सनी हाईटस, प्लॉट क्र. - ३६, हिस्सा क्र. १/१ तसेच १/२, गल्ली क्र. १०, टिंगरे नगर , धानोरी, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे | रु. २२,५०,०००/- (रुपये बावीस लाख पन्नास हजार मात्र) | रु. २,२५,०००/- (रुपये दोन लाख पंचवीस हजार मात्र) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| ७ | विमान नगर, पुणे (५४४३०) | **पंकज एम. रौतेला** (प्रत्यक्षात ताबा) | **रु. ५९,९५,०५८/- (रुपये एकोणसाठ लाख पंच्यान्नव हजार अठ्ठावन्न मात्र ) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | फ्लॅट क्र. - १० तसेच ॲटॅच टेरेस, तीसरा मजला, सनी हाईटस, प्लॉट क्र. - ३६ हिस्सा क्र. १/१ तसेच १/२, गल्ली क्र. १०, टिंगरे नगर , धानोरी, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे | रु. ३२,४०,०००/- (रुपये बत्तीस लाख चाळीस हजार मात्र) | रु. ३,२४,०००/- (रुपये तीन लाख चोवीस हजार मात्र) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| ८ | पुणे मुख्य शाखा (०१३२२) | **श्री. विनायक शांताराम जाधव** (प्रत्यक्षात ताबा) | **रु. २२,५९,५८२/- (रुपये बावीस लाख एकोणसाठ हजार पाचशे ब्यांशी मात्र ) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | रहिवासी फ्लॅट क्र. १४, पहिला मजला, एफ - १ बिल्डिंग, राधानगरी को. ऑप. हाऊसिंग सोसायटी ली., सर्व्हे नं. २२७/०१, सी. टी. एस. क्र. ४४६०, सॅण्डविक कॉलनी, दिघी रोड, भोसरी पी.सी.एम.सी., पुणे. | रु. २१,८६,०००/- (रुपये एकवीस लाख शह्यांशी हजार मात्र) | रु. २,१८,६००/- (रुपये दोन लाख अठरा हजार सहाशे मात्र) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| ९ | खडकवासला शाखा (१४०३२) | **श्री. कृष्णा मारुती गुरव** (प्रतिकात्मक ताबा) | **रु. ७,१२,०५८/- (रुपये सात लाख बारा हजार अठ्ठावन्न मात्र ) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | स्टार सिटी को-ऑप हाऊसिंग सोसायटी ली. येथील फ्लॅट क्र. जी-१, पहिला मजला, बिल्डिंग क्र. ६, शिरवळ, तालुका - खंडाळा, सातारा - ४१२८०१ | रु. १०,५०,०००/- (रुपये दहा लाख पन्नास हजार मात्र) | रु. १,०५,०००/- (रुपये एक लाख पाच हजार मात्र) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| १० | सोमवार पेठ (०७८५२) | **श्री. रमेश श्रीरंग आदमाने** (प्रतिकात्मक ताबा) | **रु. ८,४०,०९३/- (रुपये आठ लाख चाळीस हजार त्र्यांनो मात्र ) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | सदनिका क्र. ४४, तिसरा मजला, बिल्डिंग क्र. जे, गणराज को-ऑप हाऊसिंग सोसायटी ली. सर्व्हे क्र. ३१४अ/६अ + ३१४अ/६ब + १०६अ/१/५, सी.टी.एस. क्र. १९३३, किर्लोस्कर ब्रिज व यश होंडा शोरुम जवळ, हडपसर, पुणे. (एरिया ५५० स्के. फूट) | रु. २१,९३,०००/- (रुपये एकवीस लाख त्र्यांन्नव हजार मात्र) | रु. २,१९,३००/- (रुपये दोन लाख एकोणिस हजार तिनशे मात्र) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| ११ | औंध शाखा (१३९९२) | **मे. समर्थश्री प्रमोटर्स अँड् डेव्हलपर्स** (प्रतिकात्मक ताबा) | **रु. ७५,८३,६१७/- (रुपये पंचाहत्तर लाख त्र्यांशी हजार सहाशे सतरा मात्र ) तसेच त्यावरील व्याज आणि ईतर खर्च** | दुकान क्र. ३०१, केशव कॅपिटल या प्रकल्पातील ३२.२७५ स्के. मीटर सर्व्हे क्र. ५/१/बी/१ गाव - मुंढवा, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे सदरच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे - पुर्वेच्या बाजुने - सदर ले-आउट मधील प्लॉट क्र. २ दक्षिणेच्या बाजुने - २४ मीटर रुंद रस्ता पश्चिमेच्या बाजुने-हिस्सा क्र. ६ मधील उर्वरीत भाग उत्तरेच्या बाजुने-सदर ले-आउट मधील प्लॉट क्र. १ | रु. ३४,५०,०००/- (रुपये चौतीस लाख पन्नास हजार मात्र ) | रु. ३,४५,०००/- (रुपये तीन लाख पंचेचाळीस हजार मात्र ) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| | | | | दुकान क्र. ३०५, केशव कॅपिटल या प्रकल्पातील ३२.२७५ स्के. मीटर सर्व्हे क्र. ५/१/बी/१ गाव - मुंढवा, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे सदरच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे - पुर्वेच्या बाजुने - सदर ले-आउट मधील प्लॉट क्र. २ दक्षिणेच्या बाजुने - २४ मीटर रुंद रस्ता पश्चिमेच्या बाजुने-हिस्सा क्र. ६ मधील उर्वरीत भाग उत्तरेच्या बाजुने-सदर ले-आउट मधील प्लॉट क्र. १ | रु. ३६,००,०००/- (रुपये छत्तीस लाख मात्र ) | रु. ३,६०,०००/- (रुपये तीन लाख साठ हजार मात्र ) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| | | | | दुकान क्र. ४०२, केशव कॅपिटल या प्रकल्पातील ३६.५८५ स्के. मीटर सर्व्हे क्र. ५/१/बी/१ गाव - मुंढवा, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे सदरच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे - पुर्वेच्या बाजुने - सदर ले-आउट मधील प्लॉट क्र. २ दक्षिणेच्या बाजुने - २४ मीटर रुंद रस्ता पश्चिमेच्या बाजुने-हिस्सा क्र. ६ मधील उर्वरीत भाग उत्तरेच्या बाजुने-सदर ले-आउट मधील प्लॉट क्र. १ | रु. ३७,००,०००/- (रुपये सदोतीस लाख मात्र ) | रु. ३,७०,०००/- (रुपये तीन लाख सत्तर हजार मात्र ) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |
| | | | | दुकान क्र. ४०५, केशव कॅपिटल या प्रकल्पातील ३२.२७५ स्के. मीटर सर्व्हे क्र. ५/१/बी/१ गाव - मुंढवा, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे सदरच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे - पुर्वेच्या बाजुने - सदर ले-आउट मधील प्लॉट क्र. २ दक्षिणेच्या बाजुने - २४ मीटर रुंद रस्ता पश्चिमेच्या बाजुने-हिस्सा क्र. ६ मधील उर्वरीत भाग उत्तरेच्या बाजुने-सदर ले-आउट मधील प्लॉट क्र. १ | रु. ३८,००,०००/- (रुपये अठ्ठावीस लाख मात्र ) | रु. ३,८०,०००/- (रुपये तीन लाख ऐंशी हजार मात्र ) | रु.२५०००/- (रु. पंचवीस हजार) |

**ई - लिलाव विक्री संबंधीच्या विक्री व शाखेसंबंधी अधिक माहिती तसेच रजिस्ट्रेशन, लॉगीन व बिडींग संबंधी नियम व अटी जाणुन घेण्यासाठी पुढील पोर्टल वर संपर्क करा :** https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp

**लिलावा मध्ये सहभाग घेणाऱ्या सर्वांनी वर दिलेल्या लिंक वर जाऊन रजिस्ट्रेशन , KYC तसेच पेमेंट संबंधी सर्व तरतुदी लिलावापुर्वी ३ ते ४ दिवस अगोदर कराव्यात, जेणेकरुन ऐन वेळची गैरसोय टाळता येईल.**

**ई - लिलाव दिनांक १६/१२/२०२१ रोजी दुपारी १ ते ५ दरम्यान होईल.**

स्थळ : पुणे
तारीख : २६.११.२०२१

**टिप : स्वैर भाषांतर तफावत असल्यास इंग्रजी जाहिरात पहा.**

**अधिकृत अधिकारी**
**यूनियन बँक ऑफ इंडिया**

## किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रिज लिमिटेड

kirloskar Ferrous

किर्लोस्कर ग्रुप कंपनी
**नोंदणीकृत कार्यालय:** १३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे - ४११ ००३, महाराष्ट्र (भारत).
CIN: L27101PN1991PLC063223

**अतिरिक्त सर्वसाधारण सभा आणि ई-मतदान यासंबंधी सूचना**

**याव्दारे सूचना देण्यात येते की, किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रिज लिमिटेड** (कंपनी) च्या सभासदांची अतिरिक्त सर्वसाधारण सभा (ईजीएम नं. १/२०२१-२०२२) (ईजीएम) **मंगळवार, २१ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता** (भारतीय प्रमाणवेळ) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हिसी) किंवा अन्य दृकश्राव्य सुविधेव्दारे (ओएव्हीएम), तसेच कंपनी कायदा २०१३ (कायदा) त्यातील बदललेले नियम, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) जारी केलेल्या दि. ८ एप्रिल २०२० चे साधारण परिपत्रक क्र.१४/२०२०, दि.१३ एप्रिल २०२० चे साधारण परिपत्रक क्र. १७/२०२० आणि दि. २३ जून २०२१ रोजीचे साधारण परिपत्रक क्र.१०/२०२१ (एकत्रीतपणे एमसीए परिपत्रके) आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाची (सेबी) नियमावली २०१५, त्यातील बदल जारी केलेल्या दि. १२ मे २०२० रोजीच्या परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CMD1/CIR/P/2020/79 आणि दि.१५ जानेवारी २०२१ रोजीच्या परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2021/11 (एकत्रीत पणे सेबी परिपत्रके) नुसार घेण्यात येणार आहे.

एमसीए आणि सेबी परिपत्रकामध्ये मान्यता दिल्याप्रमाणे ईजीएमची सूचना केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते कंपनी किंवा रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट किंवा त्यांचे डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडे नोंदविले आहेत अशांना पाठविले आहे. ईजीएम सभेची सूचना कंपनीच्या www.kirloskarferrous.com आणि बीएसई लिमिटेड www.bseindia.com च्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८, त्यातील नियम, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासकीय) नियम २०१४ च्या कलम २०, सेबी (सूची बंधने व घोषणा गरज) नियमावली २०१५ च्या नियमितीकरण ४४ आणि त्यात वेळोवेळी केलेल्या बदलांनूसार कंपनीने सभासदांना नॅशनल सिक्युरिटीज् डिपॉझिटरी लिमिटेड ('NSDL') यांच्यामार्फत ईजीएमच्या सूचना समाविष्ट प्रस्तावांवर इलेक्ट्रॉनिक स्वरुपात मतदानांची सुविधा उपलब्ध केली आहे. सभासद ईजीएमच्या स्थळाशिवाय ई-मतदान (दूरस्थ ई-मतदान) करु शकतात. दूरस्थ ई-मतदान किंवा ईजीएमच्या वेळी ई-मतदान करण्यासाठी ग्राह्य सभासदांना **मंगळवार, १४ डिसेंबर २०२१** ही कट ऑफ तारीख ग्राह्य धरण्यात येईल.

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासकीय) नियम, २०१४ च्या कलम २० आणि त्यात वेळोवेळी झालेले बदल यांना अनुसरुन सभासदांना खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे :

१) इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ईजीएमची सूचना पाठविण्याची पूर्तता २९ नोव्हेंबर २०२१ ला करण्यात आली आहे.

२) इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान (दूरस्थ ई-मतदान) **शनिवार, १८ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता** (भा.प्र.वे) सुरू होईल आणि **सोमवार, २० डिसेंबर २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता** (भा.प्र.वे) बंद होईल.

३) रिमोट ई-व्होटिंग **सोमवार, २० डिसेंबर २०२१ सायंकाळी ५.०० नंतर** (भा.प्र.वे) करता येणार नाही.

४) ज्या सभासदांची नावे सभासद नोंदवही मध्ये नोंदणीकृत आहेत, किंवा डिपॉझिटरी व्दारे ठेवण्यात आलेल्या लाभार्थी धारक नोंदवही मध्ये आहेत तेच सभासद कट ऑफ तारखे पर्यंत दूरस्थ ई-मतदान किंवा ईजीएमच्या वेळी ई-मतदान करु शकतील.

५) जी व्यक्ती ईजीएमची सूचना पाठविल्यानंतर आणि कट ऑफ तारखे पर्यंत कंपनीचे समभाग धारण केलेली असेल, अशी व्यक्ती लॉग-ईन आणि पासवर्ड मिळविण्यासाठी evoting@nsdl.com वर किंवा pune@linkintime.co.in वर विनंती पाठवू शकते. तथापि जर कोणी व्यक्ती अगोदरच NSDL कडे ई-मतदानासाठी नोंदणीकृत असेल, अशी व्यक्ती सध्याच्या लॉग-ईन आणि पासवर्ड वापरून मतदान करु शकेल. जर एखादी व्यक्ती तिचा पासवर्ड विसरली असेल तर त्या व्यक्तीस पासवर्ड मिळविण्यासाठी 'Forgot User Details / Password' चा पर्याय www.evoting@nsdl.com वर उपलब्ध आहे. सभासद त्यांच्या ओटीपी (वनटाईम पासवर्ड) लॉग-ईन चा वापर करुन NSDL च्या ई-मतदान प्रणालीचा मतदानासाठी उपयोग करु शकतात.

६) ज्या सभासदांनी दूरस्थ ई-मतदान केलेले नाही परंतु ते व्हिसी किंवा ओएव्हिएमची सुविधा वापरुन ईजीएम मध्ये उपस्थित राहतील, अशा सभासदांना ईजीएम मध्ये ई-मतदानाचा अधिकार उपलब्ध असेल.

७) ज्या सभासदांनी आपले मत दूरस्थ ई-मतदानाव्दारे नोंदविले असेल असे सभासद व्हिसी किंवा ओएव्हिएमची सुविधा वापरुन ईजीएम मध्ये हजर राहू शकतील, परंतु त्यांना ईजीएम मध्ये पुन्हा मतदान करता येणार नाही.

८) इलेक्ट्रॉनिक मतदानाची आणि व्हिसी किंवा ओएव्हिएमची सुविधा वापरुन ईजीएम मध्ये हजर राहण्याची प्रक्रिया ईजीएमच्या सूचनेमध्ये दिलेली आहे. ईजीएमची सूचना www.kirloskarferrous.com तसेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com आणि NSDL च्या www.evoting@nsdl.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

९) दूरस्थ ई-मतदानासंबंधी काही प्रश्न असतील तर सभासद वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि ई-मतदान करण्यासठी सभासदांना उपयोगी पडणारी नियमावली www.evoting@nsdl.com च्या मदत विभागावर पाहू शकतात किंवा मोफत टोल फ्री नं. १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४३० वर संपर्क करु शकतात. ज्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे मतदान करण्यात दिल्या जाणाऱ्या सुविधांवर समस्या असतील त्यांनी त्या सोडविण्यासाठी कृपया श्रीमती पल्लवी म्हात्रे, सहाय्यक व्यवस्थापक, नॅशनल सिक्युरिटीज् डिपॉझिटरी लिमिटेड, ४था मजला, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३, ई-मेल evoting@nsdl.co.in वर संपर्क करु शकतात. सभासद कंपनी सचिवांना kfilinvestor@kirloskar.com या ई-मेल वर लिहू शकतात किंवा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क करु शकतात.

**किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रिज लिमिटेड** करिता
सही/-
**मयुरेश घारपुरे**
कंपनी सचिव

दिनांक : २९ नोव्हेंबर २०२१
स्थळ : पुणे

• **दूरध्वनी :** + ९१ २० ६६०८४६४५ • **दूरभाष:** + ९१ २० २५८१३२०८
• **ई-मेल :** kfilnvestor@kirloskar.com • **संकेतस्थळ:** www.kirloskarferrous.com

Mark bearing word "Kirloskar" in any form as a suffix or prefix is owned by 'Kirloskar Proprietary Limited' and 'Kirloskar Ferrous Industries Limited' is the Permitted User.

# लोकमानस

loksatta@expressindia.com

## विरोधी पक्ष म्हणून भाजपने विधायक काय केले?

**'महाविकास आघाडी'** सरकारच्या दोन वर्षे पूर्तीचा वेध घेणारा लोकसत्ता (अंक २८ नोव्हेंबर) वाचला. यात सरकारच्या बाजूने केलेले भाष्य समयोचित होते. पण विरोधी पक्षाची बाजू मांडणाऱ्या लेखांमध्ये टीकेव्यतिरिक्त या सरकारची कामगिरी मांडली गेली असती तर अधिक उत्तम झाले असते कारण सरकारबरोबरच विरोधी पक्ष या भाजपच्या भूमिकेलाही दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात विरोधी पक्ष म्हणून भाजपने काय दिवे लावले हे जनतेला कळले असते तर ते अधिक रोचक झाले असते. भाजप आजही सत्ता हातून निसटल्याच्या सुतकातून बाहेरच आलेला दिसत नाही. जनतेचा कौल या तीन पक्षांना नव्हता अशी खदखद व्यक्त करताना आशीष शेलार हे का स्पष्ट करत नाहीत की पुरेशा संख्याबळाअभावी तो त्यांच्याही पक्षाला नव्हता. मग त्यांना आपल्या मित्रपक्षाला बरोबर घेण्यात आलेले अपयश ते का लपवतात? मुलीवर लग्नाची जबरदस्ती, पण संसार मीच चालवणार, तुला रांधा वाढा खरकटी काढा हीच कामे करावी लागतील या अटींवर कोण सोयरीक जुळवेल? तरीही तुम्ही दादांशी हातमिळवणी करत दीड दिवसांच्या सरकारचा विक्रम महाराष्ट्राच्या इतिहासात नोंदलाच ना? त्यालाही दोन वर्षे झाली. त्याचे मूल्यमापन महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेने भाजपची विश्वासदर्शक ठळक कामगिरी असे करायचे का?

गेल्या दोन वर्षांत सरकार अभूतपूर्व अशा वैश्विक महासाथीशी झुंजत असताना विरोधी पक्ष विविध आंदोलने करून सरकारला अडचणीतच आणताना महाराष्ट्राने पाहिला. फडणवीस महाराष्ट्रभर दौरे काढत होते त्याऐवजी एकदा दिल्लीत जाऊन महाराष्ट्राची जीएसटीची थकबाकी घेऊन आले असते तर इथल्या सरकारची बोलती बंद झाली असती. सुधीर मुनगंटीवार यांनी 'दोन वर्षांत करोनामुळे राज्य सरकारला आर्थिक तूट किंवा कर्ज जास्त घ्यावे लागले यात काही अंशी सत्यता आहे', हे आपल्या लेखात कबूल करण्याचा मोठेपणा दाखवला आहे. पण त्याच वेळी कंगना राणावत, अर्णव गोस्वामी, समीर वानखेडे ही भुतावळ महाराष्ट्राच्या माथी कोणी मारली हेही कबूल करायला हवे होते. सुशांतसिंग राजपूतच्या आत्महत्येचा बिहारच्या निवडणुकीत वापर केला गेला, पण सीबीआयने आजतागायत त्याचा तपासणी अहवाल का सादर केला नाही? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे भाजपला द्यावीच लागतील.

– **ॲड. एम. आर. सबनीस,** अंधेरी (मुंबई)

## विरोधकांची आंदोलने, यात्रा यांचे फलित काय?

**'वर्धापनाच्या तुटीची** जमा' या समर्पक शीर्षकाचा आजचा अग्रलेख संतुलित आहे. मी भाजपचा पारंपरिक मतदार. परंतु कोणताही प्रशासकीय अनुभव नसलेल्या उद्धव ठाकरे यांनी ज्या धीराने गेली दोन वर्षे राज्यकारभार सांभाळला त्याचे कौतुक करायलाच हवे. त्याच जोडीला आरोग्यमंत्री राजेश टोपे यांची कामगिरीही उल्लेखनीय म्हणावी लागेल. या संकटकाळात नितीन गडकरी यांनी राज्याला थोडाफार आधार दिला. मात्र सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या भाजपचे या काळातील वर्तन संपूर्णपणे बेजबाबदारपणाचे आणि अतिशय आक्रस्ताळे होते. हे उघडा, ते चालू करा, विजेची बिले कमी करा अशी अनेक आंदोलने केली गेली आणि गुंडाळलीही गेली. ठिकठिकाणी तथाकथित यात्रा काढल्या गेल्या त्यांचे फलित काय? रोजच्या रोज विविध वृत्तवाहिन्यांवर चमकून तारस्वरात टीका करणाऱ्या विरोधी पक्षाने करोनासंकटात राज्यासाठी आणि येथील जनतेसाठी नक्की काय केले याचा लेखाजोखा मांडायला हवा. मतदारांचे सगळीकडे लक्ष असते याचे भान प्रत्येक राजकीय पक्षाने ठेवावे.

– **अभय विष्णू दातार,** मुंबई

## कमलाकरांचा भविष्यवेध

**पहाटेच्या स्वप्नाला** दोन वर्षे झाली. म्हणजेच महाविकास आघाडीच्या उदयाला दोन वर्षे झाली. अर्थातच ज्यांनी सत्तेत येण्याची स्वप्ने पहाटे बघितली त्यांची स्वप्ने सूर्योदय होताच लुप्त पावली. पण, ज्यांना स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते ते मात्र सत्तेत आले.

आज कोसळणार उद्या कोसळणार म्हणता म्हणता दोन वर्षे झाली. 'मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन'चा आलाप लावणाऱ्या पहाटेच्या 'वासुदेवां'च्या पदरी मात्र घोर निराशा पदरी पडलेली आहे. बंद खोलीतील फॉर्म्युला वापरला असता तर, इथून पुढे सहा महिन्यांनी वासुदेवांचे कमळ फुलले असते. अडीच वर्षे सत्तेत असते. आज देशभरात मरगळलेल्या पक्षांना महाराष्ट्रातील राजकारणाने ऊर्जितावस्था दिली. त्याचे प्रत्यंतर पोटनिवडणुकीच्या निकालानंतर दिसलेच आहे. तीनचाकी रिक्षा काय किंवा अन्य अनेक विशेषणांनी महाविकास आघाडीच्या नावाने खडे फोडणाऱ्या व रोजच्या रोज पडणार पडणार म्हणून भाकीत वर्तविणाऱ्या 'कमलाकरांची' पंचाईत झालेली आहे. तीनचाकी असली तरी करोनासारख्या जागतिक महासाथीत मोठ्या संयमाने या रिक्षाचालकांनी प्रवास केलेला आहे. कमलाकरांनी आता भविष्यवेधापेक्षा कमलानिवासात चिंतन शिबीर आयोजित करण्याची वेळ आली आहे.

– **दत्तप्रसाद शिरोडकर,** मुलुंड (मुंबई)

## सर्वच राजकीय पक्षांनी 'तमाशा'चे फड उभे केले

**'महाविकास आघाडी** सरकार म्हणजे तीन पक्षांचा तमाशा' ही बातमी (२९ नोव्हेंबर) वाचून खरोखर मनोरंजन झाले. आशीष शेलार हे विसरतात की वाजपेयींपासून भाजपने तमाशाचा फडच उभा केला आहे हे सर्वश्रुत आहे. तमाशाचा कळस गाठला तो काश्मीरमध्ये पाकिस्तानी पुरस्कृत दहशतवाद्यांशी साटेलोटे असणाऱ्या पीडीपीसह सत्ता उपभोगून. तसे पाहावयास गेले तर सर्वच राजकीय पक्षांनी तमाशाचे फडच उभे केले आहेत, हे माझ्यासारखे पक्षीय बांधिलकी नसणारे नागरिक जाणून आहेत. तेव्हा शेलारांनी नसती वटवट करू नये. झाकली मूठ नेहमीच सव्वा लाखाची असते हे लक्षात ठेवावे.

– **चंद्रशेखर सु. खारकर,** ठाणे

## चला, त्यांनीच दिली 'तमाशा'ची कबुली

**'मविआ सरकार** म्हणजे तीन पक्षांचा तमाशा' हे आशीष शेलार यांचे वक्तव्य वाचले. हे रूपक गेल्या काही वर्षांत राजकारण हा केवळ तमाशा बनत चाललेला असल्याची नकळत किंवा अप्रत्यक्ष दिलेली कबुली समजायला हरकत नाही. जनतेने दोन पक्षांचा तमाशा पाच वर्षे पाहिला. त्यातील काही कलावंतांनी फड सुटल्याने प्रेक्षकांमध्ये बसून खेळ बंद पाडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले पण त्यांना यश आले नाही हेपण पाहिले. आता येत्या तीन वर्षांत या असंतुष्ट त्रस्त समंधांनी बिनपैशाचा आपला खेळ बंद करण्याचा समंजसपणा दाखवावा हे उत्तम!

– **गजानन गुर्जरपाध्ये,** दहिसर (मुंबई)

## महाविकास आघाडीच्या यशाचे श्रेय भाजपलाच!

**'वर्धापनाच्या तुटीची** जमा!' हे संपादकीय (२९ नोव्हेंबर)वाचले. यात सरकारच्या जमेचा रकाना भरण्यास कारणीभूत विरोधी पक्षाची आणखी जनतेला न आवडलेली गोष्ट म्हणजेच आंदोलने व पीएम केअरला मदतीचे आवहान! जनता मुख्यमंत्र्यांच्या सूचनेचे पालन करत असताना विरोधी पक्ष मात्र घंटानाद करायला सांगत होता, ही गोष्ट अनेकांना खटकली.

सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रात सापडत असताना राज्यातील विरोधी पक्षाच्या पहिल्या फळीतील नेत्यांपासून तालुका तसेच गावपातळीवरील कार्यकर्त्यांपर्यंत सगळेजण पीएम केअरला मदत करण्यासाठी विविध माध्यमांतून आवाहन करत होते. ही बाब पाहता भाजप महाराष्ट्रद्रोही आहे ही प्रतिमा जनतेपर्यंत पोहोचवण्यात महाविकास आघाडी यशस्वी ठरली व सरकारला सहानुभूती मिळाली.

याचे सर्व श्रेय अर्थातच भाजपचेच!

– **माधव धोंडिबा बामणपल्ले,** नांदेड

## गावपातळीपासून सावधगिरी बाळगणे गरजेचे

**'देशभर सतर्कता!'** ही बातमी (२८ नोव्हेंबर )वाचला. दक्षिण आफ्रिकेमध्ये आढळून आलेल्या करोनाच्या ओमायक्रॉन या नव्या विषाणू प्रकारामुळे अवघ्या जगाच्या चिंता वाढल्या आहेत. भारतानेही आता याबाबत सावध पावले टाकायला सुरुवात केली आहे. ज्या विभागात सर्वाधिक रुग्ण आढळून येत आहेत, त्या विभागाकडे प्रशासनने अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर ओमायक्रॉन विषाणूचा ग्रामीण भागात शिरकाव होऊ नये यासाठी ग्रामपंचायतींच्या माध्यमातून गावागावात लसीकरणासंदर्भात जनजागृती करावी. स्थानिक प्रशासनाने शासनाच्या विविध योजना राबवून लसीकरणाचा वेग वाढवावा. शासनाच्या वेळोवेळी मिळालेल्या दिशानिर्देशाचे नागरिकांनी पालन करणे अत्यंत गरजेचे आहे.

– **सुरेश रामराव पेंदोर,** मु. गोंडखेडा(कोपरा ), जि. नांदेड

## लसीबाबत कर्नाटक सरकारची भूमिका दुटप्पी

**'दोन डोस** लसीकरणाचे प्रमाणपत्र असणाऱ्या भारतीय नागरिकांना जगभरातील ९६ देशांनी आपल्या देशाची दारे उघडली' ही बातमी वाचत असतानाच कर्नाटकाने महाराष्ट्र व केरळ राज्यातील नागरिकांना दोन डोस घेतल्याचे प्रमाणपत्र असूनसुद्धा आरटीपीसीआर चाचणी निगेटिव्ह असल्याशिवाय प्रवेश देणार नाही, ही अट कायम ठेवल्याची बातमी वाचनात आली. अशी दुटप्पी भूमिका घेऊन वास्तविक कर्नाटक महाराष्ट्रातील नागरिकांची अडवणूक करीत आहे. लसीकरणासाठी देशपातळीवर जोरदार प्रयत्न चालू आहेत. अशा वेळी लसीकरणावर देशातीलच एक राज्य शंका कशी काय घेते? त्यामुळे लसीबाबत जनतेतही निरुत्साह निर्माण होऊ शकतो. या राज्याचा लसीकरणावर भरवसा नाही असे म्हणावे तर कर्नाटकात जोरदार लसीकरण मोहीम सुरू आहे. नागरिकांमध्ये करोना संसर्गाची कोणतीही लक्षणे नसताना, त्यांनी दोन डोस घेतलेले असताना कर्नाटककडून आरटीपीसीआर चाचणीच्या अहवालाची सक्ती करून जनतेचा पैसा व वेळ वाया घालवला जात आहे. केंद्र सरकारने हस्तक्षेप करून देशभरात करोनाबाबत एकच नियम सगळीकडे लागू असल्याचे जाहीर करणे गरजेचे आहे.

– **मोहन मनोहर खोत,** रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

# कृतज्ञतेची संधी!

**अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात, रालोआ सरकारने 'आदिवासी व्यवहार मंत्रालय' स्थापन केले; तर २०14 पासून, मा. नरेंद्र मोदी यांच्या सरकारने सर्वच वंचितांच्या आयुष्यांमध्ये बदल घडवून आणण्याचे काम सुरू केले आहे आणि आता हे वंचित समूह मुख्य प्रवाहातील विकास कार्यक्रमांमध्ये 'सहभागी घटक' म्हणून जोडले जात आहेत. हे लक्षात घेता अलीकडेच साजऱ्या झालेल्या 'जनजातीय गौरव सप्ताहा'चे महत्त्व आणखी उजळते...**

### पहिली बाजू




### अर्जुन राम मेघवाल

संसदीय कामकाज व सांस्कृतिक खात्यांचे राज्यमंत्री

**'आझादी का** अमृत महोत्सव' साजरा करीत असताना आपण २०४७ साठी आपली वचनबद्धता काय असेल याचीही तपासणी करीत आहोत. अशा वेळी १५ नोव्हेंबर हा 'भगवान बिरसा मुंडा' यांच्या जयंतीचा दिवस 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून पाळणे तसेच २२ नोव्हेंबरपर्यंत 'जनजातीय गौरव सप्ताहा'अंतर्गत विविध कार्यक्रम घेणे, हे आदिवासी जनजातींचे योगदान मान्य करण्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचे आणि दूरगामी पाऊल आहे. राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात आदिवासी जनजातींचे स्थान किती मोठे आहे, हे यामुळे दिसून येते आहे.

राष्ट्रीय विकासात आदिवासी जनजातींचा वाटा महत्त्वाचा असूनदेखील इतिहासाने तो ओळखला नाही, हे अयोग्य झाले. वास्तविक देशभरात ठिकठिकाणी असलेल्या आदिवासी जनजातींनी ब्रिटिशांना आव्हान दिले. ब्रिटिशांनी आपला खजिना भरण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा जो संहार चालवला होता त्याचा थेट आर्थिक आणि सामाजिक फटका आदिवासींनाच बसत होता. हे ओळखून ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणांविरुद्धचे लढे ठिकठिकाणी आदिवासींनी उभारले. हे लढे आपापल्या पातळीवर लढणाऱ्यांत पहाडिया, चुआर, कोळ, भील, हो, मुंडा, संथाळ, खोण्ड, कोया, कोळी, रामोशी, कुकी, खासी, सिंगफो अशा किती तरी जनजाती होत्या. त्या-त्या जनजातीच्या नेत्यांची दुर्दम्यता आणि लोकांची बंडाची तयारी यामुळे दिसून आली.

जनजातीय गौरव सप्ताह यापुढेही दरवर्षी पाळणे महत्त्वाचे ठरेल, कारण अनेक आदिवासींचे लढे आज विस्मृतीत गेले आहेत. या संदर्भात मला आवर्जून स्मरण होते ते १९१३ च्या मानगढ टेकडीवरील जनसंहाराचे. 'वागड प्रांतातील जलियाँवाला बाग हत्याकांड' असे या मानगढ जनसंहाराला म्हटले जाते. वागड हा आजचे गुजरात व राजस्थान राज्य यांत विभागलेला भूभाग. तेथील भिल्ल समाजात गोविंद गुरू नावाचे सुधारक आणि आध्यात्मिक नेते होऊन गेले. या भागात १८९९-१९०० सालात मोठा दुष्काळ पडला, तेव्हा भिल्ल समाजाच्या पाठीशी गोविंद गुरू उभे राहिले. ब्रिटिशांमुळे ही आपत्ती समाजावर ओढवते आहे, हे त्यांनी जाणले. मात्र आधी समाजातील प्रश्न- दारू आणि पिढ्यान्‌पिढ्यांची कर्जे- यांच्याशी लढण्यास त्यांनी प्रारंभ केला. यामुळे समाज एकसंध झाला, अस्मिता जागृत झाली, या भागात शाळा सुरू झाल्या. गोविंद गुरू यांनी १९०८ साली स्थापन केलेल्या 'भगत संप्रदाया'मुळे वनवासी आदिवासींची आध्यात्मिक भूकही भागली, भिल्ल समाजाचे नैतिक व सामाजिक उन्नयन झाले. वसाहतवाद्यांना हे पाहावेना. त्यामुळे ब्रिटिश सरकारने गोविंद गुरू यांच्या सहकारी व कार्यकर्त्यांचा छळ आरंभला. मानगढच्या डोंगरावर १७ नोव्हेंबर १९१३ रोजी गोविंद गुरूंनी आयोजित केलेल्या मेळाव्याला तीन बाजूंनी घेरून ब्रिटिशांच्या शिपायांनी बेछूट गोळीबार केला. भिल्ल समाजाच्या या त्यागाने, इतरांनाही स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा दिली. एकंदर दीड हजार भिल्लांच्या आहुती स्वातंत्र्यलढ्यात पडल्या आहेत.



मानगढ हत्याकांडस्थळी हा स्मृतिस्तंभदेखील २० वर्षांपूर्वीपर्यंत या जागी नव्हता.

आदिवासी जनजातींकडून किती तरी शिकण्यासारखे आहे. अनादिकाळापासून त्यांचे निसर्गप्रेम तर अन्य समाजालाही प्रेरणा देत राहिले आहेच. आपली कला, संस्कृती, पर्यावरण आणि वने यांचे जतन आणि संरक्षण करणाऱ्या या जनजाती निसर्ग आणि संस्कृती यांमधली एकात्मता नेमकी ओळखतात; हे आजच्या हवामान बदलाच्या काळातही जगभरच्या देशांमध्ये एकवाक्यता दिसत नसताना खरोखरच स्पृहणीय म्हटले पाहिजे. आदिवासी समाजात पुरुष-महिला जन्मदराचे प्रमाण (दर १००० पुरुष-जन्मांच्या तुलनेत ९९० स्त्री-जन्म) एकंदर भारताच्या ९४० या प्रमाणापेक्षा चांगले आहे. हुंड्यासारखी अनिष्ट प्रथा आदिवासींमध्ये तुलनेने कमी प्रमाणात आहे. या समाजांमध्ये साहचर्याची भावना असल्यामुळे मुलीच्या जन्माचेही स्वागतच होण्याची येथे खात्री असते. सरकारने या समाजांमधील गुणवत्ता नेमकी ओळखून तिचा गौरवही केला आहे, याची तुलसी गौडा (कर्नाटक), राहीबाई सोमा पोपेरे (महाराष्ट्र), लक्ष्मीकुट्टी (केरळ) तसेच क्रीडापटूंपैकी द्युती चांद, मेरी कोम, बायचुंग भुतिया, दीपिका कुमारी, थोनकल गोपी आणि लाल्रेमसियामी ही काही उदाहरणे.

घटनाकारांनी आपल्या राज्यघटनेतील पाचव्या आणि सहाव्या अनुसूचींद्वारे आदिवासी जनजातींच्या उत्थानासाठी विशेष तरतुदी केल्या. या समाजाचे प्रतिनिधी संसदेत, विधिमंडळांत आणि पंचायत पातळीपर्यंत असावेत, याची हमी या तरतुदींमुळे मिळते. कै. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना, राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारने जनजातींच्या कल्याणकारी योजनांना गती देण्याच्या हेतूने केंद्रात निराळे 'आदिवासी व्यवहार मंत्रालय' ऑक्टोबर १९९९ पासून स्थापन केले. २०१४ पासून, मा. नरेंद्र मोदी यांच्या सरकारने सर्वच वंचितांच्या आयुष्यांमध्ये बदल घडवून आणण्याचे काम सुरू केलेले आहे आणि आता हे वंचित समूह मुख्य प्रवाहातील विकास कार्यक्रमांमध्ये 'सहभागी घटक' म्हणून जोडले जात आहे, हे सारे 'सब का साथ, सब का विकास, सब का विश्वास, सब का प्रयास' या द्रष्ट्या तत्त्वांशी अत्यंत सुसंगत असेच आहे.

'आकांक्षी जिला कार्यक्रम' आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी, शिष्यवृत्ती योजनांची आखणी, शिष्यवृत्तींचा निधी वाढवणे आणि त्या मिळण्यास लागणारा अवधी कमी करणे, आदिवासी भागांमधील 'एकलव्य शाळां'च्या संख्येत पाचपटीने वाढ, नव्या शैक्षणिक धोरणात स्थानिक भाषाच शिक्षणाचे माध्यम असण्यावर भर आणि त्यामुळे निश्चित आदिवासी विद्यार्थ्यांना होणारा फायदा, अशा अनेक उपलब्धी सांगता येतील. यापुढील काळात वागड भागात, 'मानगढ धाम'ची उभारणी १० अन्य जनजातीय संग्रहालयांसोबत केली जाणार असून त्यातून स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासींच्या योगदानाची स्मृती राखली जाणार आहे. बोडो करार, ब्रू- रेआंग करार, कारबी-आन्गलाँग शांतिकरार आणि 'अनुसूचित जाती-जमाती अत्याचारविरोधी कायद्या'चे (ॲट्रॉसिटी ॲक्ट) सबलीकरण, अशी पावले सरकारने उचलल्यामुळे आदिवासी जनजातींचे जीवन सुखकर होणार आहे.

याखेरीज हेही आवर्जून नमूद करतो की, आदिवासींसाठी 'लघु वन उपज' (मायनर फॉरेस्ट प्रोड्यूस) या गटातील पिकांसाठी हमीदरामध्ये सरकारने वृद्धी केल्यामुळे खरेदीच्या उलाढालीचे आकडे ६२ पटींनी वाढलेले आहे. 'स्टॅण्ड अप इंडिया' योजनेखाली आदिवासी उद्योजकांसाठी एकंदर एक हजार कोटी रुपयांची कर्ज प्रकरणे मंजूर झालेली आहेत.

जनजातीय गौरव दिवस आणि जनजातीय गौरव सप्ताह ही अनाम आदिवासी नायकांना आदरांजली वाहण्याची, कृतज्ञ राहण्याची भारतीय नागरिकांसाठी एक संधी आहे. आदिवासी जनजातींमधील लोक आणि त्यांचे नेते स्वातंत्र्यासाठी कसे लढले, याच्या कथा पुढल्या पिढ्यांना सांगणे हे आपले कर्तव्यच ठरते. ही संधी घेतानाच, आदिवासींना त्यांच्या कला, संस्कृती व परंपरांचे जतन 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या उक्तीबरहुकूम करता यावे, यासाठी आपण प्रतिज्ञाबद्ध होऊ या!

### नवदेशांचा उदयास्त

## युद्धग्रस्त लिथुआनिया



१६ फेब्रुवारी १९१८ रोजी स्वतंत्र लिथुआनियाच्या करारावर स्वाक्षऱ्या करणारे सदस्य

**पहिल्या महायुद्धकाळात** जर्मनांनी रशियावर आक्रमण करून त्यांच्या साम्राज्यातील मोठ्या प्रदेशावर कब्जा केला. त्यामध्ये संपूर्ण लिथुआनिया प्रदेश जर्मनीव्याप्त झाला. १९१८ मध्ये महायुद्धात जर्मनी दोस्तराष्ट्रांकडून पराभूत होऊन त्यांनी लिथुआनियावरील ताबा सोडला. या सत्तांतरांच्या धामधुमीचा लाभ उठवीत लिथुआनियाच्या स्वातंत्र्यवाद्यांनी १९१८ मध्ये स्वतंत्र लिथुआनियाची घोषणा केली. नव्या देशाची राज्यघटना तयार करून ऑगस्टीनॉस वोल्डेमार यांची पंतप्रधानपदी नियुक्ती होऊन लोकशाहीवादी सरकार स्थापन झाले. पुढे दुसऱ्या महायुद्धाला सुरूवात झाली. ऑगस्ट १९३९ मध्ये नाझी जर्मनी आणि सोव्हिएत युनियन यांच्यात मोलोटोव्ह-रिबेन्ट्राप हा परस्परातील युद्धबंदीचा करार झाला. या कराराला हिटलर-स्टालीन करार असेही म्हटले जाते. या करारान्वये या दोन्ही सत्तांनी पोलंडवर आक्रमण करून त्याची फाळणी केली. पूर्वेकडील निम्मा पोलंड रशियाकडे तर पश्चिमेकडील जर्मनीच्या वर्चस्वाखाली आला. फिनलँड, लिथुआनिया आणि इतर बाल्टिक देश हा प्रदेश या दोन सत्तांनी आपसात वाटून घेतला. या वाटणीत लिथुआनिया सोव्हिएत युनियनच्या प्रभावाखाली गेला.

१९४० च्या जूनमध्ये रशियाने लिथुआनियासमोर एक प्रस्ताव ठेवला आणि लिथुआनियाच्या नेत्यांना नाइलाजाने तो स्वीकारावा लागला. या प्रस्तावात या देशातले तत्कालीन सरकार बरखास्त करून रशियाच्या सल्ल्याने तिथे साम्यवादी सोव्हिएत सरकार स्थापन करणे, सोव्हिएत रेड आर्मीची २० हजार सैनिकांची फौज लिथुआनियाच्या प्रदेशात राहील आणि लिथुआनियाच्या प्रदेशात सोव्हिएत रशियाचे पाच लष्करी तळ तयार केले जातील अशा अटी होत्या. आणि याच्या बदल्यात पोलंडचा प्रगत असे व्हिल्नीयस हे शहर आणि परगाणा लिथुआनियाला मिळणार होते. या अटी स्वीकारण्याशिवाय पर्याय नव्हता त्यामुळे नेत्यांनी तो प्रस्ताव मान्य केला. त्यानंतर लिथुआनियन सोव्हिएत सोशॅलिस्ट रिपब्लिक सरकारची स्थापना झाली. सोव्हिएत युनियनने लिथुआनियातील कम्युनिस्टेतर सर्व राजकीय पक्षांवर बंदी घातली. इतर पक्षांचे नेते आणि कम्युनिस्ट सरकारचे बुद्धीजीवी विरोधक अशा १२००० व्यक्तींना सैबेरियात हद्दपार केले गेले, लिथुआनियन शेतकऱ्यांचा शेतसारा दुपटीने वाढविला गेला. अशा प्रकारे रशिया, लिथुआनियन राजकीय व्यवस्थेचे आणि समाजाचे पद्धतशीर सोव्हिएतीकरण करीत असतानाच नाझी जर्मनीने २२ जून १९४४ रोजी सोव्हिएत युनियनवर जबरदस्त आक्रमण केले.

– **सुनीत पोतनीस**

sunitpotnis94@gmail.com

### अद्वयबोध

## हरिदिन

**'हरिदिन' असा** अन्वर्थक आणि गोड शब्द योजतात नामदेवराय 'एकादशी'साठी. ज्ञानदेवांच्या समाधिप्रसंगाचे इत्थंभूत वर्णन करणाऱ्या नामदेवरायांच्या करुणरम्य अभंगांपैकी एका अभंगात 'हरिदिन' ही शब्दयोजना आढळते. तो प्रसंगही आहे भावगम्य आणि रोमांचक. ज्ञानदेवांच्या समाधीक्षणी उपस्थित राहण्यासाठी लवाजम्यासह अलंकापुरात आलेल्या पंढरीनाथाकडे ज्ञानदेव एक मागणे मागतात, असा वृत्तान्त कथन करतात नामदेवराय तिथे. **ज्ञानदेव म्हणे शुद्ध कार्तिक मासीं । व्रत एकादशी स्वामीकडे** असे सांगत कार्तिकाच्या शुद्ध पक्षातील प्रबोधिनी एकादशीच्या दिवशी वैष्णवमेळा पंढरीक्षेत्रामध्ये नामघोषाचा गजर करील, असे ज्ञानदेव विदित करतात पंढरीशाला. त्यानंतर पंधरवड्यानेच येणाऱ्या कार्तिकातील वद्य एकादशीस, देवा, तुम्ही वैष्णवमेळ्यासह आळंदी क्षेत्रामध्ये येण्याचे करावे असे पांडुरंगाला जणू करारबद्धच करतात ज्ञानदेव! **कृष्णपक्षीं व्रत हरिदिनी परिपूर्ण। मागितला मान ज्ञानदेवें** अशा रसाळ शब्दकळेद्वारे नामदेवराय अक्षरबद्ध करतात देव-भक्तांचा तो सुखसंवाद. भक्तीच्या भावविभोर प्रांतात उमलणाऱ्या या कोवळ्या भावविश्वाला लौकिक जगातील ऐन्द्रिय अनुभवांच्या यथार्थतेचे कडवे निकष लागू करण्याचा मोह होईलही काही तर्ककठोर बुद्धिनिष्ठांना या ठिकाणी. परंतु, इथे महत्त्व आहे ते विठ्ठल मुखातून नामदेवरायांसारखा ज्ञानी आणि अनुभूतीसंपन्न सत्पुरुष वदवत असलेल्या 'ज्ञानदेव'नामक तत्त्वाच्या विराट दर्शनाचे व्यापकत्व सम्यकपणे आकळण्याचा प्रयत्न करण्याला. ज्ञानदेवांनी सिद्ध केलेल्या गीताटीकेचे आपल्याला भावलेले अ-साधारणत्व नामदेवरायांनी मुखर केलेले आहे विष्णुस्वरूप विठ्ठलाच्या वाणीद्वारे, ही यांतील सर्वाधिक लडिवाळ बाब. **तुवां जो ग्रंथानुभव। गीतेसी सांगितला भाव। तें मुख्य ठेवणें राणीव। अनुभवी जाणती** हे नामदेवरायांनी प्रत्यक्ष विठ्ठलदेवाच्या मुखाद्वारे प्रगटवलेले वचन अर्थगर्भ होय. कोणत्याही वाङ्मयीन कृतीच्या रसग्रहणाचे आद्य मर्मच विशद करतात नामदेवराय या प्रसंगी. 'ज्ञानदेवी' ही गीतेवरील निव्वळ प्रतिपद शाब्दिक मल्लीनाथी नव्हे तर, ज्ञानदेवा, तुझा गीतानुभवच तू प्रचीतीयुक्त शब्दमाध्यमाद्वारे प्रगट केलेला आहेस, असे कथन मांडतात नामदेवराय 'ज्ञानेश्वरी'संदर्भात पांडुरंगाच्या माध्यमातून. ग्रंथगत अक्षरांच्या रूपाने प्रगटलेला ग्रंथकर्त्यांचा अनुभव अनुभवविश्वाशी तादात्म्य पावतो त्या वेळी संबंधित ग्रंथ खऱ्या अर्थाने 'आपलासा' होतो, हे सांगायचे आहे नामदेवरायांना इथे. पारायण करत असलेल्या ग्रंथातील अक्षरांना 'भाव' म्हणजे स्वानुभवाद्वारे अर्थवत्ता तेव्हाच प्राप्त होत असते, हे यांतील गुह्य. तो अनुभव असतो निखळ व्यक्तिगत. त्याची देवाणघेवाण शक्यच नसते. पठनाद्वारे हस्तगत होणारा वाचनानंद आणि ग्रंथगत अक्षरांमध्ये वसणाऱ्या अनुभवाची वाचकाला वाचनांती लाभणारी अनुभूती तो ग्रंथ वाचणाऱ्या प्रत्येक वाचकागणिक निरनिराळ्या पद्धतीने प्रगटते त्यांमागील कार्यकारणभाव हाच. ग्रंथकर्त्याने शब्दबद्ध केलेल्या त्याच्या अनुभवाशी वाचकाच्या अनुभवाचे सूर जुळले की तिथे साकारते साम्राज्य त्या तादात्म्याद्वारे उमलणाऱ्या सानुभूत आनंदाचे. 'राणीव' हा 'साम्राज्य'वाचक शब्द नामदेवरायांनी अभंगात योजलेला आहे तो उगीच नाही. **नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओंवी अनुभवावी** असे ते परोपरीने विनवतात त्याचे कारणही हेच. त्यासाठी साधावा लागतो योग तन-मन-बुद्धीच्या एकात्मतेचा. तोच दिवस एकादशीचा. 'हरी'तत्त्वाच्या निकट (उप) वास घडणे तोच होय 'उप-वास' आणि त्यालाच म्हणावे हरिदिन!

– **अभय टिळक**

agtilak@gmail.com

### कुतूहल

## लघुग्रहांची, धूमकेतूंची भ्रमंती

**आपल्या ग्रहमालेतल्या** अनेक नव्या लघुग्रहांचा आणि धूमकेतूंचा सतत शोध लागत असतो. या नुकत्याच शोधल्या गेलेल्या लघुग्रहांच्या वा धूमकेतूंच्या कक्षांची काहीच माहिती नसते. सुरुवातीच्या मोजक्या निरीक्षणांवरून या कक्षा नक्की कराव्या लागतात. एखाद्या ग्रहाच्या कक्षेवरून त्याचे स्थान शोधून काढण्याचे गणित हे काहीसे सरळ गणित आहे. परंतु काही मोजक्या निरीक्षणांवरून, एखाद्या नव्या लघुग्रहाची किंवा धूमकेतूची कक्षा ओळखणे, हे कठीण काम आहे. अशा प्रकारच्या गणितात क्रांती घडवून आणणारे गणितज्ञ म्हणजे जर्मनीचे कार्ल फ्रिडरिश गाऊस.



इटालीच्या जिऊसेप्पे पिआत्सी यांनी १८०१ साली सिरीस या लघुग्रहाचा शोध लावला. शोधानंतर एका महिन्याने हा लघुग्रह सूर्याच्या तेजामुळे दिसेनासा झाला. नंतर काही काळाने तो दिसण्याची अपेक्षा असतानाही सापडला नाही. त्यासाठी, गाऊस यांनी एक नवी गणिती पद्धत वापरून, त्याद्वारे या लघुग्रहाच्या अपेक्षित स्थानाचा अंदाज वर्तवला. त्यांच्या गणितानुसार अल्पकाळातच हा लघुग्रह पुन्हा शोधला गेला. प्रथम गाऊस व त्यानंतर फ्रान्सच्या आंद्रे-मारी लेजांडर यांच्या प्रयत्नांतून या पद्धतीचा पुढे विकास झाला. ही पद्धत आता 'लीस्ट स्क्वेअर मेथड' या नावे ओळखली जाते. समजा एखादा चल घटक, अनेक अचल घटकांवर अवलंबून आहे. अशा चल घटकाचा अचल घटकांशी असलेला संबंध, गुणांकांच्या मदतीने गणिती सूत्रात मांडता येतो. त्यासाठी चल घटकांचे निरीक्षणांद्वारे मापन करून, या पद्धतीद्वारे ते गुणांक काढून, चल घटकाचा अचल घटकाशी असलेला संबंध दर्शवणारे गणिती सूत्र स्पष्ट करता येते. निरीक्षणांची संख्या जितकी अधिक, तितकी या पद्धतीतील अचूकता अधिक. ही पद्धत लघुग्रहांच्या किंवा धूमकेतूंच्या कक्षा नक्की करण्यासाठी अनेकदा वापरली जाते.

एखादा नवा लघुग्रह वा धूमकेत सापडला की, त्याचे आकाशातले स्थान संदर्भांकांच्या स्वरूपात नोंदवले जाते. या लघुग्रहाचा किंवा धूमकेतूचा प्रवास हा त्याच्या कक्षेच्या, आकार व इतर गुणधर्मांना अनुसरून चालू असतो. वरील पद्धतीचा वापर करून, आकाशस्थ वस्तूच्या बदलत्या स्थानांची, या विविध गुणधर्मांच्या ढोबळ मूल्यांशी सांगड घालणारी विशिष्ट प्रकारची समीकरणे तयार केली जातात. ही समीकरणे लीस्ट स्क्वेअर पद्धतीद्वारे सोडवून, त्यावरून लघुग्रहाची वा धूमकेतूची त्याच्या पुढच्या प्रवासातील स्थाने अंदाजे समजू शकतात. त्यानंतर ही नवी स्थाने प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे अचूकरीत्या नोंदवली जातात. या सर्व प्रत्यक्ष नोंदवलेल्या स्थानांवरून सुधारित समीकरणे तयार करून, त्याद्वारे कक्षांच्या गुणधर्मांची अधिक अचूक मूल्ये मिळवली जातात. समीकरणांचा वापर व निरीक्षणाची क्रिया पुनःपुन्हा केल्यावर, या मूल्यांतली त्रुटी कमी होत जाते व अखेर त्या लघुग्रहाची वा धूमकेतूची अचूक कक्षा समजू शकते.

– **डॉ. राजीव चिटणीस**

**मराठी विज्ञान परिषद**

**संकेतस्थळ :** www.mavipa.org

**ईमेल :** office@mavipamumbai.org

## संक्षिप्त

### प्रवीण दरेकर आज सांगली दौऱ्यावर

**सांगली :** विधानसभेतील विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस आणि विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर हे उद्या (मंगळवारी) एक दिवसाच्या सांगली दौऱ्यावर येत असून त्यांच्या उपस्थितीमध्ये लोकनायक शिक्षण मंडळाच्या इमारतीचा कोनशिला समारंभ होणार आहे. दौऱ्यामध्ये ते जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये पूरग्रस्त नुकसान भरपाईबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा करणार असून जिल्हा सामान्य रूग्णालयामध्ये आ. सुधीर गाडगीळ यांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या प्राणवायू प्रकल्पाचे लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच करोना काळामध्ये उत्कृष्ट सेवा बजावलेल्या डॉक्टरांना स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे.

### ‘सुकन्या समृद्धी’साठी साताऱ्यात मोहीम

**कराड :** डाक खात्याच्या सातारा विभागाने ‘सुकन्या समृद्धी’ योजनेसाठी विशेष मोहिमेतून येत्या २९ नोव्हेंबर ते १० डिसेंबरपर्यंत तब्बल २५ हजार खाती उघडण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याची माहिती प्रवर डाक अधीक्षक अपराजिता मिद्रा यांनी साताऱ्यात पत्रकार परिषदेत बोलताना दिली. मिद्रा म्हणाल्या, की शून्य ते १० वयोगटातील मुलींच्या नावे खाते सुरू करता येईल. त्यात प्रारंभिक गुंतवणूक २५० रुपयांपासून पुढे करायवाची असून नंतर १०० च्या पटीत कितीही वेळा या खात्यात रक्कम भरता येते. एका आर्थिक वर्षात दीड लाख ते कमीत कमी एक हजार रुपये जमा करता येतात. या योजनेची मुदत १५ वर्षे असून हे खाते २१ वर्षांनी परिपक्व होणार आहे. मुलगी अठरा वर्षांची झाल्यावर मुदतपूर्व खाते बंद करण्याची सोय आहे. योजनेसाठी सेक्शन ८० सी अंतर्गत आयकरात सूट आहे. २०१५ सालापासून सुरू असलेल्या या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. तरी, प्रत्येक पालकांनी या योजनेत सहभागी होऊन खाते उघडावे. सुकन्या हेल्पलाइनच्या ८२७५७००६५४ या भ्रमणध्वनी क्रमांकांवर इच्छुकांनी संपर्क करावा, नजीकचे टपाल कार्यालय अथवा पोस्टमनशी साधावा, असे आवाहन अपराजिता मिद्रा यांनी केले आहे.

### डॉ. मोहन राजमाने यांना ‘गुणवंत प्राचार्य’ पुरस्कार



शिवाजी विद्यापीठातर्फे दिला जाणारा गुणवंत प्राचार्य पुरस्कार स्वीकारताना डॉ. मोहन राजमाने. समवेत अन्य मान्यवर.

**कराड :** शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिनानिमित्त संलग्न महाविद्यालयातील ‘गुणवंत प्राचार्य २०२१’ हा पुरस्कार कराडच्या सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, प्रा. डॉ. एन. डी. पाटील आदींनी डॉ. राजमाने यांचे अभिनंदन केले आहे. प्राचार्य डॉ. राजमाने २००६ पासून सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. या महाविद्यालयाची गुणात्मक व संख्यात्मक वाढ करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील हे ए प्लस मानांकन, ३.६३ गुणांक मिळविणारे पहिले महाविद्यालय असून, आयएसओ प्रमाणित असणारे हे महाविद्यालय २०१९ पासून स्वायत्त करण्यात प्राचार्य डॉ. राजमाने यांची दूरदृष्टी, योगदान आणि प्रचंड मेहनत महत्त्वाची आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराने महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. डॉ. राजमाने यांनी प्राचार्य केलेल्या कामाची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठातर्फे हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी प्राचार्य म्हणून महाविद्यालयाबद्दल निष्ठा, कार्यतत्परता, उत्कृष्ट अध्यापन व प्रशासन विविध समित्यांवर केलेले प्रतिनिधित्व, तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील बहुमोल योगदान या बाबी विचारात घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

### शिवाजी विद्यापीठात मराठी कादंबरीचा सप्ताह

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि सातारा येथील अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ‘मराठी कादंबरीचा सप्ताह’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत विचारवंत व समीक्षक विनय हर्डीकर यांची मराठीतील निवडक कादंबऱ्यांवर व्याख्याने ३० नोव्हेंबर ते १०डिसेंबर या कालावधीत आयोजित केली आहेत. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. प्रकाश पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे,अशी माहिती मराठी विभाग प्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी सोमवारी दिली.

### करोनानंतर चिल्लर पार्टीची चळवळ सुरू

**कोल्हापूर :** येथील चिल्लर पार्टी विद्यार्थी चित्रपट चळवळीच्यावतीने शाहू स्मारक भवन मध्ये द नट जॉब या बाल चित्रपटाचे आयोजन करणेत आले होते. गेली दहा वर्षे चालू असणारा बाल चित्रपट चळवळीचा चिल्लर पार्टीचा उपक्रम करोनाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर पुन्हा एकदा सुरू झाला. करोनाचे शासकीय नियम पाळून सुरू केलेल्या चित्रपटाला बाल चमूने मोठा प्रतिसाद दिला. इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी उपक्रमाची प्रशंसा केली. चंद्रशेखर तुदीगाल, घनश्याम शिंदे ,श्रीनाथ काजवे ,अक्षय तुदीगाल,विजय शिंदे आदी उपस्थित होते.

### डॉ. जनार्दन भोसले यांना पुरस्कार

**वाई :** डॉ. जनार्दन पांडुरंग भोसले यांना राष्ट्रीय पातळीवरील संत नामदेव संशोधन साहित्य पुरस्कार २०२१ जाहीर झाला आहे. डॉ. जनार्दन भोसले यांनी लिहिलेल्या ‘फ.म. शहाजिंदे यांच्या कवितेतील निधर्मीवाद’ या समीक्षा ग्रंथाला उत्कृष्ट साहित्य निर्मितीबद्दल राष्ट्रीय पातळीवरील संत नामदेव संशोधन साहित्य पुरस्कार २०२१ निवड झाल्याचे शिवाजी महाविद्यालय, हिंगोलीचे मराठी विभाग प्रमुख, समृद्धी प्रकाशन चे प्रकाशक, संयोजक डॉ. श्रीराम कऱ्हाळे यांनी पत्राद्वारे कळविले आहे.राष्ट्रीय पातळीवरील संत नामदेव पुरस्कार समृद्धी प्रकाशन हिंगोली (महाराष्ट्र) ही संस्था गेल्या ७ वर्षापासून हा उपक्रम राबवत आहे. नवं साहित्यिकांना प्रेरणा देणाच्या हेतूने या संस्थेची स्थापन करण्यात आली आहे. हिंदी भाषेतील संत नामदेव उपन्यास साहित्य पुरस्कारही जाहीर केले. १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीत प्रकाशित झालेल्या साहित्याला पुरस्कार जाहीर करण्यात आले

### दत्तजयंती उत्सवाचे कराडला आयोजन

**कराड :** मानाच्या श्री साईबाबा पालखीचे श्री क्षेत्र शिर्डीच्या साई मंदिरातील लेंडीबाग (दत्त मंदिर) येथून देवदिवाळीच्या मुहूर्तावर येत्या ५ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता साईबाबा संस्थान विश्वस्त व ग्रामस्थांच्या हस्ते कराडकडे दिमाखात प्रस्थान होईल. पालखी सोहळ्याचे यंदा २१ वे वर्ष आहे. शिर्डी, पिंपरी निर्मळ, कोल्हार, गुहा, राहुरी, नांदगाव (शिघवे), विळद घाट, अहमदनगर, चास, सुपा, वाडेगव्हान, शिरूर, आंबळे, नागरगाव, सुपा, मुर्टी, नीरा, लोणंद, वाठार स्टेशन, पळशी, कोरेगाव, वेलंग, रहिमतपूर, वाठार किरोली, मसूर, विद्यानगर अशा मार्गे १३ दिवसांचा प्रवास करीत १७ डिसेंबरला सायंकाळी कराडच्या कृष्णा नाका येथे साई पालखीचे आगमन होऊन पालखी येथील श्रीराम मंदिरात विसावेल. दुसऱ्या दिवशी १८ डिसेंबरला दत्त जयंती सोहळा साजरा होईल. पालखी सोहळ्यातील सहभाग निःशुल्क आहे. तरी, इच्छुक भक्तांनी ९८६००१९४४१ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन साईबाबा पालखी सोहळा समितीचे प्रमुख उदयसिंह देसाई यांनी दिली.

# सरकार पडणार, माझ्या प्रत्येक म्हणण्याला आधार - चंद्रकांत पाटील

लोकसत्ता प्रतिनिधी

**वाई :** सरकार पडणार आहे असं म्हटल्यामुळे कुणाच्या पोटात दुखण्याचं काय कारण, माझ्या प्रत्येक म्हणण्याला आधार असतो, असे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील साताऱ्यात म्हणाले.

चंद्रकांत पाटील यांनी आज (सोमवार) राष्ट्रवादीचे बंडखोर नेते व सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक ज्ञानदेव रांजणे यांचे त्यांच्या निवासस्थानी आंबेघर(ता जावली) येथे पहाटे जाऊन अभिनंदन केले. या वेळी जावळीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंतराव मानकुमरे उपस्थित होते.

सरकार पडणार असे चंद्रकांत पाटील म्हणाले होते, त्यावर महाबळेश्वर येथील पक्षाच्या युवक मेळाव्यात शरद पवार यांनी चंद्रकांत पाटील यांची खिल्ली उडवली होती.



सातारा जिल्हा सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक ज्ञानदेव रांजणे यांचा सत्कार करताना चंद्रकांत पाटील.

चंद्रकांत पाटील हे आता हस्तरेषा बघतात असं वाटत असल्याचं पवार म्हणाले होते. त्यांच्या या टीकेला पाटील यांनी आज उत्तर दिलं. सरकार पडेल असं म्हटलं तर कोणाच्या पोटात दुखायची गरज नाही. प्रत्येक वेळी माझ्या म्हणण्याला आधार असतो. प्रत्येक गोष्ट ठरल्या वेळी होते असं मानणारा मी माणूस आहे. त्यामुळं मी म्हणत राहणार आणि तसं म्हणण्याचं मला स्वातंत्र्य आहे. राजकारणात कोणी कोणावर अवलंबून नसतं. जेव्हा गणितं जमत नाहीत, तेव्हा माणसं बाहेर पडतात. प्रत्येक गोष्टीची एक वेळ ठरलेली असते. सरकार पडण्याची वेळ काय आहे हे मला माहीत नाही. मी इतका अंतर्ज्ञानी असतो तर हिमालयातच गेलो असतो,असेही पाटील म्हणाले.

शिवेंद्रराजे हे भाजप सोडून जातील अशी चर्चा होती मात्र ते गेले नाहीत हेच त्यांचे मोठेपण आणि आमचे यश आहे.

ज्ञानदेव रांजणे यांची सदिच्छा भेट घेतली. मी विद्यार्थी चळवळीतून आलेला माणूस आहे. संघर्ष करत आलोय. त्यामुळं संघर्ष करणाऱ्या माणसाबद्दल मला अप्रूप असतं. मी तशा लोकांना भेटतो. मी त्यांना भेटल्यामुळं रांजणेंची निष्ठा बदलत नाही. कुठल्याही दबावाला ते बळी पडले नाहीत याबद्दल त्यांचं अभिनंदन करायला आलो, असं पाटील यांनी सांगितलं. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेची सूत्रे भाजपकडे येत असतील तर लागेल ती मदत करू,असंही ते म्हणाले. या वेळी त्यांनी रांजणेंना भेटवस्तू दिली.

दरम्यान चंद्रकांत पाटील यांनी कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांच्याशी संपर्क साधत त्यांच्याशी काही गोष्टींबाबत चर्चा केल्याची प्राथमिक माहिती उपलब्ध झाली आहे, पण याबाबत जास्त माहिती उपलब्ध झाली नाही.

# नव्या करोना भयाने पुन्हा चिंतेचे वातावरण

लोकसत्ता वार्ताहर

**कराड :** दक्षिण अफ्रिकेत करोनाचा आणखी घातक असलेला विषाणू प्रकार आढळताना युरोपीय देशांमध्ये पुन्हा करोना संसर्ग वाढत असल्याची चिंता आता स्थानिक बाजारपेठांमध्ये उमटू लागली आहे. या नव्या भीतीचे काहूर माजताना लोकांनी पुन्हा खर्चाचा हात आखडता घेतल्याने आर्थिक उलाढालीवर त्याचा विपरीत परिणाम दिसू लागला आहे.

सातारा जिल्हा प्रशासनाने गेल्या चार दिवसांपूर्वी (शुक्रवारी) करोनाच्या पार्श्वभूमीवरील निर्बंधांमध्ये शिथिलता आणल्याचे पत्रक जारी केले होते. मात्र, जिल्हाधिकारी शेखर सिंह यांनी नवा आदेश पारित करताना, त्यात करोनाच्या प्रतिबंधासाठी लावण्यात आलेले व सध्या लागू असलेले निर्बंध कटाक्षाने पाळावेत असे समस्त जनतेला सुनावले आहे. करोनाची घटलेली रुग्णसंख्या शून्य होण्यासाठी शासकीय यंत्रणा संपूर्ण लसीकरणासाठी आग्रही आहे. संपूर्ण लसीकरण आणि गर्दी टाळण्याबरोबरच सक्तीने मुखपट्टी वापरणे, हात सतत स्वच्छ ठेवणे अशा निर्बंधांचा सक्त अंमल होण्याची चिन्हे आहेत. करोना हटल्याच्या भावनेतून सुखावलेले समाजमन बिथरले असून, गेल्या पावणे दोन वर्षांपासून लग्न सोहळे, जेवणावळ्या व अन्य कार्यक्रमांचा धुमधडाका सुरू होण्यापूर्वीच त्यावर निर्बंधांची सक्ती येण्याची चिन्हे आहेत. सर्वच शाळा सुरू होऊन बाल गोपाळांचा पुन्हा किलबिलाट अपेक्षित असतानाच त्यावर आता निर्बंधांची टांगती तलवार राहिली आहे. केंद्र व राज्य शासनाचे निर्देश आणि जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश याकडे विविध संस्था व व्यापारी अस्थापना तसेच लोकांचेही लक्ष लागून राहणार आहे. सजग नागरिकांनी करोनाचे निर्बंध बारकाईने पाळणे सुरू केल्याचेही दिसते आहे.

# सुरेश पाटील यांच्यावर फौजदारी कारवाईची मागणी

## उपमहापौर राजेश काळे यांचे आंदोलन

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** सोलापूर महापालिका सभागृहात महापौरांच्या पीठासनावर पाण्याची बाटली फेकणारे सत्ताधारी भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक सुरेश पाटील यांच्यावर फौजदारी कारवाई करावी या मागणीसाठी उपमहापौर राजेश काळे यांनी आज धरणे आंदोलन केले.

पाटील यांनी नुकतीच संतप्त होऊन महापौरांच्या पीठासनावर पाण्याची बाटली भिरकावली होती. त्यामुळे सभागृहात गोंधळ उडाला होता. महापौरांनीही पाटील यांना निलंबित केले होते. या पार्श्वभूमीवर काळे यांनी पाटील यांच्यावर केवळ निलंबनाचीच कारवाई पुरेशी नाही, तर फौजदारी कारवाई व्हावी, अशी मागणी केली आहे. या मागणीसाठी त्यांनी महापालिका आवारात यशवंतराव चव्हाण पुतळ्याजवळ गळ्यात काळी फित बांधून धरणे आंदोलन केले. पाटील यांनी यापूर्वीही सभागृहात अनेकवेळा बेशिस्त वर्तन केले होते. त्यांच्यावर पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी काळे यांनी केली.

दरम्यान काळे यांच्या या आंदोलनाची खिल्ली उडविताना पाटील यांनी त्यांच्यावर टीका केली. खंडणी, दमदाटी, शिवीगाळ आदी गुन्हे असलेल्या काळे यांनी पालिका उपायुक्तांना थेट शिवीगाळ व दमदाटी केली होती. त्याबद्दल त्यांच्यावर गुन्हाही नोंद आहे. आपण त्यांच्यासारखे कोणतेही कृत्य केले नाही, असेही ते म्हणाले.

# साताऱ्याजवळ गुटख्यासह वाहने जप्त, तिघांना अटक

लोकसत्ता वार्ताहर

**कराड :** सातारा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुटख्याचा मोठा साठा वाहतूक होत असताना दोन वाहनांतून पकडला. साताऱ्यानजीकच्या शेंद्रे येथे सेवा रस्त्यावर सापळा रचून झालेल्या या कारवाईत तीन जणांना अटक करताना गुटखा तसेच दोन वाहने असा सुमारे २१ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी,की स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ यांना खबरीकडून मिळालेल्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली. दोन इसम त्यांच्या ताब्यातील टेम्पोमधून गुटख्याची पोती व बॉक्स घेऊन आले व टेम्पोतील गुटख्याचे बॉक्स सातारा येथील विकत घेणाऱ्या इसमाचे मोटारगाडीत ठेवत असताना पकडले गेले. स्थानिक गुन्हे शाखेकडील पथकाने टेम्पोमधील दोन इसम व मोटारगाडीतील एक इसम अशा तिघांना दोन वाहनासह ताब्यात घेऊन त्यांच्याकडून आरएमडी पानमसाला, विमल पानमसाला व व्ही १ टोबॅको (तंबाखू) वगैरे असा ८ लाख ९२ हजार ८०० रुपये किमतीचा प्रतिबंधित माल व दोन वाहने असा एकूण २० लाख ९२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढे जप्त केलेला हा गुटखा अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतला आहे.

# कटगुणला ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळ दर्जासाठी प्रयत्नशील

## जिल्हा परिषद अध्यक्षांची ग्वाही

लोकसत्ता वार्ताहर

**कराड :** शोषितांच्या उत्थानासाठी आयुष्यभर लढा देणाऱ्या महात्मा जोतिबा फुले यांचे मूळगाव असलेल्या खटाव तालुक्यातील कटगुणला सर्वांगीण विकासासाठी ‘अ’वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा मिळवा म्हणून प्रयत्नशील राहण्याबरोबरच येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवनाच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही जिल्हा परिषदेचे अध्यक्ष उदय कबुले यांनी दिली.

कटगुण येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १३१ व्या पुण्यतिथीनिमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार महेश शिंदे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष प्रदीप विधाते, अर्थ व शिक्षण सभापती मानसिंगराव जगदाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, कटगुणच्या सरपंच जयश्री गोरे, ग्रामस्थ व महात्मा फुले न्यासाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

उदय कबुले म्हणाले, महात्मा जोतिबा फुले यांनी समाजातील वंचित घटकाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यातूनच महिला वर्गाचा उत्कर्ष झाला. महात्मा फुलेंच्या कार्यातून आपणाला सदैव सामाजिक कार्याची प्रेरणा मिळते.

महेश शिंदे म्हणाले, सुसंकृत विद्यार्थी घडले तरच भविष्यात समाजहिताचे काम होईल आणि महात्मा फुलेंना अपेक्षित असा आदर्श समाज घडेल. सन २००७ ते २०१२ या आपल्या जिल्हा परिषद सदस्यपदाच्या कार्यकाळात महात्मा फुलेंच्या पुर्णाकृती पुतळ्याचे काम पूर्ण झाले. आता पुतळ्याच्या चबुतऱ्यासाठी १५ लाखांचा निधी देणार आहे. प्रदीप विधाते यांनी मनोगत व्यक्त केले.

# कोल्हापूर जिल्हा बँक निवडणुकीसाठी शक्तिप्रदर्शन

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी सोमवारी तिन्ही मंत्र्यांनी शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल करताना विजयाचा दावा केला. तसेच ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील सर्वपक्षीयांनी सहकार्य करावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

जिल्हा मध्यवर्ती बँकेचा निवडणूक कार्यक्रम घोषित झाला असून आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात केली. बँकेचे अध्यक्ष ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, खासदार संजय मंडलिक यांनी सागर तालुक्यातून उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्यासमवेत तालुक्यातील प्रमुख नेतेमंडळी होती.

### विजयाचा दावा

पालक मंत्री सतेज पाटील यांनी गगनबावडा तालुक्यातून अर्ज दाखल केला. ६६ पैकी ४९ सेवासंस्थाधारक आपल्यासोबत असल्याचे त्यांनी सांगितले. सोबत त्यांनी फेटा बांधून ठराव धारक अर्ज दाखल करण्यासाठी आणले होते.तसेच शिरोळ तालुक्यातील १११ठराव धारकांना सोबत घेऊन आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील यांनी अर्ज भरला.

कागल तालुक्यातील नेते एकत्र आले आहेत त्यांच्याकडे ९५ टक्के मतदान असल्याने निवडून येऊ असा दावा मुश्रीफ यांनी केला. जिल्ह्यातील सर्व घटकांशी चर्चा करून निवडणूक बिनविरोध होण्यासाठी एकोपा सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.



पालक मंत्री सतेज पाटील यांनी ठरावधारक अर्ज दाखल करण्यासाठी आणले होते.

# ‘सैराट’मुळे प्रसिद्ध झालेल्या करमाळ्यातील विहिरीत वृद्धेचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** नागनाथ मंजुळे यांच्या ‘सैराट’ या गाजलेल्या मराठी चित्रपटामुळे प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या करमाळ्यातील ऐतिहासिक ९६ पायऱ्यांच्या विहिरीत एका वृद्ध महिलेचा मृतदेह आढळून आला. या घटनेचे निश्चित कारण लगेचच समजू शकले नाही. लताबाई नाना रोकडे (वय ६०, रा. देवीचा माळ, करमाळा) असे या मृत वृध्देचे नाव आहे. ती विहिरीकडे कशासाठी गेली होती ? तिचा अपघाती मृत्यू की हा आत्महत्येचा प्रकार आहे, याचा तपास करमाळा पोलीस करीत आहेत.



करमाळा येथील कमलादेवी मंदिराजवळ मोगलकालीन ९६ पायऱ्यांची ऐतिहासिक विहीर आहे. या विहिरीला ‘सैराट’ चित्रपटामुळे प्रसिद्धी मिळाली. त्यामुळं दूरदूरच्या भागातून अनेक पर्यटक ही विहीर पाहण्यासाठी करमाळ्यात येतात. विहिरीभोवती सतत गर्दी असते.

# माढ्यात सशस्त्र चोरट्यांनी घर फोडून दागिने लुटले

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** माढा येथे सशस्त्र चोरट्यांनी एका घरात घुसून वृध्दासह कुटुंबीयांना लाकडी दांडक्याने मारहाण करीत सोने-चांदीचे दागिने व अन्य ऐवज बळजबरीने लुटून नेला. माढा पोलीस ठाण्यात या गुन्ह्याची नोंद झाली आहे.

शहाजी शामराव पवार (वय ७०) हे माढा येते चिंचोळी रस्त्यावरील स्वतःच्या घरात राहतात. रात्री पवार कुटुंबीय झोपले असताना पहाटे अडीचच्या सुमारास चार सशस्त्र चोरट्यांनी पवार यांच्या घराच्या स्वयंपाक खोलीचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांच्या आवाजाने झोपेतून जागे झालेल्या पवार कुटुंबीयांना चोरट्यांनी लाकडी दांडक्यांनी मारहाण केली. चाकूचा धाक दाखवून दहशत निर्माण केली. नंतर घरातील सोने-चांदीचे दागिने, घड्याळ व इतर साहित्य मिळून ८७ हजार रूपये किमतीचा ऐवज लुटला.

अकलूज येथे सायंकाळी तेजस्विनी गौरव एकतपुरे (वय ३३, रा. कृष्णप्रियानगर, अकलूज) आपल्या दुचाकीने जाताना पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोघा चोरट्यांनी हिसका मारून त्यांच्या गळ्यातील एक तोळ्याचे सोन्याचे गंठण बळजबारीने लुटून नेले. अकलूज पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

# महिला पोलिसांसाठी साताऱ्यात कार्यशाळा

लोकसत्ता वार्ताहर

**वाई :** खासदार श्रीनिवास फाउंडेशन व सातारा पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ‘बंदोबस्त ताण-तणावाचा’ याविषयी मार्गदर्शन कार्यशाळा आज पार पडली. या कार्यशाळेस सातारा पोलीस अधीक्षक कार्यालयांतर्गत महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवला.

महाराष्ट्र पोलिसांचा आपल्याला नेहमीच अभिमान राहिला आहे. ‘सदरक्षणाय खलनिग्रहणाय’ या आदर्श ब्रीदवाक्याला अनुसरून सज्जनांचे रक्षण व दुर्जनांवर नियंत्रण ठेऊन त्याचा नायनाट करणे या



कर्तव्यभावनेने महाराष्ट्र पोलीस सदैव कार्यरत आहेत. करोनाच्या संकटकाळात तर स्वतःच्या जिवाची पर्वा न करता त्यांनी अहोरात्र कर्तव्य बजावले. कायदा-सुव्यवस्था राखण्यासह, गुन्ह्यांची उकल करणे, सण-उत्सवावेळी चोख बंदोबस्त ठेवणे, निवडणुका, मोर्चे, आंदोलन प्रसंगी व्यस्त असणारे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर ताण पडतो. त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या स्वास्थ्यावर पडतो. सततच्या कामामुळे त्यांच्यावर येणाऱ्या ताणतणावाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असल्याने तसेच पोलीस म्हणून कर्तव्य पार पाडत असताना महिला पोलीस आपल्या दैनंदिन जीवनात आई, मुलगी, बहीण, बायको अशा विविध भूमिकाही निभावत असते. कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडताना त्यावेळेस येणारा तणाव आणि वेळेचे व्यवस्थापन हे योग्यरितीने हाताळता आले पाहिजे. याविषयीचे प्रशिक्षण या कार्यशाळेतून देण्यात आले.

यावेळी श्रीनिवास पाटील फाउंडेशनच्या उपाध्यक्षा व तज्ञ मार्गदर्शक रचना पाटील यांनी त्यांच्या अनेक वर्षांच्या कौशल्य विकासाच्या आलेल्या अनुभवातून उपस्थितांना संबोधित केले.यावेळी सारंग पाटील उपस्थित होते. या प्रसंगी साताऱ्याच्या सहायक पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्यासह सातारा जिल्ह्यातील महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होत्या.

## सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अंचलीय कार्यालय, ८/३ कर्वे रोड, पुणे ०४.
वसुली विभाग, ४३३/बी/२, माधव अपार्टमेंट, दुसरा मजला, जुनी जिल्हा परिषद इमारत, सोमवार पेठ, पुणे ०१.
दूरध्वनी क्र.:(०२०)२६०६२६६७, २६०६१९५५, २६०६११८४, २६०६११८५

### ताबा नोटीस (स्थावर मालमत्तेकरिता)
### परिशिष्ट IV [ रूल ८(१) ]

ज्याअर्थी, खाली सही करणार, **सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.** चे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इन्टरेस्ट अॅक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या रुल ९ सह कलम १३ (१२) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार यांना **मागणी नोटीस** बजावली होती. कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या रुल ९ सह कलम १३(४) अंतर्गत खाली नमूद केलेल्या तारखांना मालमत्तेचा **प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे. विशेषत: कर्जदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.** यांना येणे असलेल्या रकमेच्या अधीन राहील.

**स्थावर मालमत्तेचा तपशील**

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | स्थावर मालमत्तेचे वर्णन | मागणी नोटीस व प्रतिकात्मक ताबा घेतल्याची तारीख | येणे रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | १) मुदलीयार माला पद्मनाभन (कर्जदार) आणि<br>२) सौ. मुदलीयार हरिप्रेमा शेषाद्री (सह-कर्जदार)<br>३) श्री. मुदलीयार पद्मनाभन शेषाद्री (जामीनदार) | ता. हवेली, जि. पुणे येथील आणि पुणे महानगर पालिका हद्दीतील आणि नोंदणी जिल्हा पुणे, उपजिला ता. हवेली कार्यक्षेत्रातील येरवडा, येथील सीटीएस नं.१११/१, सीटीएस २७६४ या समक्रमांकाच्या भूखंढ़ामधील प्लॉट क्र.२५ वरील संपदाश्री को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायती लि. मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ६, क्षेत्रफळ ६५० चौ. फूट म्हणजेच ६०.४१ चौ. मि. कार्पेट क्षेत्र. | ०४.०९.२०२१<br>आणि<br>२५.११.२०२१ | दि. ३१.०८.२०२१ रोजी रु. १०,३४,४९१.७५ अधिक दि. ०१.०८.२०२१ पासूनचे व्याज |
| १. | १) सौ. चोरगे ललिता महेंद्र (कर्जदार) आणि<br>२) श्री. चोरगे महेंद्र ज्ञानोबा (जामीनदार) | पुणे महानगर पालिका हद्दीतील आणि उपनिबंधक हवेली, नोंदणी जि. पुणे यांचे कार्यक्षेत्रातील, कात्रज येथील स. नं. ७०/१/१ए/१२/६, ज्याचा ग्रामपंचायत क्र. ४९६ आहे असा अंदाजे ८८६ चौ.फू. म्हणजे ८२.३२ चौ. मि. क्षेत्रफळाचा प्लॉट आणि त्यावरील बांधकाम, अंदाजे क्षेत्रफळ ७४७.८२ चौ.फू. म्हणजे ६९.५० चौ. मि. बिल्ट अप. या मिळकतीचा मिळकत कर क्र . P/D/21/01221000 | ०७.०९.२०२१<br>आणि<br>२६.११.२०२१ | दि. ०३.०९.२०२१ रोजी रु. १०,८३,९३५.०० अधिक दि. ०१.०९.२०२१ पासूनचे व्याज |

दिनांक : २९.११.२०२१
स्थळ : पुणे

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

अधिकृत अधिकारी
सारस्वत को-ऑप बँक लि.

---

## YES BANK
### येस बँक लिमिटेड
नोंद. व कॉर्पोरेट कार्या.: येस बँक लिमिटेड, येस बँक हाऊस, वेस्टर्न एक्सप्रेस हायवेच्या पलिकडे, सांताक्रूझ पूर्व, मुंबई - ४०००५५. CIN: L65190MH2003PLC143249
ईमेल: communications@yesbank.in वेबसाईट : www.yesbank.in

[नियम - ८(१)]

### ताबा सूचना

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकार हे येस बँक लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ च्या (नियम ३) सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(१२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत १२ एप्रिल, २०२१ रोजी एक मागणी सूचना निर्गमित केली होती ज्यात कर्जदार, भागीदार, जामीनदार व गहाणकार मे. उबेर हॉस्पिटॅलिटी वेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार), रामानंद शर्मा (जामीनदार व गहाणकार), योगेश तूरवणकर (जामीनदार), जावेद शेख (जामीनदार), विवेक शिंदे (जामीनदार), विनय शिंदे (जामीनदार), वैजयंती एम खापरे (जामीनदार व गहाणकार), प्रल्हाद देशमुख (जामीनदार), साधना प्रल्हाद देशमुख (जामीनदार), रुचा प्रल्हाद देशमुख (जामीनदार) यांना सदर सूचना प्राप्त होण्याचा दिनांकापासून ६० दिवसांचे आत सदर सूचनेत नमूद दि. ०६ एप्रिल, २०२१ नुसार रक्कम रु. ४,६०,००,३०७/– (रुपये चार कोटी साठ लक्ष तीनशे सात फक्त) चा पुढील व्याज आणि करारातील दराने इतर शुल्कांसह भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.
कर्जदार, संचालक, जामीनदार व गहाणकार सदर रकमेचा भरणा करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदार, संचालक, जामीनदार व गहाणकार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप–विभाग (४) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.
कर्जदार, संचालक, जामीनदार व गहाणकार आणि सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी खाली नमूद मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेच्या संदर्भात असा कोणताही व्यवहार केल्यास तो येस बँक लिमिटेडच्या २३ नोव्हेंबर, २०२१ नुसार रक्कम रु. ४,६८,०३,२३०/– (रुपये चार कोटी अडुसष्ट लक्ष तीन हजार दोनशे तीस फक्त) आणि २४ नोव्हेंबर, २०२१ पासूनचे पुढील व्याज, खर्च, शुल्के, अधिभार इ. सह इतर थकबाकी रकमांच्या भाराधीन असेल. सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप–विभाग (८) कडे वेधण्यात येते.

**अचल मालमत्तांचे वर्णन**

| अ. क्र. | तारण मालमत्तेचे वर्णन | गहाणकार | ताबा दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | प्लॉट क्र. ३४ ए, कोल्हापूर नगरपालिका नोकरांची सहकारी गृहनिर्माण संस्था लि., आर.एस.क्र. १०१८, हिस्सा क्र. १, ए–वॉर्ड, आपटे नगर, कोल्हापूर -४१६०१२, क्षेत्रफळ सुमारे ४५८.६ चौ.मी. व तेथील बांधकाम. | वैजयंती मारुती खापरे | २५.११.२०२१ |
| 2 | प्लॉट क्र. ३८ व ३९, सर्वे क्र. ११२ए व बी, ११३, ११४, ११७,११८, ११९, १२२ए, १२३, २९६बी, २९७ए, ३१८, सीटीएस क्र. ४५९६, स.क्र. ६९९/२ए, सीटीएस क्र. १३६, तारकर कंपाउंड, हडपसर औद्योगिक परिसर, तालुका हवेली, पुणे - ४११०२८ - युनिटचे क्षेत्रफळ ३७३.९३ चौ.मी. आणि औद्योगिक बांधकाम (जी+१), व तेथील सुमारे १३७.४९ चौ.मी. क्षेत्रफळ. | उबेर हॉस्पिटॅलिटी वेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड | २४.११.२०२१ |
| 3 | प्लॉट क्र. ३८ व ३९, सर्वे क्र. ११२ए व बी, ११३, ११४, ११७,११८, ११९, १२२ए, १२३, २९६बी, २९७ए, ३१८, सीटीएस क्र. ४५९६, स.क्र. ६९९/२ए, सीटीएस क्र. १३६, तारकर कंपाउंड, हडपसर औद्योगिक परिसर, तालुका हवेली, पुणे - ४११०२८ - युनिटचे क्षेत्रफळ ३०७.८१ चौ.मी. आणि तेथील सुमारे १४८.७० चौ.मी. चे फॅक्टरी शेड आणि सुमारे ६३.१९ चौ.मी. चे आरसीसी बांधकाम. | उबेर हॉस्पिटॅलिटी वेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड | २४.११.२०२१ |

दिनांक: ३०–११–२०२१
स्थान: पुणे/ कोल्हापूर

प्रोसेनजीत महतो (प्राधिकृत अधिकारी)
येस बँक लिमिटेड

---

## इंडियन बैंक Indian Bank
इलाहबाद ALLAHABAD

### सॅम स्मॉल-पुणे
बिल्डिंग नं. २, प्लॉट नं. एस-२१३, ज्युपिटर हौ. सोसायटी, कल्याणीनगर, पुणे ४११००६
Ph.: 020 26650105,26650106 E-mail: samsmall.pune@indianbank.co.in

### ताबा सूचना
परिशिष्ठ-४ नियम- ८ (१) (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्या अर्थी, खाली सही करणार हे इंडियन बँकेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अन्वये सक्षम अधिकारी आहेत आणि त्यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) संबंधित कायद्यास ८ आणि ९ नियमानुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून **दि. १० जून २०२१** रोजी **कर्जदार १. श्री. जतिन अरविंद सोलंकी श्री. अरविंद गुलाबचंद सोलंकी(यांचा मुलगा) २. श्री. अरविंद गुलाबचंद सोलंकी, ३. श्रीमती. मंजुळा अरविंद सोलंकी (सर्व रा. स. नं. ६९६/२, सीटीएस नं. २/९, प्लॉट नं. ९, आनंद नगर को–ऑप हौ. सोसायटी लि., महर्षी नगर, सिटी इंटरनॅशनल स्कूल जवळ, गुलटेकडी, पुणे ४११०३७)** यांना मागणी नोटीस पाठवून त्यांचे कर्जाचे खाते असलेले **कल्याणीनगर शाखेत** मागणी नोटीसात उल्लेखित केलेली रक्कम **रू. रु. ३,०३,६७,१९३/– (तीन कोटी, तीन लाख, सदुसष्ठ हजार, एकशे त्र्याणव्व फक्त) दि. ३१.०५.२०२१** पर्यंत व **दि. ०१.०६.२०२१** पासूनचे तर रक्कम परतफेड करण्याच्या दिनांकापर्यंतचे व्याज मागणी नोटीस ६० दिवसात परतफेड करण्यास सूचवले होते.
कर्जदार ही रक्कम परत करू न शकल्याने कर्जदारांना आणि सामान्य जनतेला कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी उपरोक्त सेक्शन १३ (४) संबंधित कायद्यास ८ आणि ९ नियमानुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा आज **दि. २६ नोव्हेंबर २०२१** रोजी ताबा घेतला आहे.
कर्जदारांना विशेषत्वाने आणि सर्वसामान्य जनतेला इशारा देण्यात येतो की, सदरच्या मालमत्तेबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेसंबंधी केलेला असा कोणत्याही प्रकारचा व्यवहार हा इंडियन बँकेला **रू. ३,२१,४३,७६२/– (रु. तीन कोटी एकवीस लाख त्रेचाळीस हजार सातशे बासष्ठ फक्त)** आणि **दि. २५/११/२०२१** पासूनचे व्याज व इतर देय खर्च रकमेला जबाबदार राहतील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**मालमत्तेचे वर्णन :** सर्वे नं. ६९६/२, सिटी सर्व्हे २/९ यापैकी अंतिम भूखंड क्र. ४७५ बी, त्यापैकी भूखंड क्र. ९ क्षेत्रफळ सुमारे ३८५.२५ चौरस मीटर आहे, त्यापैकी पूर्व बाजूचा अर्धा हिस्सा म्हणजे सुमारे १९२.६३ चौरस मीटर क्षेत्रफळ सुमारे २७६६ चौरस फूट क्षेत्रफळावरील संरचनेसह आनंद नगर को–ऑप. हौ. सोसायटी लि., महर्षी नगर, गाव मुंजेरी/गुलटेकडी, तालुका – हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित **१. अरविंद गुलाबचंद सोलंकी आणि २. श्रीमती. मंजुळा अरविंद सोलंकी** यांच्या मालकीचे. **चतु:सिमा: उत्तर :** २० मीटर रुंद रस्ता **दक्षिण :** आदिनाथ सोसायटीचे कंपाउंड **पूर्व:** २० मीटर रुंद रस्ता **पश्चिम :** मिस्टर आणि मिसेस विनय कावेडिया यांची मालमत्ता

स्थळ : पुणे
दि : २६/११/२०२१

**श्री. मनदिप सिंग**
मुख्य व्यवस्थापक / अधिकृत अधिकारी
इंडियन बँक, सॅम स्मॉल शाखा,

---

## यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

### आस्ति वसुली शाखा, औंध
### स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता विक्री सूचना
### जंगम/स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी महा ई–ऑक्शन

पत्ता : नं. १, तळमजला, वेस्टएण्ड सेंटर–III, १६९/१, नागरास रोड, औंध, पुणे–४११००७.
फोन : ७३५०७३५६११, ०२०–२५५५२०१३

**सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इन्टरेस्ट अॅक्ट,२००२, त्यासह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील रूल ८(६) अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई–ऑक्शन विक्री सूचना**

यानुसार सर्वसाधारण जनतेस आणि विशेषत: कर्जदारांस आणि जामीनदारांस सूचना देण्यात येते की, पुढे नमूद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता, ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/ताब्यात असून, युनियन बँक ऑफ इंडिया (सुरक्षित धनको) यांचे अधिकृत अधिकारी यांनी सदर मालमत्तांचा प्रतिकात्मक/प्रत्यक्ष ताबा घेतला असून सदर मालमत्तांची ''जसे आहे, जेथे आहे'', ''जे आहे, जसे आहे'' आणि ''तेथे जे आहे'' तत्त्वावर खाली नमूद केलेल्या परिशिष्टानुसार विक्री करण्यात येणार आहे. राखीव किंमत आणि बयाणा रक्कम खाली नमूद करण्यात आले आहे.

| अ. क्र. | शाखेचे नाव, कर्जदार/ जामीनदारांची नावे आणि ताब्याचा प्रकार | येणे रक्कम | मालमत्तेचा तपशील | राखीव किंमत | बयाणा अनामत रक्कम | बोली वाढविण्याची कमीत कमी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **शाखा : एआरबी, पुणे कर्जदार :मे. हॉटेल सुहास (प्रतिकात्मक ताबा)** | रु. २,४०,५५,८७९/– (रु. दोन कोटी चाळीस लाख पंचावन्न हजार आठशे एकोणऐंशी फक्त) त्यावरील व्याज आणि किंमत | पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग : गट नं. ५३, पुणे सोलापूर हायवे, कासुर्डी टोल प्लाझा जवळ, कासुर्डी गांव, ता. दौंड, पुणे–४१२२१४. क्षेत्रफळ २५००.३८ चौ.मी. **चतु:सीमा : पूर्वेस** : गट नं. ३२०, **पश्चिमेस** : गट नं. ३२२, **उत्तरेस** : गट नं. ३२४, **दक्षिणेस** : पुणे–सोलापूर रस्ता | रु. ४,९५,००,०००/– (रूपये चार कोटी पंच्याण्णव लाख फक्त) | रु. ४९,५०,०००/– (रूपये एकोणपन्नास लाख पन्नास हजार फक्त) | रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) |
| २. | **शाखा : एआरबी, पुणे कर्जदार : श्री. महेश कुलकर्णी (प्रतिकात्मक ताबा)** | रु. २,४७,५२,६३८.५० (रु. दोन कोटी सत्तेचाळीस लाख बावन्न हजार सहाशे अडतीस आणि पैसे पन्नास फक्त) त्यावरील व्याज आणि किंमत | फ्लॅट नं. १०१, १ ला मजला, 'सरस्वती अपार्टमेंट, हॉटेल स्वरूपच्या पुढे, प्रभात रोड, लेन नं. १०, पुणे, क्षेत्रफळ २७०० चौ.मी. **चतु:सीमा : उत्तरेस** : सीटीएस नं. ३८/५, पद्मिनी अपार्टमेंटस्, **दक्षिणेस** : सीटीएस नं. ३८/३, हॉटेल स्वरूप. **पूर्वेस** : त्याच इमारतीतील फ्लॅट नं. १०२, **पश्चिमेस** : विमल सदन, प्रभात रोड, लेन नं. ११, | रु. ३,०२,००,०००/– (रूपये तीन कोटी दोन लाख फक्त) | रु. ३०,२०,०००/– (रूपये तीस लाख वीस हजार फक्त) | रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) |
| ३. | **शाखा : एआरबी , पुणे कर्जदार : मे. पॅसिफीक पॉवर सिस्टीम्स् (प्रत्यक्ष ताबा)** | रु. २,१४,१७,०४३.७३ (रु. दोन कोटी चौदा लाख सतरा हजार त्रेचाळीस आणि पैसे त्र्याहत्तर फक्त) त्यावरील व्याज आणि किंमत | फ्लॅट नं. ४, १ ला मजला, हिल व्ह्यू रेसिडेन्सी, स.नं. ७ ते १२, सीटीएस नं. ७३९, कोंढवा खुर्द, हवेली, ऑफ एनआयबीएम रोड, पुणे बांधकाम क्षेत्रफळ १४७.७७ चौ.मी. **चतु:सीमा : उत्तरेस** : सर्व्हे नं. १३, कोंढवा खुर्द मधील हिस्सा नं. ११ ही जमीन, **दक्षिणेस** : सर्व्हे नं. १३, कोंढवा खुर्द मधील हिस्सा नं. ६० ही जमीन, **पूर्वेस** : सर्व्हे नं. १३, कोंढवा खुर्द मधील हिस्सा नं. १२, प्लॉट हिस्सा नं. ६ ही जमीन , **पश्चिमेस** : ६० फूट रूंद डी.पी. रस्ता. | रु. ६५,००,०००/– (रूपये पासष्ट लाख फक्त) | रु. ६,५०,०००/– (रूपये सहा लाख पन्नास हजार फक्त) | रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) |
| ४. | **शाखा : एआरबी , पुणे कर्जदार : मे. युग एंटरप्रायजेस (प्रतिकात्मक ताबा)** | रु. ३,९५,३२,१६७/– (रु. तीन कोटी पंच्याण्णव लाख बत्तीस हजार एकशे सदुसष्ट फक्त) आणि पैसे त्र्याहत्तर फक्त) त्यावरील व्याज आणि किंमत | पुढील प्लॉटचा, त्यावर बांधण्यात आलेले रो हाऊस (तळ + २ मजले) यांसहीत सर्वसामाईक भाग, प्लॉट नं. ३१ वर स्थित, स.नं. २८२, सीटीएस नं. १३४५, शिवाजी उदय मंडल जवळ, तानाजी नगर, चिंचवड, पुणे येथे स्थित. एकूण क्षेत्रफळ १५६.६० चौ.मी.. **चतु:सीमा : पूर्वेस** : श्री. येशंत पी. शिद यांची सामाईक भिंत, **पश्चिमेस** : श्री. विष्णू एल. यादव यांच्या मालमत्तेची सामाईक भिंत, **उत्तरेस** : ३० फूट रस्ता, **दक्षिणेस** : सर्व्हे नं. २८३. | रु. ६२,००,०००/– (रूपये बासष्ठ लाख फक्त) | रु. ६,२०,०००/– (रूपये सहा लाख वीस हजार फक्त) | रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) |
| ५. | **शाखा : एआरबी, पुणे कर्जदार : मे. कोहिनूर इंडस्ट्रीज् (प्रतिकात्मक ताबा)** | रु. ५,१८,३७,१७५/– (रु. पाच कोटी अठरा लाख सदतीस हजार एकशे पंच्याहत्तर फक्त) त्यावरील व्याज आणि किंमत | औद्योगिक प्लॉट, एमआयडीसी प्लॉट नं. ३८/३, डी–III ब्लॉक, स्टार बझारमागे, काळभोर नगर, पिंपरी एमआयडीसी, पुणे–मुंबई रस्ता, पिंपरी परिसर, पीसीएमसी, पुणे येथे स्थित. क्षेत्रफळ ९९० चौ.मी. **चतु:सीमा : उत्तरेस** : प्लॉट नं. ३८/४, **दक्षिणेस** : प्लॉट नं. ३८/२, **पूर्वेस** : एमआयडीसीची हद्द, **पश्चिमेस** : रस्ता, | रु. ३,८३,००,०००/– (रूपये तीन कोटी त्र्याऐंशी लाख फक्त) | रु. ३८,३०,०००/– (रूपये अडतीस लाख तीस हजार फक्त) | रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) |
| ६. | **शाखा : एआरबी, पुणे कर्जदार : यू.के. इंडस्ट्रीज् (प्रतिकात्मक ताबा)** | रु. १,९०,२७,०२९.९४/– (रु. एक कोटी नव्वद लाख सत्तावीस हजार एकोणतीस आणि पैसे चौऱ्याण्णव फक्त) त्यावरील व्याज आणि किंमत | जमीन आणि बिल्डींग – औद्योगिक प्लॉट आणि शेड – स.नं. ५४, हिस्सा नं. ४०, क्षेत्रफळ ४३०६ चौ.फू. (शेडचे क्षेत्रफळ ३७५० चौ.फू.), नऱ्हे इंडस्ट्रीयल एरिया जवळ स्थित, तालुका हवेली, पुणे येथे स्थित. **चतु:सीमा : उत्तरेस** : लगतची बिल्डींग, **दक्षिणेस** : अंतर्गत रस्ता, **पूर्वेस** : लगतची बिल्डींग, **पश्चिमेस** : प्रवेशद्वार. | रु. ८५,००,०००/– (रूपये पंच्याऐंशी लाख फक्त) | रु. ८,५०,०००/– (रूपये आठ लाख पन्नास हजार फक्त) | रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) |
| ७. | **शाखा : एआरबी, पुणे कर्जदार : आनंद ट्रेडींग कॉर्पोरेशन (प्रतिकात्मक ताबा)** | रु. ५,१३,४०,७८७.५७/– (रु. पाच कोटी तेरा लाख चाळीस हजार सातशे सत्त्याऐंशी आणि पैसे सत्तावन्न फक्त) त्यावरील व्याज आणि किंमत | **१)** फ्लॅट नं. ५०३, ५०४ आणि ६०४, बिल्डींग नं. सी, मंत्री इटेरनिटी पाम्स्, स. नं. ४१०, ४११, एच नं. १ व २ आणि सीटीएस नं. २३०४, भारत पेट्रोलियम जवळ, भोसरी, पुणे–४११०२६, **ॲग्रीमेंट ६९२४/२०१३,** दि. १०/०९/२०१३ रोजी, हवेली क्र. १४, क्षेत्रफळ १२३.३७ चौ.मी., लगतच्या १८.०२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या टेरेससहीत, **ॲग्रीमेंट ६९२५/२०१३,** दि. १०/०९/२०१३ रोजी, हवेली क्र. १४, क्षेत्रफळ १२३.३७ चौ.मी., लगतच्या १८.०२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या टेरेससहीत, **ॲग्रीमेंट ३४२६/२०१३,** दि. ०२/०५/२०१३ रोजी, हवेली क्र. १४, क्षेत्रफळ १२३.३७ चौ.मी., लगतच्या ८.९१ चौ.मी. क्षेत्रफळाच्या टेरेससहीत, **चतु:सीमा : पूर्वेस :** स्पाईन रोड, **पश्चिमेस :** स.नं. ४११/१, **उत्तरेस :** स.नं. ४०९, **दक्षिणेस :** पुणे मुंबई हायवे | रु. ४,२४,००,०००/– (रूपय चार कोटी चोवीस लाख फक्त) | रु. ४२,४०,०००/– (रूपये बेचाळीस लाख चाळीस हजार फक्त) | रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) |
| | | | **२)** शॉप नं. १ आणि ३, स.नं. ३९२ (भाग), ३९३/३, ॲलास कॉपको कंपनीसमोर, कुणाल पूरम, मुंबई–पुणे रस्ता, दापोडी, पुणे, क्षेत्रफळ ११२.६१ चौ.मी. **चतु:सीमा : पूर्वेस :** मिलिटरी जमीन, **पश्चिमेस :** बीमॅक कंपनीची जमीन, **उत्तरेस :** स.नं. ३९३/२, **दक्षिणेस :** स.नं. ३९२ (भाग) | रु. २,०९,००,०००/– (रूपय दोन कोटी नऊ लाख फक्त) | रु. २०,९०,०००/– (रूपये वीस लाख नव्वद हजार फक्त) | रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) |
| | | | **३)** फ्लॅट नं. ११०३, ११ वा मजला आणि १२ वा मजला यांच्या भागामध्ये, बी विंग, बिल्डींग बी च्या तळमजल्यावरील २ कार पार्किंगसहीत आणि श्रीनिवास ब्लासम बाऊलवॉर्ड को–ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि. यांच्या सामाईक जागेतील प्रमाणित हिश्श्यासहीत, प्लॉट नं. ४२१, घोरपडी गांव, पुणे. क्षेत्रफळ २२६.४४ चौ.मी., लगतच्या ८०.०१ चौ.मी. क्षेत्रफळाच्या टेरेसच्या वापराच्या विशेष हक्कासहीत आणि लगतच्या १०७.४८ चौ.मी. क्षेत्रफळाच्या टेरेसच्या वापराच्या विशेष हक्कासहीत तसेच बिल्डींग बी च्या तळमजल्यावरील १८.७२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या दोन कार पार्किंगच्या जागेसहीत, **चतु:सीमा : पूर्वेस :** लिफ्ट, **पश्चिमेस :** प्रवेशद्वार, **उत्तरेस :** फ्लॅट नं. ११०२, **दक्षिणेस :** मोकळी जागा | रु. ३,८५,००,०००/– (रूपय तीन कोटी पंच्याऐंशी लाख फक्त) | रु. ३८,५०,०००/– (रूपये अडतीस लाख पन्नास हजार फक्त) | रु. २५,०००.०० (रु. पंचवीस हजार फक्त) |

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती, शाखेच्या संपर्काचा तपशील, नोंदणीकरण, लॉग–इन आणि बोलीसंबंधित नियमांसाठी कृपया **https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp** ला भेट द्या.
**टीप** : सर्व प्रस्तावकांना सल्ला देण्यात येतो की, शेवटच्या क्षणीची गुंतागुंत टाळण्याकरीता त्यांनी कृपया ई–ऑक्शनच्या तारखेच्या अलिकडे ३–४ दिवस वरील साईटला भेट देऊन तसेच रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करून, केवायसी अद्ययावत करून बयाणा रक्कम जमा करावी.
- **ई–ऑक्शनची तारीख : दि. १६/१२/२०२१, दु. १.०० ते ५.००** दरम्यान.

दिनांक : २६/११/२०२१
स्थळ : पुणे

अधिकृत अधिकारी,
युनियन बँक ऑफ इंडिया

लोकसत्ता [पुणे]
१२ मंगळवार, ३० नोव्हेंबर २०२१ WWW.LOKSATTA.COM

# प्रभाग रचनेच्या आराखड्याला मुदतवाढ

## महापालिका निवडणुकीसाठीचा प्रारूप आराखडा तयार करण्यासाठी ६ डिसेंबरपर्यंत मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याकरता निवडणूक आयोगाने ६ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. आराखडा तयार करण्याचे काम महापालिका प्रशासनाकडून सुरू आहे. यापूर्वीच्या नियोजनानुसार ३० नोव्हेंबर रोजी कच्चा आराखडा पूर्ण करून निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात येणार होता. मात्र, आराखड्याचे काम सुरू असल्याने महापालिका प्रशासनाने निवडणूक आयोगाकडे १५ दिवसांची मुदतवाढ मागितली होती.

नवीन वर्षात फेब्रुवारी महिन्यात अपेक्षित असलेल्या महापालिका निवडणुकीसाठी तीन सदस्यांचा एक प्रभाग निश्चित करण्यात आला आहे. करोनामुळे चालू वर्षी जनगणना होऊ शकलेली नाही. परिणामी सन २०११ ची लोकसंख्याच गृहित धरली जाणार आहे. मात्र, राज्य सरकारने गेल्या दहा वर्षात लोकसंख्या वाढल्याने कायद्यात बदल करून महापालिकांची सदस्य संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पुणे महापालिकेची सदस्यसंख्या १६१ वरून १७३ एवढी निश्चित करण्यात आली आहे. नगरसेवकांची संख्या वाढल्याने प्रभागांची संख्या ४२ वरून ५५ एवढी होणार आहे.

पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीसाठीच्या प्रभाग रचनेकडे नगरसेवकांसह इच्छुक उमेदवार आणि नागरिकांमध्येही उत्सुकता आहे. नवा प्रभाग कसा तयार होणार, त्याला कोणता भाग जोडला जाणार, तसेच कोणता भाग वगळण्यात येणार या बाबी कच्च्या आराखड्यानंतर समोर येणार आहेत. महापालिकेने १५ दिवसांची मुदतवाढ मागितली असताना निवडणूक आयोगाने ६ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

# बेकायदा वाहन शुल्क वसुलीला मार्केटयार्डात चाप

**पुणे :** श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील शेतमाल खरेदीदारांकडून बेकायदा वाहन शुल्क आकारणाऱ्यांना बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांनी चाप लावला आहे. गेले पंधरा वर्ष बाजारात शेतीमाल खरेदीदारांकडून बेकायदा वसुली सुरू होती.

गेल्या अनेक वर्षांपासून शेतीमाल टेम्पोत भरणाऱ्या चाळीस वारणारांची टोळी शेतीमाल खरेदीदारांकडून बेकायदा वाहन शुल्क आकारत होती. दरमहा १०० ते ३०० रुपये खरेदीदारांकडून घेण्यात येत होते. यामध्ये कामगार संघटनेचे काही प्रतिनिधीही सामील झाले होते. बाजार समितीच्या जागेवर बेकायदा वाहन शुल्क आकारण्यात येत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या, असे पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांनी सांगितले.

> शेतीमाल खरेदीदार टेम्पोचालकांना वार्षिक परवाना देण्यात येणार आहे. त्यामुळे बाजार समितीला दरवर्षी सव्वा कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे.
> **मधुकांत गरड,** प्रशासक पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती

याबाबत तक्रारी करण्यात आल्यानंतर वारणार आणि शेतीमाल भरणाऱ्यांची टोळी बेकायदा वाहन शुल्क वसुली करत असल्याचे चौकशीत निदर्शनास आले होते. संबंधित तोलणार, वारणारांचे प्रबोधन करण्यात आले. बेकायदा वाहन शुल्क वसुली केल्यास कायद्यानुसार कारवाई करून थेट गुन्हे दाखल करण्यात येतील, असे त्यांना सांगण्यात आले. टेम्पो चालकांचे प्रबोधन करण्यात आले आहे. बेकायदा वाहन शुल्क कोणी देऊ नये. शेतीमाल टेम्पोत भरल्यास त्याचे शुल्क द्यावे. नियमाप्रमाणे काम केल्यास त्याची पावती नाव तसेच मोबाइल क्रमांकासह घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. गेल्या पंधरा दिवसांपासून या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरू करण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले.

# फेरफार नोंदी घेण्यात पुणे राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

## दहा लाख नोंदीचा टप्पा पार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** लोकाभिमुख प्रशासनाच्या संकल्पनेतून मंडळस्तरावर आयोजित फेरफार अदालतीद्वारे पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित ग्रामीण भागात मिळून तब्बल दहा लाख नोंदी घेण्यात आल्या आहेत. त्यापैकी नऊ लाख ७३ हजार नोंदी निर्गत करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात घेण्यात येत असलेल्या फेरफार अदालतीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या माध्यमातून नागरिकांच्या प्रलंबित, साध्या, वारस, तक्रारी, फेरफार नोंदी निकाली काढण्याचे काम गेल्या वर्षभरापासून सुरू आहे. २४ नोव्हेंबरला घेण्यात आलेल्या फेरफार अदालतीमध्ये एकाच दिवसात ३३६१ नोंदी निर्गत करण्यात आल्या. नोंदी निकाली काढण्यात सुसूत्रता आणण्यासाठी गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यापासून प्रत्येक मंडळस्तरावर संपर्क अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्ह्यात ९८ मंडळ मुख्यालयात झालेल्या फेरफार अदालतीत शेतकरी, खातेदार यांनी सहभागी होत चांगला प्रतिसाद दिला.

दरम्यान, प्रलंबित २१ हजार ५६१ नोंदीपैकी ज्या ११ हजार २७८ नोंदी १५ दिवसांची मुदत पूर्ण होऊन मंजुरीस उपलब्ध झाल्या आहेत, त्यापैकी ३३६१ नोंदी निकाली काढण्यात आल्या. तसेच नागरिक आणि खातेदारांना निकाली काढलेल्या नोंदींचे सातबारा आणि फेरफार वाटप करण्यात आले. उर्वरित दहा हजार २८३ नोंदी तलाठी स्तरावर मुदत पूर्ण होण्यावर प्रलंबित आहेत. तलाठी स्तरावरील प्रलंबित नोंदींच्या नोटीसा काढणे आणि बजावण्याबाबत गतीने प्रक्रिया सुरू आहे. नागरिकांच्या फेरफार नोंदी तत्काळ निकाली काढण्यासाठी प्रशासन यापुढेही तत्परतेने कार्यरत राहील, असे जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी सांगितले आहे.

### दहा लाख नोंदींचा टप्पा पार

गेल्या एका वर्षात तीन लाख नोंदी घेत त्या निकाली काढण्यात आल्या आहेत. सन २०२१ मध्ये फेरफार अदालतीला चांगला प्रतिसाद मिळाला असून २४ नोव्हेंबर रोजी दहा लाख नोंदी घेण्याचा महत्त्वाचा टप्पा पार करण्यात आला. पुणे जिल्ह्यात संगणकीय प्रणालीमध्ये नोंदी करण्यास प्रारंभ केल्यापासून एकूण दहा लाख ९८३ नोंदी झाल्या आहेत. या नोंदीपैकी नऊ लाख ७३ हजार नोंदी निकाली काढण्यात आल्या असून नोंदी निकाली काढण्याचे प्रमाण ९७.१४ टक्के आहे. नोंदी घेण्यात पुणे जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

### तालुकानिहाय निकाली काढलेल्या फेरफार नोंदी

२४ नोव्हेंबरला झालेल्या फेरफार अदालतीमध्ये हवेली तालुक्यात ३१५, पुणे शहर ११, पिंपरी चिंचवड ८४, शिरुर २७०, आंबेगाव १६३, जुन्नर २३१, बारामती ७७६, इंदापूर २०४, मावळ २४१, मुळशी १३४, भोर १११, वेल्हा ४०, दौंड १९४, पुरंदर १७० आणि खेड तालुक्यात ४१७ अशा एकूण ३३६१ फेरफार नोंदी निकाली काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील प्रलंबित तक्रार प्रकरणांची संख्या ४१७३ इतकी असून हे कामकाज पूर्ण करुन निकाली काढण्याचे नियोजन आहे. त्याबाबतच्या सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. ई-हक्क प्रणालीवर लॉगइन करण्यासाठी https://pdeigr.maharashtra.gov.in / संकेतस्थळाचा वापर करावा. नागरिकांनी ई-हक्क प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी केले आहे.




महापालिकेच्या खर्चाने उभ्या राहिलेल्या प्रकल्पांचे श्रेय लाटणाऱ्या नगरसेवकांविरोधात आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी महापालिकेत निदर्शने केली. पिशव्या, बाक, बादल्या खरेदी अशा नगरसेवकांच्या उधळपट्टीविरोधातही आपच्या कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. या खरेदीला पक्षाचा विरोध असल्याचे सांगण्यात आले.



कालव्यातून बाहेर काढलेल्या बछड्याला बिबट रेस्क्यू टीमचे सदस्य किरण वाजगे आणि रमेश सोलाट यांनी वनपाल मनीषा काळे यांच्याकडे सुपूर्द केले.

# डिंभा कालव्यात पडलेल्या बछड्याला जीवदान

## बिबट्या निवारा केंद्रामध्ये उपचारार्थ दाखल

**लोकसत्ता वार्ताहर**

**नारायणगाव :** डिंभा डाव्या कालव्यामध्ये पडलेल्या सुमारे एक ते दीड महिने वयाच्या बिबट्याच्या बछड्याला बाहेर काढण्यात बिबट रेस्क्यू टीम आणि वन खात्याला यश मिळाले. जीवदान मिळालेल्या या बछड्याला पुढील उपचारासाठी माणिकडोह येथील बिबट्या निवारा केंद्रात दाखल करण्यात आले आहे.

नारायणगाव-येडगाव शिवेवरील अंबादास उर्फ लक्ष्मण दत्तात्रय वाजगे यांच्या शेतालगत असलेल्या कालव्यावरून देविदास केदार हे ग्रामस्थ सोमवारी सकाळी शेतावर कामाला जात असताना त्यांना बिबट्याच्या बछड्याचा ओरडण्याचा आवाज ऐकू आला. त्यांनी कालव्यात उतरून पाहिले असता बिबट्याचा बछडा पाण्यात पडला होता. त्यांनी तत्काळ वन विभाग व बिबट रेस्क्यू टीमचे सदस्य किरण वाजगे यांना दूरध्वनीवरून याबाबत माहिती दिली. रेस्क्यू टीमचे सदस्य वाजगे आणि रमेश सोलाट यांनी घटनास्थळी धाव घेऊन त्या बछड्याला बाहेर काढून वनपाल मनीषा काळे यांच्याकडे सुपूर्द केले. वाजगे तसेच वनपाल मनीषा काळे यांनी या बछड्याला नळीच्या सहाय्याने पाणी पाजले. त्यानंतर त्याला माणिकडोह येथील बिबट्या निवारा केंद्रामध्ये पुढील उपचारासाठी दाखल केले. स्थानिक शेतकरी अंबादास वाजगे, संदीप वारुळे, महेंद्र डोके, लहानू केदार, विघ्नहर वाजगे, शिवा कोल्हे आदींनीही या कामात सहकार्य केले.

### पंधरा दिवसांपूर्वी याच ठिकाणी

पंधरा दिवसांपूर्वी नारायणगाव-येडगाव शिवेवरील याच ठिकाणी वाजगे यांच्या शेतामधून दोन बिबट्याचे बछडे शेतमजुरांच्या अंगणात आले होते. २८ नोव्हेंबरला रात्री एक बछडा वाजगे यांच्या शेतापासून काही अंतरावर आढळून आला होता, असे किरण वाजगे यांनी सांगितले.

# पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा अशोक सराफ यांचा विशेष सन्मान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे फिल्म फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १९ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे (पिफ) उद्घाटन गुरुवारी होत आहे. यंदा या महोत्सवाचे १९ वे वर्ष असून यंदाच्या पिफ डिस्टिंग्विश्ड ॲवॉर्डसाठी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांची निवड करण्यात आली आहे.

पुणे फिल्म फाउंडेशनचे अध्यक्ष आणि महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी पुणे फिल्म फाउंडेशनचे सचिव रवी गुप्ता, महोत्सवाचे कलात्मक संचालक समर नखाते, फाउंडेशनचे विश्वस्त सतीश आळेकर, एमआयटी स्कूल ऑफ फिल्म ॲण्ड टेलिव्हिजनचे संचालक अमित त्यागी, श्रीनिवासा संथानम यावेळी उपस्थित होते. गुरुवारी सातारा रस्त्यावरील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सभागृहात संध्याकाळी पाच वाजता महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. याच कार्यक्रमात अभिनेते अशोक सराफ यांना पिफ डिस्टिंग्विश्ड ॲवॉर्डने सन्मानित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यावेळी उपस्थित राहणार आहेत. करोना काळातील उल्लेखनीय कामासाठी महापौर मुरलीधर मोहोळ, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, पुणे पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मुरलीधर तांबे यांचा विशेष सन्मान या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. उद्घाटनानंतर संध्याकाळी साडेसात वाजता मंगोलिया येथील द वुमन हा चित्रपट दाखवण्यात येणार आहे.

सेनापती बापट रस्त्यावरील पॅव्हेलियन मॉलमधील पीव्हीआर आयकॉन, कॅम्प परिसरातील आयनॉक्स व लॉ कॉलेज रस्त्यावरील राष्ट्रीय फिल्म संग्रहालय (एनएफएआय) येथे यंदा महोत्सवातील चित्रपट दाखवले जाणार आहेत. यंदाच्या महोत्सवात राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय येथे दररोज कँडिड टॉक्स या विशेष चर्चासत्राचे आयोजन केले जाणार आहे. चित्रपटाशी संबंधित दिग्दर्शक, कलाकार, पटकथाकार यादरम्यान उपस्थितांशी संवाद साधणार आहेत.

# वाहनाच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू

**पुणे :** मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर वाहनाच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या पादचाऱ्याची ओळख पटलेली नाही.

नवले पुलावरून सोमवारी दुपारी दीडच्या सुमारास निघालेल्या पादचाऱ्याला भरधाव वाहनाने धडक दिली. पादचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक पसार झाला. अपघाताची माहिती मिळताच सिंहगड पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक नितीन जाधव, पोलीस कर्मचारी अमोल काळे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

बाह्यवळण मार्गावरील नवले पुलावर अपघातांचे सत्र कायम असून रविवारी (२८ नोव्हेंबर) दुपारी तीन ट्रक एकमेकांवर आदळून वाहतूक विस्कळीत झाली होती.

# कंत्राटदारीच्या टांगत्या तलवारीविरोधात स्वच्छचे कर्मचारी रस्त्यावर

**लोकसत्ता प्रतिनिधी**



स्वच्छ संस्थेला मिळालेल्या तात्पुरत्या मुदतवाढीविरोधात स्वच्छच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरुन निषेध नोंदवला.

**पुणे :** कामाची शाश्वती, प्रोत्साहन भत्ता आणि सन्मानाची अपेक्षा असताना प्रत्यक्षात पुणे महापालिकेकडून स्वच्छ संस्थेला केवळ एक वर्षाची तात्पुरती मुदतवाढ देण्यात आली आहे. या निर्णयाविरोधात स्वच्छच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरुन निषेध व्यक्त केला. मागील १३ वर्षांपासून पुणे शहराची स्वच्छता आणि पर्यायाने स्वास्थ्यासाठी कार्यरत असलेल्या स्वच्छच्या कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या तोंडावर उपेक्षा केल्याची भावना कचरा वेचकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

पुणे शहराच्या कचरा व्यवस्थापनात भरीव योगदान देणाऱ्या स्वच्छ या संस्थेला केवळ एक वर्षाची तात्पुरती मुदतवाढ देण्याचा निर्णय महापालिकेच्या मुख्य सभेने सोमवारी घेतला. त्या पार्श्वभूमीवर स्वच्छचे कर्मचारी रस्त्यावर उतरले. ७० टक्के पुणे शहराला दररोज दारोदार कचरा संकलनाची पारदर्शक, विश्वसनीय सेवा मागील १३ वर्षांपासून देणाऱ्या ३५०० कचरा वेचकांनी दुर्लक्षित ते संघटित असा अभूतपूर्व प्रवास केला. कचरा वेचकांच्या मागण्यांबाबत कोणतीही चर्चा न करता तात्पुरत्या मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आल्याने कचरा वेचकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.

स्वच्छ पुणेच्या अध्यक्ष सुमन मोरे म्हणाल्या,की ३३ लाख पुणेकरांनी लेखी पाठिंबा देऊनही महापालिकेने केवळ तात्पुरती मुदतवाढ देणे आमच्यासाठी धक्कादायक आहे. सुप्रिया सुळे, मोहन जोशी, महापौर मुरलीधर मोहोळ यांनी जून महिन्यात आंदोलनाच्या वेळी आमच्या मागण्या मान्य करण्याचे आश्वासन आम्हाला तसेच ज्येष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांना दिले होते. प्रत्यक्षात मुख्य सभेत कंत्राटदारी आणण्याची भाषा केली जात आहे. एका वर्षाची तात्पुरती मुदतवाढ ही आमची फसवणूक आहे.

डॉ. बाबा आढाव म्हणाले,की स्वच्छच्या कामाविषयी, कचरा वेचकांच्या उपजीविकेविषयी, शहराला त्यांच्या कामामुळे होणाऱ्या फायद्याविषयी सर्वपक्षीय नेत्यांसोबत वारंवार चर्चा करून देखील कचरा वेचकांना तात्पुरती एका वर्षासाठी मुदतवाढ देण्याचा आणि त्यानंतर कंत्राटदारी पद्धत शहरात लागू करण्याचा मुख्य सभेने घेतलेला निर्णय क्लेशकारक आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश; ओमायक्रॉन विषाणूच्या संसर्गामुळे सतर्कता

# लोहगाव विमानतळावर उतरणाऱ्यांना आरटीपीसीआर बंधनकारक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** दक्षिण आफ्रिकेतील करोना विषाणूच्या उत्परिवर्तीत ओमायक्रॉन विषाणूच्या संसर्गामुळे लोहगाव विमानतळावर उतरणाऱ्या सर्व प्रवाशांची आरटीपीसीआर चाचणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी प्रशासनाला दिले आहेत. तसेच गेल्या चार ते पाच दिवसांत विमानतळावर उतरून जिल्ह्याच्या विविध भागात गेलेल्या नागरिकांचा शोध घेऊन संबंधितांची आरोग्य तपासणी करण्याचेही आदेश डॉ. देशमुख यांनी दिले आहेत.

परदेशातून येणाऱ्या प्रवाशांची चाचणी, तपासणी करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर लोहगाव विमानतळावर उतरणाऱ्या प्रवाशांची आरटीपीसीआर चाचणी बंधनकारक करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी दिले आहेत. तसेच गेल्या चार ते पाच दिवसांत परदेशातून जिल्ह्यात प्रवेश केलेल्या प्रवाशांचा शोध घेऊन त्यांची देखील चाचणी करण्याचे आदेश पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, नगरपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत प्रशासनाला देण्यात आले आहेत. दक्षिण आफ्रिका आणि युरोपीय देशांमध्ये ओमायक्रॉन या करोनाच्या उत्परिवर्तीत विषाणूच्या संसर्गाचा प्रभाव पाहता केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि राज्य शासनाने राज्यात ठिकठिकाणी आलेल्या प्रवाशांची माहिती घेण्याबाबत आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री कार्यालयाकडून सोमवारी सकाळी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे आढावा घेऊन खबरदारीच्या सूचना दिल्या आहेत.

याबाबत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. देशमुख म्हणाले, 'लोहगाव विमानतळावर आलेल्या प्रवाशांची माहिती मुख्यमंत्री आणि सचिवांना देण्यात आली असून महानगरपालिकेचे आरोग्य विभाग तपासणी पथक विमानतळावर यापूर्वीपासून कार्यरत आहे. राज्य शासनाच्या नवीन आदेशानुसार परदेशातून आलेल्या प्रवाशांनी लशीच्या दोन्ही मात्रा घेतल्या असल्या, तरी संबंधित प्रवाशांची आरटीपीसीआर चाचणी करण्यात येणार आहे.'



> ओमायक्रॉन या करोनाच्या उत्परिवर्तीत विषाणूच्या प्रादुर्भावाची शक्यता गृहित धरून शहरासह जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणांना सतर्कतेचे आदेश दिले आहेत. तसेच खबरदारी म्हणून तत्काळ अतिरिक्त मनुष्यबळाचे नियोजन करण्यात येणार आहे. शहरासह जिल्ह्यातील ज्या नागरिकांनी लशीची पहिली किंवा दुसरा मात्रा घेण्यात आली आहे, त्यांची स्थानिक प्रशासनाकडून माहिती घेण्यास सुरवात केली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवडसह ग्रामीण भागातील सर्व नागरिकांनी लवकरात लवकर लशीच्या दोन्ही मात्रा पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
> – **डॉ. राजेश देशमुख,** जिल्हाधिकारी

# मतदारांसाठी घोषणांचा सपाटा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** आगामी महापालिका निवडणुकांच्या तोंडावर मतदारांना खूश करण्यासाठी सत्ताधारी भाजपने अनेक लोकप्रिय निर्णयांचा तसेच घोषणांचा सपाटा लावला आहे.

करोना काळात विधवा झालेल्या महिलांना पिंपरी पालिकेकडून २५ हजार रूपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय यापूर्वी घेण्यात आला होता. मात्र, यापूर्वी ठरवण्यात आलेली ५० वर्षे वयोमर्यादेची अट आता रद्द करण्यात आली आहे. यापुढे करोनामुळे विधवा झालेल्या शहरातील सर्व महिलांना सरसकट ही मदत दिली जाणार आहे. दिव्यांग व्यक्तीने दिव्यांगाशी विवाह केल्यास अशा दाम्पत्यास आर्थिक मदत व्हावी म्हणून दोन लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

माझी मिळकत, माझी आकारणी ही योजना महापालिकेने जाहीर केली. त्याअंतर्गत करआकारणी न झालेल्या मिळकतींची आकारणी करून घेण्यासाठी एखादा नागरिक स्वतःहून पुढाकार घेत असेल तर, त्या आर्थिक वर्षातील चालू मिळकत देयकांमधून सामान्य करात पाच टक्के सवलत देण्यात येणार आहे. शहरात महापालिकेची चार नाट्यगृहे आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या संस्थांना मोफत नाट्यगृहे उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांनी केवळ स्वच्छता व वीज देयकांचे शुल्क भरायचे आहे. इतर भाडेशुल्क माफ करण्यात येणार आहे. थकबाकीदार मिळकतकर धारकांना दिलासा देण्याच्या हेतूने दंड रकमेत (शास्तीकर) सवलत देण्यात येणार आहे. तसेच, देहूरोड येथील धम्मभूमीला २० लाख रुपये आर्थिक सहाय्य करण्यास मान्यता देण्यात आली. सध्या पीएमपीमध्ये असणाऱ्या पूर्वपीसीएमटीच्या १०६ कामगारांना पिंपरी पालिकेत कायमस्वरूपी विलीनीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### प्राधिकरणवासीयांना दिलासा

पिंपरी प्राधिकरणाचे पीएमआरडीएमध्ये विलीनीकरण झाले. त्यानंतर झालेल्या कामाच्या विभागणीत प्राधिकरणाचे जे काम पालिकेकडे वर्ग झाले आहे, ते करताना पालिकेकडून विविध शुल्क आकारणी करण्यात येते. सत्ताधाऱ्यांनी यासंदर्भात पालिका सभेत नव्याने धोरण मंजूर करून घेतले आहे. त्यानुसार, पिंपरी पालिकेमार्फत सदनिका हस्तांतरित करणे, हस्तांतरित शुल्क, प्रस्तावित वाढ समाविष्ट करणे तथा कमी करणे, नावे वर्ग करणे आदींबाबत आता कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार नाही. या निर्णयामुळे प्राधिकरणवासीयांना दिलासा मिळणार आहे. मात्र. अंतिम मान्यता राज्य शासनाकडून घ्यावी लागणार आहे.

# पुरवणी मतदार यादीत नोंदणीची संधी

## निवडणूक शाखेचे आवाहन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** जिल्हा निवडणूक शाखेकडून तयार करण्यात आलेल्या शहरासह जिल्ह्याच्या प्रारूप मतदार यादीवर आक्षेप, हरकती नोंदवण्यासाठी मंगळवार (३० नोव्हेंबर) शेवटचा दिवस आहे. तसेच अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यापूर्वी तयार करण्यात येणाऱ्या पुरवणी मतदार यादीमध्ये नाव येण्यासाठी मतदार म्हणून नावनोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक शाखेकडून करण्यात आले आहे.

जिल्हा निवडणूक शाखेने १ नोव्हेंबर रोजी प्रारुप यादी जाहीर केली आहे. त्यानुसार शहरासह जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघांमध्ये मतदारांची संख्या ७८ लाख ९५ हजार ८९४ झाली आहे. मतदारांनी मतदार यादीत नाव आहे किंवा कसे, हे तपासणे आवश्यक आहे. याबाबत हरकती असल्यास त्या नोंदवाव्या. हरकतींवर २० डिसेंबरपर्यंत सुनावणी होऊन ५ जानेवारी २०२२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. तसेच ही अंतिम यादी पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी वापरण्यात येणार आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी मतदारांची नोंदणी करून घेण्यावर भर दिला आहे.

ही प्रक्रिया सुरू असली, तरी दुबार आणि मृत मतदारांची नावे वगळण्यात आल्याने प्रारुप मतदार यादीत नाव आहे की नाही, हे मतदारांनी तपासून पहावे, असे जिल्हा निवडणूक शाखेकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, त्यानुसार पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित ग्रामीण भाग मिळून एकूण २१ विधानसभा मतदार संघांमध्ये ७८ लाख ९५ हजार ८९४ मतदार झाले आहेत. त्यापैकी पुणे शहरातील आठ विधानसभा मतदार संघांमध्ये ३१ लाख १३ हजार ९१७, पिंपरी-चिंचवडमधील तीन मतदारसंघांमध्ये १३ लाख ६१ हजार १७५, तर ग्रामीण भागातील दहा विधानसभा मतदार संघांमध्ये ३४ लाख २० हजार ८०१ मतदार झाले आहेत.

### हडपसरमध्ये सर्वाधिक मतदार

पुण्यातील आठ मतदारसंघांमध्ये हडपसर मतदारसंघ हा मतदार संख्येत पहिल्या स्थानावर आहे. हडपसरमध्ये पाच लाख २४ हजार ३५२ मतदार झाले आहेत. दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर अनुक्रमे खडकवासला आणि वडगाव शेरी मतदारसंघ आहेत. खडकवासला मतदारसंघात पाच लाख ११ हजार ५५१ मतदार असून, वडगाव शेरीमध्ये चार लाख ४९ हजार ४६५ मतदार आहेत. चौथ्या स्थानावर असलेल्या कोथरूड विधानसभा मतदारसंघात चार लाख १८ हजार ६४४ मतदार झाले आहेत. पर्वती मतदार संघ हा पाचव्या स्थानावर असून, या मतदारसंघात तीन लाख ४९ हजार ८४३ मतदार आहेत. सहाव्या स्थानावर असलेल्या शिवाजीनगर मतदारसंघामध्ये दोन लाख ९४ हजार ९७८ मतदार आहेत. कसबा विधानसभा मतदारसंघामध्ये दोन लाख ८३ हजार ९९६ मतदार, तर पुणे कँन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात दोन लाख ८१ हजार ८९ मतदार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक शाखेकडून देण्यात आली.

### नाव पाहण्यासाठी संकेतस्थळ

१ नोव्हेंबरला निवडणूक शाखेकडून प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदार यादीत आपले नाव आहे किंवा कसे, हे तपासण्यासाठी **NVSP.In** किंवा **Voters Helpline** या उपयोजनवर (ॲप), किंवा **Electoral Search** या निवडणूक विभागाच्या संकेतस्थळावर तपासता येणार आहे. मतदार यादीत नाव नसल्यास ३० नोव्हेंबरपर्यंत याच संकेतस्थळांवर अर्ज क्रमांक सहा भरावा, असे आवाहन उप जिल्हा निवडणूक अधिकारी मृणालिनी सावंत यांनी केले आहे.

# पिंपरी पालिकेचे भटक्या प्राण्यांसाठी शुश्रूषा केंद्र

लोकसत्ता प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील भटक्या प्राण्यांसाठी महापालिकेच्या वतीने प्राणी शुश्रूषा केंद्र आणि औषधोपचार केंद्र सुरू करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे, सार्वजनिक ठिकाणी पाळीव प्राण्यांना शौचासाठी नेणाऱ्या नागरिकांवर ५०० रुपये दंड आकारण्याचा निर्णयही पालिकेने घेतला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या संख्येने भटके श्वान, मोकाट जनावरे आहेत. त्यावरून अनेक प्रश्न निर्माण होतात. शहरवासीयांकडून सतत तक्रारीही येत असतात. अपघातात जखमी झालेल्या जनावरांना तत्काळ उपचारांची तसेच औषधोपचारांची गरज असते.

महापालिकेकडे असलेली यंत्रणा अपुरी पडते. मनुष्यबळाचीही कमतरता आहे. त्यामुळे वेळेवर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे अवघड जाते. या पार्श्वभूमीवर, हे मुद्दे उपस्थित करून पालिकेने खासगी संस्थेच्या सहकार्याने उपचार केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार, पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेला प्रस्ताव पालिका सभेत मांडण्यात आला असता, त्यास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार, प्राणी शुश्रूषा, उपचार केंद्र हे स्वंयपूर्ण बनवण्यासाठी भटके श्वान, मांजर यांच्यावर मोफत उपचार व वाजवी दरात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. केस पेपर २० रुपये, बाह्यरूग्ण विभाग १५० रुपये, विशेष उपचार २०० रुपये, रेबीज प्रतिबंधक लस १०० रुपये, क्ष किरण २५० रुपये, सोनाग्राफी ३५० रुपये, शस्त्रक्रिया सेवा शुल्क ४०० रुपये असे दर ठरवण्यात आले आहेत. एका वर्षासाठी खासगी संस्थेला हे काम देण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### अरविंद ठोंबरे यांचा सत्कार

पुणे जिल्हा हौशी मुष्टियुद्ध संघटना, पुणे या संघटनेचे संस्थापक सदस्य, ज्येष्ठ मुष्टियुद्ध प्रशिक्षक, राष्ट्रीय मुष्टियुद्ध पंच आणि आंतरराष्ट्रीय मुष्टियोद्धे अरविंद ठोंबरे यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (३० डिसेंबर) विशेष सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. मुष्टियुद्ध संघटनेचे अध्यक्ष विजय सावंत यांच्या हस्ते, प्रकाश रेणुसे यांच्या अध्यक्षतेखाली हा सत्कार सोहळा होणार आहे. अरविंद ठोंबरे यांनी टिळक रस्ता महाराष्ट्रीय मंडळात मागील १५-२० वर्षे मुष्टियुद्ध प्रशिक्षण देऊन अनेक राष्ट्रीय खेळाडू घडवले आहेत.

### ‘आयआयएमएस’ला स्वच्छ भारत अभियान पुरस्कार

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या चिंचवड येथील इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) संस्थेला केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या नेहरू युवा केंद्र पुणे या संस्थेतर्फे स्वच्छ भारत अभियान २०२१-२२ चा जिल्हा स्तरीय पुरस्कार देण्यात आला. जनमानसात स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी संस्थेने आपल्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबवलेल्या स्वच्छ भारत अभियान अंमलबजावणीसाठी हा पुरस्कार देण्यात आला आहे. संस्थेचे पदाधिकारी पवन शर्मा यांनी संस्थेच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

### जेधे महाविद्यालयात संविधान दिवस उत्साहात

समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राज्यशास्त्र विभागातर्फे संविधान साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करून भारतीय संविधान दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. शिवाजी पाचरणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

### वाडिया महाविद्यालयात कार्यक्रम

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्सच्या समता मंडळातर्फे भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून जयभीम हा चित्रपट दाखवण्यात आला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. समता मंडळाचे समन्वयक डॉ. लक्ष्मण बैसाणे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रास्ताविक प्रा. संपत त्रिभुवन यांनी केले. प्रभारी प्राचार्य डॉ. वृषाली रणधीर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. २६-११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.

### कावेरी महाविद्यालयात संविधान वाचन

कन्नड संघ संचलित कावेरी महाविद्यालयात २६ नोव्हेंबरला संविधान दिन साजरा करण्यात आला. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नीलेश नेमाडे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. प्राचार्य डॉ. अशोक अग्रवाल यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

### महात्मा फुले यांच्या स्मृतींना अभिवादन

महात्मा फुले यांच्या १३१ व्या पुण्यतिथीनिमित्त महात्मा फुले मंडळातर्फे त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष मधुकर राऊत, ज्योती मित्र मंडळाचे अध्यक्ष शिवराम जांभुळकर, अखिल भारतीय माळी समाज, प्रबोधन व शिक्षण संस्था अध्यक्ष दिलीप राऊत. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या अध्यक्ष शारदा लडकत, खडकमाळ आळी युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेतील महात्मा फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला तसेच कृषी महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महात्मा फुले वाडा समता भूमी आणि गंज पेठ पोलीस चौकी येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्याला वंदन करण्यात आले.

## उपाहारगृहात आग

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील नांदेड गाव परिसरात एका उपाहारगृहाला मध्यरात्री आग लागली. आगीत उपाहारगृहामधील सर्व साहित्य जळून भस्मसात झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी दोन ते अडीच तासात आग आटोक्यात आणली.

नांदेड गावातील निर्मल हाईट्स इमारतीत पहिल्या मजल्यावर भावेश हॉटेल आहे. सोमवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास उपाहारगृहातून मोठ्या प्रमाणावर धूर येत असल्याची माहिती पुणे महापालिकेचे अग्निशमन दल तसेच पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अग्निशमन दलाला मिळाली. अग्निशमन दलाचे तीन बंब घटनास्थळी दाखल झाले. उपाहारगृहातील लाकडी साहित्याने पेट घेतल्याने आग आटोक्यात आणताना अडथळे आले. जवानांनी पाण्याचा मारा करून दोन ते अडीच तासात आग आटोक्यात आणली, अशी माहिती पीएमआरडीएच्या अग्निशमन दलातील अधिकारी सुजित पाटील यांनी दिली.

उपाहारगृहात कोणी कामगार नव्हते, त्यामुळे गंभीर दुर्घटना टळली. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

# म्हाडा गृहप्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवडच्या नावलौकिकात भर



म्हाडाच्या पात्र लाभार्थ्यांना सदनिकांच्या चाव्यांचे वाटप प्रातिनिधिक स्वरुपात करण्यात आले.

लोकसत्ता प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरीतील म्हाडा गृहप्रकल्पामुळे शहराच्या नावलौकिकात भर पडणार आहे, असा विश्वास महापालिका आयुक्त राजेश पाटील यांनी व्यक्त केला. शहर स्वच्छ व सुंदर असावे, यासाठी महापालिका स्तरावर सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या (म्हाडा) पिंपरी वाघेरे येथील पात्र लाभार्थ्यांना आमदार अण्णा बनसोडे यांच्या हस्ते सदनिकांच्या प्रातिनिधिक चाव्या वाटप करण्यात आल्या, तेव्हा आयुक्त बोलत होते.

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र निंबाळकर, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन माने, स्थानिक नगरसेवक उषा वाघेरे, संदीप वाघेरे, निकीता कदम आदी उपस्थित होते.

आमदार बनसोडे म्हणाले की, ६०० कोटी खर्चाचा आणि ९३५ घरांचा हा प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण झाला असून खासगी बांधकाम व्यावसायिकांच्या तोडीची म्हाडाची घरे आहेत. माने म्हणाले की, आधुनिक साधने व तंत्रांचा वापर करून ही घरे बांधण्यात आली आहेत.

### अजित पवार, आव्हाड गैरहजर

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आणि गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार होता. मात्र, पवार व आव्हाड आले नाहीत. त्यांनी कार्यक्रम का टाळला, याचे कारण स्पष्ट न झाल्याने उपस्थितांमध्ये तर्कवितर्क सुरू होते. अजितदादा आजारी असल्याने आले नाहीत, असे कारण आमदार बनसोडे यांनी त्यांच्या भाषणात सांगितले.

## कात्रज घाटात शिवशाही बसवर दगडफेक

### प्रवासी युवक जखमी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** कात्रज घाटात शिवशाही बसवर अज्ञातांनी दगडफेक केल्याची घटना घडली. दगडफेकीत बसमधील प्रवासी युवक जखमी झाला.

तेजस तानाजी शिंदे (वय २४. रा. शिंबेवाडी, गुढे, ता. पाटण, जि. सातारा) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. शिवशाही बसचालक गणेश हेगण्णा (वय २८, रा. शिरोळ, जि. कोल्हापूर) यांनी यासंदर्भात भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही बस स्वारगेट आगारातून शनिवारी (२७ नोव्हेंबर) रात्री सांगलीकडे निघाली. कात्रज घाटात रात्री साडेआठच्या सुमारास अज्ञातांनी बसवर दगडफेक सुरू केली. बसमधील प्रवासी तेजस शिंदे याला दगड लागल्याने तो जखमी झाला. या शिवशाही बस पाठोपाठ सांगलीकडे निघालेल्या आणखी एका शिवशाही बसवर अज्ञातांनी दगडफेक केली. अंधारात आरोपी पसार झाले. पोलीस हवालदार कैलास आखुटे तपास करत आहेत.

# फलक काढण्याची कारवाई राजकीय दबावातून - लांडगे

लोकसत्ता प्रतिनिधी

**पिंपरी :** भाजपची वातावरणनिर्मिती आणि पक्षाने पालिकेच्या माध्यमातून केलेल्या कामांची प्रसिध्दी होत असल्यामुळेच भाजपचे फलक काढण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. ती कारवाई राजकीय दबावातूनच होत असल्याचा आरोप भाजपचे आमदार आणि पिंपरीचे शहराध्यक्ष महेश लांडगे यांनी केला आहे.

आयुक्त राजेश पाटील यांच्या आदेशानुसार आमदार लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त लावलेले शुभेच्छाफलक काढण्याची कारवाई सुरू झाल्याने भाजप वर्तुळात संतापाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर, लांडगे यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून जाहीर निवेदन केले आहे.

पालिकेचे अधिकारी आपलेच आहेत. कारवाईसाठी त्यांच्यावर राजकीय दबाव आहे. आगामी निवडणुकांची पार्श्वभूमी त्यामागे आहे. हा दबाव आजचा नाही. तर, गेल्या दोन वर्षांपासून अधिकारी दबावाखाली काम करत आहेत. माझ्या वाढदिवसांच्या शुभेच्छाफलकांवर कारवाई करण्यामागे हेच दबावाचे राजकारण आहे. त्यामुळे पालिका अधिकाऱ्यांशी संघर्ष करू नका. शुभेच्छाफलक काढून घ्या व प्रशासनाला सहकार्य करा, असे लांडगे यांनी म्हटले आहे.

## शहरात चंदन चोरट्यांचा धुमाकूळ

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** वानवडीतील राज्य राखीव पोलीस दलाच्या आवारातील (एसआरपीएफ) चंदनाची चार झाडे चोरट्यांनी कापून नेल्याची घटना घडली. दोन महिन्यांपूर्वी राज्य राखीव पोलीस दलाच्या आवरात चंदन चोरीची घटना घडली होती.

राज्य राखीव पोलीस दलातील सहायक फौजदार विक्रांत सूर्यवंशी यांनी यासंदर्भात वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. राज्य राखीव पोलीस दलाचे आवार विस्तीर्ण आहे. मुख्यालयाच्या आवारात असलेली चार चंदनाची झाडे चोरट्यांनी कापून नेल्याची घटना नुकतीच उघडकीस आली.

शहरात गेल्या काही महिन्यांपासून चंदनाची झाडे कापून नेण्याच्या घटना घडल्या आहेत. शासकीय कार्यालये तसेच बंगल्यांच्या आवारातून चंदनाची झाडे कापून नेण्यात आली आहेत. पोलीस हवालदार आर. आर. रासगे तपास करत आहेत.

## व्याजाचे पैसे न दिल्याने एकाचा खून

### कात्रजमधील आंबेगाव भागातील घटना

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** व्याजाने दिलेले पैसे न दिल्याने एकाचा खून करण्यात आल्याची घटना कात्रजमधील आंबेगाव भागात घडली. याप्रकरणी एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

शरद शिवाजी आवारे (वय ४३ सध्या रा. धनकवडी, मूळ रा. पन्हाळे, चांदवड, जि. नाशिक) असे खून झालेल्याचे नाव आहे. आवारेंचे मित्र प्रशांत महादेव कदम (वय ३१, रा. धनकवडी) यांनी यासंदर्भात भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी प्रकाश शिंदे आणि त्याच्या साथीदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद आणि प्रशांत मित्र आहेत. शरद यांनी आरोपी शिंदे याच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. व्याजाने दिलेले पैसे उशीर झाल्याने रविवारी (२८ नोव्हेंबर) रात्री शरद यांना आरोपींनी कात्रजमधील आंबेगाव भागात बोलावून घेतले. त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर आरोपी शिंदे आणि साथीदाराने शरद यांच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले.

या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर, सहायक निरीक्षक आशिष कवठेकर, उपनिरीक्षक अंकुश कर्चे यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## महिलेचे दागिने हिसकावले

**पुणे :** खरेदीच्या बहाण्याने दुकानात शिरलेल्या चोरट्याने ज्येष्ठ महिलेचे दागिने हिसकावल्याची घटना कर्वेनगर भागात घडली.

याबाबत आनंद वडनेरे (वय ५३, रा. कर्वेनगर) यांनी अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. वडनेरे यांचे कर्वेनगर भागात जनरल स्टोअर्स आहे. दोन दिवसांपूर्वी वडनेरे यांची आई दुकानात थांबली होती.

सकाळी सातच्या सुमारास चोरटा दुकानात खरेदीच्या बहाण्याने शिरला. वडनेरे यांच्या आईचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरट्याने त्यांच्या गळ्यातील वीस हजारांचे मंगळसूत्र हिसकावले. पोलीस हवालदार शिंदे तपास करत आहेत.

## ‘नागरिकांच्या निरोगी आयुष्यासाठी उद्याने महत्त्वाची’

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी उद्याने आवश्यक आहेत. पुणे महापालिकेने आरोग्याचा विचार करुन उद्याने विकसित केली आहेत. सॅलिसबरी पार्कचे उद्यान हे शहरातील प्रथम क्रमांकाचे उद्यान ठरेल, असे प्रतिपादन खासदार गिरीश बापट यांनी केले.

पुणे महापालिकेचे माजी सभागृह नेते आणि विद्यमान नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांच्या प्रयत्नांतून त्यांच्या प्रभागातील सर्वेक्षण क्रमांक ४३८ येथे अत्याधुनिक उद्यान साकारण्यात आले आहे. भिमाले यांच्या वाढदिवसानिमित्त गिरीश बापट यांच्या हस्ते या उद्यानाचे उद्घाटन करण्यात आले. आमदार आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दृकश्राव्य स्वरूपात या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

महापौर मुरलीधर मोहोळ, उपमहापौर सुनीता वाडेकर, स्थायी समितीचे अध्यक्ष हेमंत रासने, भारतीय जनता पक्षाचे संघटन सरचिटणीस राजेश पांडे, आमदार सुनील कांबळे, माजी नगरसेविका वंदना भिमाले व्यासपीठावर उपस्थित होत्या. बोनसाय पद्धतीचे वृक्ष, आकर्षक विद्युत रोषणाई, ॲम्फी थिएटर, सेल्फी पॉइंट, पॅगोडा, विविधरंगी फुलांचे ताटवे ही या उद्यानाची वैशिष्ट्ये आहेत.

# पीक पाहणी प्रकल्पांतर्गत जिल्ह्यात ३७० पिकांची नोंद

## एक लाख ८४ हजार शेतकऱ्यांकडून दीड लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांची नोंद

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्य शासनाच्या ई-पीक पाहणी प्रकल्पांतर्गत पुणे जिल्ह्यात आतापर्यंत ३७० पिकांची नोंद करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत एक लाख ८४ हजार खातेदारांनी दीड लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांची नोंद केली आहे. या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यात ऊस, भात आणि सोयाबीन पिकांचे क्षेत्र मोठे असल्याचे दिसून आल्याचे महसूल विभागाकडून सांगण्यात आले.

शेतकरी आता स्वतः शेतातल्या पिकांची नोंद सातबारा उताऱ्यावर करू शकणार आहेत. यासाठी कृषी आणि महसूल विभागाने संयुक्तपणे ई-पीक पाहणी नावाचा उपक्रम हाती घेतला आहे. जिल्ह्यात सर्वाधिक ५७ हजार ५०१ हेक्टर ऊस, १६ हजार ९७५ हेक्टर भात, तर १२ हजार ३४३ हेक्टर सोयाबीन यांची नोंद या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे. जुन्नर तालुक्यात २० हजार ३५० हेक्टर, पुरंदरमध्ये ७२६६, वेल्ह्यात ८२०, भोर ३४८७, बारामती २३ हजार ४८९, इंदापूर ३० हजार ७०८, आंबेगाव ११ हजार २३०, शिरूर १५ हजार १७०, खेड ९४८२, मावळात ४२२४, मुळशी २४५२, दौंड १५ हजार ६८, हवेली ४४७८ आणि पुणे शहर तालुक्यात ३६ हेक्टर क्षेत्रावरील विविध पिकांची नोंद या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांनी केली आहे, अशी माहिती ई-पीक पाहणी प्रकल्पाचे राज्य समन्वयक रामदास जगताप यांनी दिली.

दरम्यान, ई-पीक पाहणीचा प्रयोग राबवण्यात येत असल्याने कोणत्या शेतकऱ्याने किती क्षेत्रावर, कोणते पीक घेतले आहे, याची माहिती प्रशासनाला समजत आहे. या योजनेमुळे नैसर्गिक आपत्ती किंवा दुष्काळात पीक विमा आणि अन्य मदत घेताना या माहितीचा उपयोग होत आहे.

शेतकऱ्यांनी पीक विमा काढला असल्यास महसूल विभागाकडून गाव किंवा गट क्रमांकाद्वारे सर्वेक्षण करण्याची पारंपरिक पद्धत होती. ही पद्धत खर्चिक आणि वेळखाऊ होती. तसेच किती क्षेत्रावर कोणते पीक घेण्यात आले आहे, याचा निश्चित अंदाज लावता येत नव्हता. या पार्श्वभूमीवर ई-पीक पाहणी ही मोबाइल ॲपद्वारे करण्यास गेल्या वर्षीपासून सुरुवात करण्यात आली आहे. तलाठ्यांकडून संबंधित माहितीची पडताळणी करून सातबारा उताऱ्यांवर ऑनलाइन पद्धतीने त्याची नोंद केली जाते, असेही जगताप यांनी सांगितले.



### ई-पीक पाहणी प्रकल्पाचा जिल्ह्यातील आढावा

- ✱ एकूण सातबारा उताऱ्यांची संख्या एक कोटी ४९ लाख सहा हजार ३३८
- ✱ ई-पीक पाहणी अंतर्गत नोंदणी झालेले खातेदार एक लाख ८४ हजार ३३३
- ✱ ई-पीक पाहणी अंतर्गत नोंदवलेले पिकांचे क्षेत्र (हेक्टर) एक लाख ४९ हजार ५२५
- ✱ एकूण पीक संख्या ३७०

## दैनंदिनी

- ♦ **चित्रप्रदर्शन :** आम्ही छंदिष्ट, कलाकारांचे चित्रप्रदर्शन, स्थळ- बालगंधर्व कलादालन, जंगली महाराज रस्ता, सकाळी ९ ते रात्री ८
- ♦ **जनजागृती कार्यक्रम :** सर्व सेवा संघ, एचआयव्ही, एड्स जनजागृती कार्यक्रम, स्थळ- मुकुंदराव आंबेडकर चौक, विश्रांतवाडी, सकाळी ९ ते ११
- ♦ **चित्रप्रदर्शन :** क्वाच ॲण्ड क्वेस्ट चित्रप्रदर्शन, चित्रकार शीतल ओक यांच्या चित्रांचे प्रदर्शन, राजा रवि वर्मा कलादालन, घोले रस्ता, शिवाजीनगर, सकाळी ११ ते रात्री ८
- ♦ **पुरस्कार प्रदान :** दी रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी, गुरूवर्य आबासाहेब आणि इंदिरा अत्रे पुरस्कार प्रदान सोहळा, रजनी परांजपे यांना गुरूवर्य आबासाहेब अत्रे पुरस्कार, राणी तुकाराम जाधव, आनंद सराफ यांना इंदिरा आबासाहेब अत्रे पुरस्कार, हस्ते- डॉ. प्रभा अत्रे, स्थळ- दी रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीचे सभागृह, ३५२, सोमवार पेठ, सायं. ५.३०
- ♦ **व्याख्यानमाला :** महात्मा जोतिराव फुले समता प्रतिष्ठान, फुले आंबेडकर व्याख्यानमाला, विषय- बदलती माध्यमे आणि समाज, वक्त्या- अश्विनी सातव-डोके, अध्यक्ष- अरूण खोरे, स्थळ- महात्मा फुले वाडा, महात्मा फुले पेठ, मध्यवर्ती अग्निशमन केंद्राजवळ, सायं. ६.१५

## माहितीसाठी

### राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन

मराठबोली पुणे या संस्थेतर्फे राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी प्रकाशक वा संपादकांनी आपल्या दिवाळी अंकाच्या दोन प्रती १० डिसेंबर २०२१ पर्यंत पाठवाव्यात. अंक पाठवण्यासाठी पत्ता - परमेश्वर उमरदंड, स्वामी रेसिडेन्सी, सी १०२, शाहू कॉलनी, गल्ली क्रमांक ९, कर्वेनगर, पुणे - ४११०५२. अधिक माहितीसाठी ९३२५५०९४५० या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### फूड फोटोग्राफी स्पर्धेचे आयोजन

अल्ग-ओ-रिदम या पुण्यातील कलाप्रेमींच्या समूहातर्फे फूड फोटोग्राफी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा सर्वांसाठी निःशुल्क असून प्रत्येक स्पर्धकाला जास्तीत जास्त दोन छायाचित्रे पाठवता येतील. या छायाचित्रांच्या एफोर आकारातील प्रती खावाकी कॅफे येथे १० डिसेंबरपूर्वी आणून द्याव्यात असे आवाहन करण्यात आले आहे. पत्ता - ९-७३, महर्षिनगर, स्वारगेटजवळ, पुणे - ४११०३७. अधिक माहितीसाठी ७०२०८७६५९७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

एमपीएससी मंत्र

रोहिणी शहा

# राज्यसेवा पूर्व परीक्षा

# भूगोल प्रश्न विश्लेषण



**राज्यसेवा पूर्व** परीक्षा एप्रिलमध्ये प्रस्तावित आहे. मागील लेखांमध्ये पूर्व परीक्षेच्या इतिहास घटकाच्या तयारीबाबत चर्चा करण्यात आली. या लेखापासून भूगोल घटकाच्या तयारीबाबत चर्चा करण्यात येत आहे. मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांमधील भूगोल घटकाच्या प्रश्नांचे विश्लेषण या लेखामध्ये पाहू. मागील तीन वर्षांतील प्रातिनिधिक प्रश्न पाहणे यासाठी उपयुक्त ठरेल. योग्य उत्तराचा पर्याय ठळक केलेला आहे.



**प्रश्न १. पुढील विधाने विचारात घ्या.**
(a) कडप्पा खडक श्रेणी ही पेनगंगा आणि गोदावरी नदी खोऱ्यात आढळते.
(b) धारवाड खडक श्रेणीमधे लोहखनिज, मँगनिज सापडते.
(c) गोंडवना खडक श्रेणीमधे दगडी कोळसा मुबलक प्रमाणात आढळतो.

**पर्यायी उत्तरे:**
१) फक्त विधान (a) बरोबर आहे.
२) फक्त विधान (b) बरोबर आहे.
३) विधान (b) आणि (c) बरोबर आहेत.
**४) विधान (a), (b) आणि (c) बरोबर आहेत.**

**प्रश्न २. खालील विधानांचे परीक्षण करा व योग्य पर्यायाची निवड करा.**
विधान अः पृथ्वीचा अंतर्गाभा हा निकेल आणि लोह यांच्यापासून बनला आहे.
विधान बः पृथ्वीचे कवच हे सिलिका, अ‍ॅल्युमिनिअम आणि मॅग्नेशिअम यांच्यापासून बनले आहे.

**पर्यायी उत्तरे:**
**१) विधान अ आणि ब दोन्ही बरोबर आहेत.**
२) विधान अ बरोबर असून ब चूक आहे.
३) विधान अ चूक असून ब बरोबर आहे.
४) विधान अ आणि ब दोन्ही चूक आहेत.

**प्रश्न ३. खालील विधानांचा विचार करून बिनचूक पर्यायांची निवड करा.**
अ. ज्या ठिकाणी खंडांत उतार अतिशय रुंद असतो, त्या क्षेत्रामध्ये मत्स्य क्षेत्रे तयार होतात.
ब. उबदार उष्ण कटीबंधीय सागरी पाण्यामध्ये मासेमारी विकसित झालेली आहे.
क. उष्ण आणि थंड समुद्री प्रवाहांच्या मिश्रणामधून माश्यांसाठी वनस्पती खाद्य आणले जाते.
ड. भारतामध्ये अंतर्गत मासेमारी इतर मासेमारी प्रकारांपेक्षा खूप महत्त्वाची आहे.

**पर्यायी उत्तरे:**
१) विधाने अ आणि ब सत्य आहेत.
२) विधाने अ आणि क सत्य आहेत.
३) विधाने ब, क आणि ड सत्य आहेत.
**४) विधाने अ, ब आणि क सत्य आहेत.**

**प्रश्न ४. खालील शास्त्रज्ञांनी दिलेल्या 'इष्टतम लोकसंख्येच्या व्याख्येशी संदर्भित शास्त्रज्ञांच्या जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| (a) बॉडिंग | (i) जास्तीत जास्त आर्थिक परतावा |
| (b) डॅल्टन | (ii) राहणीमानाचा दर्जा उंचावणे |
| (c) पीटरसन | (iii) जास्तीत जास्त समाज कल्याण |
| (d) कार सॉन्डर्स | (iv) दरडोई जास्तीत जास्त उत्पन्न |

**पर्यायी उत्तरे:**
१) (a)- (iv) (b)- (iii) (c)- (ii) (d)- (i)
**२) (a)- (ii) (b)- (iv) (c)- (i)(d)-(iii)**
३) (a)- (ii) (b)- (iii) (c)- (iv) (d)- (i)
४) (a)- (iii) (b)- (i) (c)- (iv) (d)- (ii)

**प्रश्न ५. खालील वैशिष्ट्ये कोणत्या प्रदेशाची आहेत?**
अ. जलवाहतुकीसाठी उपयुक्त आहे.
ब. नारळाचे उत्पादन घेतले जाते.
क. मासेमारीसाठी अनुकूल असतो.
ड. पर्यटकांसाठी आकर्षक असतो.

**पर्यायी उत्तरे:**
१) उत्तर भारतीय मैदानी प्रदेश
२) प्रायद्वीपीय पठारी प्रदेश
**३) किनारवर्ती प्रदेश**
४) हिमालयीन प्रदेश

**प्रश्न ६. खाली दोन विधान दिलेली आहेत. (अ) हे विधान असून (र) हे कारण आहे. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**
विधान (अ) पर्वतीय आणि डोंगराळ प्रदेशामध्ये हवाई वाहतूक हेच सर्वांसाठी उपयुक्त साधन आहे.
कारण (र): पर्वतीय प्रदेशामध्ये रस्ते आणि रेल्वेमार्ग तयार करणे अतिशय कठीण आणि खर्चीक आहे.

**पर्यायी उत्तरे:**
१) (अ) आणि (र) दोन्ही सत्य असून (र) हे (अ) चे बिनचूक स्पष्टीकरण आहे.
२) (अ) आणि (र) दोन्ही सत्य असून (र) हे (अ) चे बिनचूक स्पष्टीकरण नाही.
३) (अ) सत्य असून विधान (र) असत्य आहे.
**४) (अ) असत्य असून विधान (र) सत्य आहे.**



**या प्रातिनिधिक प्रश्नांवरून तयारी करताना विचारात घ्यायचे पुढील मुद्दे लक्षात येतात.**

- सरळसोट एका शब्दा / वाक्याचा पर्याय असलेल्या प्रश्नांचे प्रमाण नगण्य आहे.
- बहुविधानी प्रश्नांमध्येही योग्य-अयोग्य पर्याय शोधणे अशा ठरावीक स्वरूपाबरोबरच कथन - कारण शोधणे, निष्कर्ष शोधणे असेही प्रश्न विचारलेले दिसून येतात. यामध्ये जोड्या लावणे प्रकारच्या प्रश्नांवर आयोग बहुतांश वेळ भर देताना आढळतो.
- भूगोलाच्या शाखा, सिद्धांत व ते मांडणारे शास्त्रज्ञ, महत्त्वाची प्रसिद्ध पुस्तके व त्यांचे लेखक या बाबींवर किमान एक प्रश्न विचारण्यात आला आहे. नकाशावर किंवा आकृत्यांवर आधारित किमान एका प्रश्नाचा समावेश करण्यात आला आहे. लोकसंख्या भूगोलावरही किमान एक प्रश्न विचारलेला दिसतो.
- उर्वरित अभ्यासक्रमावरील घटकांवरील प्रश्नांची संख्या दरवर्षी बदलताना दिसत असली तरी मागील प्रश्न पत्रिकांच्या विश्लेषणावरून एखाद्या वर्षी कोणता घटक जास्त किंवा कमी महत्त्वाचा असेल याचा अंदाज घेणे कठीण नाही.
- तरीही भूरूपे, जागतिक हवामान, महाराष्ट्रातील व देशातील महत्त्वाची शहरे, भारताचा व महाराष्ट्राचा प्राकृतिक भूगोल हे भाग नेहमीच IMP यादीत असले पाहिजेत.
- बहुविधानी प्रश्न सोडविण्यास नकाशा समोर ठेवून केलेल्या अभ्यासातून मदत होते. तसेच वारंवार आकृत्या / चित्र पाहत उजळणी केल्यास भूरूपे या घटाकावरील कोणत्याही प्रकारचे प्रश्न आत्मविश्वासाने सोडविता येतात.
- बहुविधानी प्रश्नांचे स्वरूप पाहता मूलभूत संकल्पना व्यवस्थित समजल्या असतील तर ते आत्मविश्वासाने सोडविता येतात हे लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे भूगोलाचा अभ्यास हा आधी मूलभूत संकल्पना समजून घेणे व त्यानंतर नकाशावर आधारित अभ्यास व शेवटी तथ्यात्मक अभ्यास अशा क्रमाने करणे फायदेशीर ठरते.

---

नोकरीची संधी

सुहास पाटील

suhassitaram@yahoo.com

**फिल्म मेकिंग आणि टेलिव्हिजनमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना तंत्रशुद्ध शिक्षणाची सुवर्णसंधी.**




फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII), पुणे (मिनिस्ट्री ऑफ इन्फॉर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग अंतर्गत एक शैक्षणिक संस्था) मध्ये पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो.

**(ए) फिल्म विंगमधील अभ्यासक्रम –** (I) ३ वर्षे कालावधीचे पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम
(१) दिग्दर्शन आणि पटकथा लेखन
(२) सिनेमेटोग्राफी
(३) एडिटिंग
(४) साऊंड रेकॉर्डिंग अँड साऊंड डिझाईन
(५) कलादिग्दर्शन आणि प्रोडक्शन डिझाईन

**पात्रता –** अ.क्र. १ ते ५ वरील अभ्यासक्रमांकरिता कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.

**प्रवेश क्षमता –** प्रत्येक अभ्यासक्रमासाठी १० जागा.

**निवड पद्धती –** जॉइंट एन्ट्रन्स टेस्ट (JET) ३ तास कालावधी १०० गुणांसाठी लेखी परीक्षा देशभरातील विविध केंद्रांवर घेण्यात येईल. JET मधील यशस्वी उमेदवारांना ओरिएंटेशन आणि मुलाखतीकरिता बोलाविले जाईल. लेखी परीक्षा (JET) करिता २०%वेटेज; ओरिएंटेशन ५०%वेटेज (२०%प्रॅक्टिकल + ३०%लेखी); मुलाखत ३०%वेटेज देऊन अंतिम गुणवत्ता यादी (वैद्यकीय चाचणीनंतर) बनविली जाईल.

(II) २ वर्षं कालावधीचे पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (pg diploma courses)
(६) स्क्रीन ॲक्टिंग
(७) स्क्रीन रायटिंग (फिल्म अँड टेलिव्हिजन अँड वेब सीरिज)

**पात्रता –** कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.

**प्रवेश क्षमता –** १० (साऊंड रेकॉर्डिंग अँड साऊंड डिझाईन); १२ (आर्ट डिरेक्शन अँड प्रोडक्शन डिझाईन).

**निवड पद्धती –** जॉइंट एन्ट्रन्स टेस्ट (JET) ३ तास कालावधी, १०० गुणांसाठी. लेखी परीक्षा देशभरातील पुणे, मुंबई व इतर २५ विविध केंद्रांवर घेतली जाईल. लेखी परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांना ऑडिशनसाठी बोलाविले जाईल. लेखी परीक्षा आणि ऑडिशनमधील गुणांना ५०%वेटेज देऊन रिझल्ट १ मधून शॉर्ट लिस्ट झालेल्या उमेदवारांना ओरिएंटेशन आणि मुलाखतीकरिता बोलाविले जाईल. ओरिएंटेशन आणि मुलाखतीमधील कामगिरीवर आधारित रिझल्ट-२ बनविला जाईल. अंतिम निवड रिझल्ट-१ व रिझल्ट-२ मधील कामगिरीला प्रत्येकी ५०%वेटेज देऊन (वैद्यकीय



चाचणीनंतर) केली जाईल.

**अभ्यासक्रम शुल्क –** सेमिस्टर-१ रु. ७८,६४९/- (रु. ३८,९०६/- ट्युशन फी + रु. ३९,७४३/- हॉस्टेल रेंट इ.) सेमिस्टर-२ रु. ५१,१८५/- (रु. ३८,९०६/- ट्युशन फी + रु. १२,२७९/- हॉस्टेल रेंट इ.)

**(बी) टेलिव्हिजन विंगमधील १ वर्ष कालावधीचे पोस्ट ग्रॅज्युएट सर्टिफिकेट कोर्सेस –**
(१) डिरेक्शन
(२) इलेक्ट्रॉनिक्स सिनेमॅटोग्राफी
(३) व्हिडिओ एडिटिंग
(४) साऊंड रेकॉर्डिंग अँड टेलिव्हिजन इंजिनीअरिंग


**पात्रता –** कोणत्याही शाखेतील पदवी.

**प्रवेश क्षमता –** प्रत्येक कोर्ससाठी १० + २ (परदेशी उमेदवारांसाठी).

**निवड पद्धती –** जॉइंट एन्ट्रन्स टेस्ट (JET) कालावधी ३ तास, १०० गुणांसाठी लेखी परीक्षा. लेखी परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांना ओरिएंटेशन व मुलाखतीकरिता बोलाविले जाईल. अंतिम निवड ओरिएंटेशन आणि मुलाखतीमधील गुणवत्तेनुसार केली जाईल.

**संपूर्ण अभ्यासक्रम शुल्क –** रु. १,२९,८३४/- (रु. ७७,८१३/- ट्युशन फी + रु. ५२,०२१/- हॉस्टेल रेंट डिपॉझिट इ.)

सर्व अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन अर्ज https://ftii.ac.in या संकेतस्थळावर दि. २ डिसेंबर २०२१ पर्यंत करावेत.




---

करिअर मंत्र

डॉ. श्रीराम गीत

**मी मानसशास्त्राच्या पदवीची विद्यार्थिनी आहे. ऑनलाइन माध्यमात या विषयी वाचन करताना मला लक्षात आलं की, मानसशास्त्र आणि एमबीए मानवसंसाधनाची (एचआर)जोडी छान जमेल कारण माणसाच्या वर्तनाविषयी साधारण माहिती मिळालेली असते. परंतु मला अजून सुद्धा शंका आहे की एमबीए करावे की करू नये. मी मानसशास्त्रातच पदव्युत्तर पदवी करण्याच्या विचारात आहे. काय सल्ला द्याल?**

**मयूरा मोरे**

पदवीनंतर एमबीएला चांगल्या संस्थेत प्रवेश मिळवणे अजिबात सोपे नाही. त्यासाठी तुला अनेक अभियंत्यांसमवेत स्पर्धा करून प्रवेश मिळवावा लागेल. त्या प्रवेश परीक्षेसाठी गणिताची व तर्क विचारांची जोड गरजेची असते. एमबीए कोणत्या संस्थेतून पूर्ण केले याला महत्त्व असते. केवळ एमबीए पूर्ण केले म्हणजेच चांगली नोकरी लागते हे कृपया मनातून काढून टाक. तुझी पदवी मराठीतून आहे का इंग्रजीतून याचा उल्लेख नाही. तसेच दहावीपासूनच्या तुझ्या मार्कांचाही उल्लेख नाही. दहावीनंतरचे सर्व शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले असेल आणि कायम ७०टक्के टिकवले असशील तरच एमबीएचा विचार कर. अन्यथा एम.ए.करत असताना इंग्रजीवर प्रभुत्व मिळवण्यावर भर दे. नंतर एमबीए चा विचार करावास. मानसशास्त्रातील पदव्युत्तर पदवी मिळवल्यानंतर थेट नोकरीची शक्यताही धूसर राहते, हे लक्षात घे. तुझ्या शाखेतील माजी विद्यार्थी आता कोणत्या क्षेत्रात, कसे काम करत आहेत, याची माहिती करून घेऊन मग तुझा निर्णय घ्यावास.



**चार वर्षांपूर्वी (२०१७) मी बीएस्सी केमिस्ट्री केले. गेली तीन वर्षे एका खासगी कंपनीतील गुणवत्ता नियंत्रण विभागात काम करत आहे. चार वर्षांच्या अंतरानंतर आता मला माझे शिक्षण पूर्ण करायचे आहे. मी एमएस्सी करावे की एखादा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम करावा, या पेचात अडकलो आहे. नोकरी करता करता शिक्षण घेण्यासाठी कोणते चांगले महाविद्यालय असेल? कीर्तीकुमार सपट**



प्रथम नोकरी चांगली चालली असल्याबद्दल अभिनंदन. निव्वळ बीएस्सी असताना चांगल्या स्वरूपाची नोकरी मिळणे हाच सध्या एक महत्त्वाचा घटक आहे. अधिक शिक्षणासाठी नोकरी चालू ठेवून एमएस्सी पूर्ण करणे हे मला जवळपास अशक्य वाटते. नोकरीतील कामास त्याचा उपयोग फारसा होणार नाही हे मुद्दाम नमूद करत आहे. कामासाठीचे वेगळे प्रशिक्षण कंपनीने तुम्हाला दिलेले आहे. सेल्स, मार्केटिंग या संदर्भातील पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा दुरस्थ पद्धतीत करणे तुम्हाला नक्की शक्य होऊ शकेल. त्याचा सध्याच्या नोकरीत कितपत उपयोग होईल हे मला आत्ता सांगणे कठीण आहे. खरे तर कंपनीतील वरिष्ठांशी बोलून त्यांच्या सल्ल्यानेसुद्धा तुम्ही हा निर्णय घेऊ शकता. कोणताही नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी तुमच्या हाती अजून सहा महिने आहेत. २०२२ मध्ये जूनपासून त्याचा विचार जरूर करावा.

करिअर मंत्र या सदरासाठी आपले प्रश्न पाठवा career.mantra@expressindia.com या ई – मेल आयडीवर. प्रश्न पाठवताना आपली शैक्षणिक पात्रता, परीक्षेतील गुण याविषयी माहिती जरूर पाठवावी. जेणेकरून अधिक नेमके उत्तर देण्यास त्याची मदत होईल.

---

## शब्दकोडे - ५८८

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | ६ | ७ | | ■ |
| ८ | | | ९ | ■ | १० | | | ■ | ११ |
| १२ | | ■ | १३ | | ■ | १४ | | १५ | |
| | ■ | १६ | | ■ | १७ | | ■ | | ■ |
| ■ | १८ | | | १९ | | ■ | २० | | २१ |
| २२ | | | ■ | २३ | | २४ | | ■ | |
| २५ | | ■ | २६ | | ■ | २७ | | | ■ |
| २८ | | २९ | | ■ | ३० | | | ■ | ३१ |
| | ■ | ३२ | | ३३ | ■ | | ■ | ३४ | |
| ३५ | | | ■ | ३६ | | ■ | ३७ | | |

**आडवी विधाने :**
(१) इशारा, सूचना
(४) ज्याला कुणी शत्रू नाही असा
(८) कान असलेली लाकडी परात
(१०) चढण अथवा उतरण
(१२) वक्रता; एक लाकडी आसन
(१३) मकरंद (१४) मणिबंध, पंज्याचा सांधा
(१६) गुंतागुंत झालेले केस
(१७) अग्नी, अंगार
(१८) एकेक बाब निराळी घेऊन
(२०) उपस्थित
(२२) आयुर्वेदावर ग्रंथ रचणारा एक ऋषी
(२३) परमुलखात जूट करून राहिलेल्या लोकांची वस्ती
(२५) अभिप्राय
(२६) वडा-पिंपळाभोवतालचा कट्टा
(२७) बासुंदी, आटीव दुधापासून बनवलेला खाद्यापदार्थ
(२८) ज्या नाण्यावर शिक्का आहे असे नाणे
(३०) अधू, अपंग (३२) अभिनय, नट्टापट्टा
(३४) तजवीज, उपाय, व्यवस्था
(३५) चांदी, रुपे (३६) हत्ती
(३७) धबधबा

**उभी विधाने :**
(१) खिडकीवरील, तक्ता
(२) कीड, कृमी (३) हिमतुषार
(५) स्थूल, धिप्पाड
(६) अस्वस्थता, तळमळ
(७) आश्रयास आलेला वा आश्रय मागणारा
(९) एक प्रकारची घोडागाडी
(११) बारा इंचाचे माप
(१५) आवश्यकता, जरुरी
(१६) अंड्यातील पिवळा पदार्थ
(१७) दर्पण, ऐना (१८) तळहात
(१९) उपयोग, वहिवाट
(२०) अगतिक, निरुपाय
(२१) लक्ष्मी, कमला, शोभा
(२२) चमकणारा, चकाकणारा
(२४) आक्षेप, मज्जाव, प्रतिबंध
(२६) योग्य माहिती, परीक्षा
(२९) औदार्य, उदारता
(३१) राजाची प्रजा, जनता
(३३) चीड, त्वेष, संताप
(३४) सुलभ, सुकर; पडवी; सहज समजण्यासारखा

– सरोज ताठरे

## सुडोकू - ५८८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | ९ | | | | | | २ |
| | ६ | | ३ | | ४ | | | |
| | | | | ९ | | | ३ | |
| | | ५ | | १ | | ६ | | ९ |
| | २ | | ५ | | ७ | | १ | |
| १ | | ६ | | ४ | | ३ | | |
| | ८ | | | ३ | | | | |
| | | | ६ | | २ | | ४ | |
| ४ | | | | | | २ | | ३ |

## सुडोकू - ५८७चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ७ | ४ | ५ | १ | ३ | ८ | २ | ९ |
| ८ | २ | ५ | ७ | ६ | ९ | ३ | ४ | १ |
| १ | ३ | ९ | २ | ८ | ४ | ५ | ६ | ७ |
| ५ | ४ | २ | ३ | ७ | ६ | ९ | १ | ८ |
| ३ | १ | ८ | ४ | ९ | ५ | ६ | ७ | २ |
| ९ | ६ | ७ | ८ | २ | १ | ४ | ५ | ३ |
| २ | ८ | ६ | ९ | ५ | ७ | १ | ३ | ४ |
| ४ | ९ | १ | ६ | ३ | २ | ७ | ८ | ५ |
| ७ | ५ | ३ | १ | ४ | ८ | २ | ९ | ६ |

## शब्दकोडे क्र. ५८७चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ब | हु | रु | पी | ■ | दे | दी | प्य | मा | न |
| ना | ■ | प | डा | व | ■ | क्षा | ■ | स | य |
| त | र | वा | ■ | सा | ग | ■ | क | ■ | न |
| ■ | का | न | स | ■ | ड | ग | म | ग | ■ |
| दै | ना | ■ | र | स | द | ■ | त | ■ | उं |
| नि | ■ | क | ब | र | ■ | सा | र | व | ट |
| क | डा | ■ | रा | स | भ | ■ | ता | स | ■ |
| ■ | ग | व | ई | ■ | का | त | ■ | न | स |
| बा | ■ | र्त | ■ | र | स | वं | ती | ■ | मे |
| ग | ग | न | चुं | बी | ■ | ग | र | ग | ट |

## तमिळनाडूला भूकंपाचा धक्का

**वेल्लोर:** तमिळनाडूच्या उत्तरेकडील वेल्लोर शहरानजीक सोमवारी पहाटे भूकंपाचा धक्का बसला. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ३.६ इतकी नोंदली गेली.

वेल्लोरपासून ५९ किलोमीटरवर आणि चेन्नईच्या पश्चिमेला १८४ किलोमीटरवर पहाटे ४ वाजून १७ मिनिटांनी आलेल्या या भूकंपाची खोली २५ किलोमीटर होती, असे राष्ट्रीय भूकंपविज्ञान केंद्राने सांगितले.

या भूकंपामुळे गुडियाट्टम तालुक्यातील तट्टाप्पराई खेड्यातील एका घराचे नुकसान झाल्याचे वेल्लोरच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## त्रिपुरातील हिंसाचाराच्या तपासाची मागणी

**नवी दिल्ली:** त्रिपुरात नुकताच झालेला जातीय संघर्ष तसेच या प्रकरणी राज्य पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचा आरोप करत, या घटनांची स्वतंत्रपणे चौकशी व्हावी अशी मागणी एका वकिलाने सर्वोच्च न्यायालयात केली आहे. या मुद्यावरील याचिकेवर सुनावणी करण्याची तयारी सर्वोच्च न्यायालयाने दर्शवली आहे.

न्या. धनंजय चंद्रचूड व ए.एस. बोपण्णा यांच्या खंडपीठाने केंद्र व राज्य सरकारला नोटीस जारी केली असून, दोन आठवड्यात यावर आपले म्हणणे मांडावे असे निर्देश दिले. एतेशाम हशमी यांच्यातर्फे युक्तिवाद करताना प्रशांत भूषण यांनी त्रिपुरात झालेल्या जातीय जातीय दंग्यांच्या प्रकरणाची स्वतंत्रपणे चौकशी करण्याची मागणी केली. पोलिसांनी या प्रकरणी निष्क्रियता दाखवल्याचा आरोप त्यांनी केला.

## राज्यात ५३६ नवे रुग्ण

**मुंबई :** राज्यात दिवसभरात ५३६ नवीन रुग्णांचे निदान झाले असून २१ जणांचा मृत्यू झाला. रविवारी चाचण्यांची संख्या कमी असल्याने रुग्णसंख्याही घटते. गेल्या २४ तासात मुंबई ११०, नगर जिल्हा ६४, पुणे जिल्हा १०३, ठाणे जिल्हा ११२ नवीन रुग्ण आढळले. राज्यात ७,८५४ रुग्ण उपचाराधीन आहेत. यापैकी मुंबईत २०४३, पुणे जिल्हा १९८५ तर ठाणे जिल्ह्यात १०८२ रग्णांचा समावेश आहे.

# केंद्र सरकारची चर्चेतून पळवाट!

## विरोधकांची टीका; मोदींच्या घोषणेनंतर चर्चेची गरज नसल्याचा कृषिमंत्र्यांचा दावा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** वादग्रस्त तिन्ही कृषी कायदे कोणत्याही चर्चेविना अवघ्या चार मिनिटांमध्ये रद्द करण्यात आल्याने संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांनी केंद्र सरकारच्या 'पलायनवादी' भूमिकेवर चौफेर टीका केली.

''संसदेमध्ये यापूर्वी काँग्रेसने किमान पाच वादग्रस्त कायदे रद्द करताना सविस्तर चर्चा केली होती; मग कृषी कायदे मागे घेताना मोदी सरकारने चर्चेची तयारी का दाखवली नाही'', असा सवाल राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी संसदेबाहेर पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाला उद्देशून केलेल्या घोषणेनुसार कायदे मागे घेतले जात असून, चर्चेची गरज नसल्याचा दावा केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र तोमर यांनी राज्यसभेत केला.

केंद्र सरकार कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास तयार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे कामकाज सुरू होण्याआधी सोमवारी सकाळी संसदेच्या आवारात सांगितले होते. लोकसभेमध्ये सोमवारी दुपारी १२.०६ मिनिटांनी कृषी कायद्यांच्या परतीचे विधेयक मांडले गेले आणि १२.१० मिनिटांनी आवाजी मतदानाने संमत झाले. संसदेचे कामकाज सुरू झाले तेव्हा पंतप्रधान मोदी लोकसभेत उपस्थित होते. मात्र, हे विधेयक मांडले गेले तेव्हा मोदी सभागृहात नव्हते. ''चर्चा न करता घाई-गडबडीत विधेयक मंजूर करून घेतले, त्यावरून केंद्र सरकार किती घाबरले आहे, हे उघड झाले'', अशी टीका काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी संसदेबाहेर केली.

**माइक बंद...**

संसदेच्या सभागृहांमध्ये कोणते कायदे रद्द करण्यापूर्वी सविस्तर चर्चा केली गेली, याची यादी खर्गे यांनी राज्यसभेत आणली होती. लखीमपूरमधील हत्याकांड, ७०० शेतकऱ्यांचा मृत्यू या मुद्द्यांवरही चर्चा झाली पाहिजे, असे खर्गे सांगत असताना त्यांच्यासमोरील माइक बंद केला गेला व उपसभापती हरिवंश यांनी आवाजी मतदानाने कृषी कायदे रद्द करणारे विधेयक मंजूर करून टाकले आणि तातडीने ३० मिनिटांसाठी सभागृह तहकूब केले.

लोकसभेमध्ये काँग्रेस, तृणमूल काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी चर्चा केल्यानंतर विधेयक मागे घेतले जावे, अशी मागणी केली होती. मात्र, लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र तोमर यांना विधेयक मांडण्याची विनंती केली व विरोधकांची मागणी अव्हेरून लोकसभेत विधेयक संमत करण्यात आले.

### नामुष्कीतून सुचलेले शहाणपण

राज्यसभेतही विरोधीपक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे यांना बोलण्याची संधी नाकारली गेली. पण नंतर संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी, सभागृहनेते पीयूष गोयल यांनी खर्गेंची बोलण्याची विनंती मान्य केली. हे काळे कायदे मागे घेण्यास केंद्राला एक वर्ष तीन महिने लागले, तरीही त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले पाहिजे. विविध राज्यांमध्ये झालेल्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीत भाजपला पराभवाच्या नामुष्कीला सामोरे जावे लागले होते, त्यातून कायदे मागे घेण्याचे शहाणपण सुचले आहे. कृषी कायदे रद्द करण्याच्या विधेयकाला विरोध नाही, त्यामुळे या मुद्द्यावर चर्चा करावी आणि मग हे विधेयक संमत करावे, असे खर्गे म्हणाले.

### आश्वासन पूर्ण -तोमर

पंतप्रधान मोदी यांनी गुरू नानक जयंतीदिनी, १९ नोव्हेंबर रोजी कृषी कायदे रद्द करण्याची घोषणा केली होती. वास्तविक काँग्रेसनेही शेती क्षेत्रातील सुधारणांचा समावेश जाहीरनाम्यात केला होता, आता मात्र सुधारणांना विरोध करत आहे. आम्ही शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात कमी पडलो, असे मोदी म्हणाले होते. त्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार कृषी कायदे मागे घेतले जात आहेत. विरोधकांच्या मागणीप्रमाणे कायदे रद्द होत असून त्यासाठी हे विधेयक मांडले जात आहे. त्यामुळे या विधेयकावर चर्चा करण्याची गरज नाही, असे तोमर राज्यसभेत म्हणाले.

### चर्चेनंतर वादग्रस्त विधेयके मागे

- १९७१ मध्ये तयार केलेला वादग्रस्त अंतर्गत सुरक्षा कायदा (मिसा कायदा) १९७८ मध्ये मागे घेतला गेला. त्यावेळी ४ तास २४ मिनिटे चर्चा करण्यात आली होती.
- १९८७ मध्ये झालेला दहशतवादविरोधी 'टाडा' कायदा २४ मे १९९५ रोजी रद्द करण्यात आला.
- 'टाडा'नंतर आलेला 'पोटा' हा दहशतवादीविरोधी कायदा २१ डिसेंबर २००४ ला रद्द झाला.
- बेकायदा कृत्ये प्रतिबंधक सुधारणा कायद्यावर (दहशतवादीविरोधी कायदा २००४) लोकसभेत ५ तास २० मिनिटे चर्चा झाली होती.
- सोने नियंत्रण कायदा-१९६८ लोकसभेत ५२ मिनिटांच्या चर्चेनंतर १९९० मध्ये मागे घेतला गेला.

## तीन वादग्रस्त कृषी कायदे रद्द करणारे विधेयक मंजूर

**पीटीआय, नवी दिल्ली**

गेल्या वर्षभरापासून शेतकरी ज्यांच्या विरोधात आंदोलन करत आहेत, ते तीन वादग्रस्त कृषी कायदे रद्द करणारे विधेयक संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, सोमवारी दोन्ही सभागृहांत चर्चेशिवाय व आवाजी मतदानाने संमत करण्यात आले.

शेती कायदे रद्द करणारे विधेयक २०२१ केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी लोकसभेत मांडले. संसदेने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये पारित केलेले ३ कायदे रद्द करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले. कृषी क्षेत्रात, विशेषतः शेतमालाच्या विपणनात सुधारणा आणण्याच्या हेतूने हे कायदे करण्यात आले होते.

या विधेयकावर चर्चा करण्यात यावी, अशी मागणी करून विरोधक सभागृहाच्या हौदात उतरले व त्यांनी घोषणा देत फलक झळकावले.

निदर्शक खासदार आपापल्या जागेवर परत गेले आणि सभागृहात शांतता प्रस्थापित झाली, तर आपण विधेयकावर चर्चेची परवानगी देण्यास तयार आहोत, असे लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले. 'सभागृह सुरळीत होईल तेव्हा मी चर्चेची परवानगी देईल, मात्र तुम्ही हौद्यात आलात, तर चर्चा कशी होऊ शकेल?', असे विचारून त्यांनी सदस्यांना जागेवर परतण्याचे आवाहन केले.

खासदार फलक हातात घेऊन हौद्यात उभे असताना चर्चा शक्य नाही, असे अध्यक्षांनी सांगितले. मात्र विरोधी पक्षांनी त्यांच्या आवाहनाकडे लक्ष दिले नाही व घोषणाबाजी सुरूच ठेवली. विधेयक चर्चा होऊन पारित करायचे असल्यामुळे त्यावर चर्चा का होऊ नये, असा प्रश्न सभागृहातील काँग्रेसचे नेते अधीररंजन चौधरी यांनी विचारला. सरकार सभागृहाला गृहीत धरत असल्याचा आरोप त्यांनी केला.

हा गोंधळ सुरू असतानाच अध्यक्षांनी आवाजी मतदान घेतले आणि विधेयक पारित झाल्याचे जाहीर केले. यानंतर त्यांनी सभागृह दुपारी २ वाजेपर्यंत स्थगित केले.

तीन कृषी कायदे रद्द करण्यात येतील, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १९ नोव्हेंबरला केली होती.

विधेयक पारित होत असताना तेलंगण राष्ट्र समिती (टीआरएस), द्रमुक आणि तृणमूल काँग्रेसचे सदस्य हौद्यात उभे होते. समान खरेदी धोरण व राष्ट्रीय अन्नधान्य खरेदी धोरणाची मागणी करत टीआरएसच्या खासदारांनी हातात फलक धरले होते,



तर द्रमुक व तृणमूलचे सदस्य या विधेयकावर चर्चेची मागणी करत होते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, बसप व आययूएमएल या पक्षांचे खासदार आपापल्या जागेवर उभे राहून विरोध प्रदर्शित करत होते.

**राज्यसभेचीही मंजुरी**

राज्यसभेतही कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी हे विधेयक मांडले.

विधेयक मांडण्याचा प्रस्ताव स्वीकारला जाण्यापूर्वी, उपसभापती हरिवंश यांनी विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांना दोन मिनिटे बोलण्याची परवानगी दिली. नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकांच्या निकालांचा आढावा घेतल्यानंतर, पाच राज्यांतील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरकारने हे कृषी कायदे परत घेतले असल्याचे खर्गे म्हणाले.

खर्गे यांनी निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेळ घेतल्यामुळे उपसभापतींनी तोमर यांना प्रस्ताव मांडण्यास सांगितले. हे कायदे शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी आणण्यात आले होते, असे तोमर यांनी प्रस्ताव मांडताना सांगितले आणि सरकार आंदोलक शेतकऱ्यांना हे फायदे समजावून देऊ शकले नाही, याबद्दल खेद व्यक्त केला.

## 'ओमायक्रॉन'च्या स्वरूपाबाबत अद्याप स्पष्टता नाही

**पीटीआय, संयुक्त राष्ट्रे**

**नव्याने शोध** लागलेला 'ओमायक्रॉन' हा उत्परिवर्तित विषाणू अधिक संक्रमित होणारा आहे किंवा जगभरात पसरलेल्या 'डेल्टा'सह इतर उपप्रकारांच्या तुलनेत त्याच्यामुळे होणाऱ्या रोगाची तीव्रता अधिक आहे काय हे अद्याप स्पष्ट झालेले नसल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे.

'ओमायक्रॉन'शी संबंधित लक्षणे इतर उत्परिवर्तित प्रकारांच्या लक्षणांपेक्षा वेगळी आहेत काय, हे सुचवणारी कुठलीही माहिती सध्या उपलब्ध नाही, असे या संघटनेने सांगितले. सुरुवातीला नोंदवण्यात आलेल्या संसर्गाची माहिती विद्यापीठांतील अभ्यासावर आधारित होती- ज्यात रोगाची सौम्य लक्षणे असणाऱ्या तरुणांचा समावेश होता- मात्र ओमायक्रॉन उपप्रकाराच्या तीव्रतेची पातळी समजून घेण्यासाठी काही दिवसांपासून ते अनेक आठवडे लागू शकतील, असेही संघटनेने नमूद केले.

जागतिक आरोग्य संघटनेने 'चिंताजनक उपप्रकार' म्हणून निर्देशित केलेल्या बी१.१.५२९ या विषाणूचा शोध आणि संक्रमण क्षमता याबद्दल चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, ओमायक्रॉनचे अनेक पैलू समजून घेण्यासाठी दक्षिण आफ्रिका व जगभरातील संशोधक अभ्यास करत असून, या अभ्यासांचे निष्कर्ष जसजसे उपलब्ध होतील, तसतसे ते सर्वांना त्याबाबत माहिती देतील.

## जगभरात ओमायक्रॉनचा प्रसार

### रुग्णसंख्येत वाढ; अनेक देशांकडून आफ्रिकी विमानसेवांवर बंदी

**पीटीआय, द हेग**

**दक्षिण आफ्रिकेत** सर्वप्रथम सापडलेल्या 'ओमायक्रॉन' या करोनाच्या नव्या उत्परिवर्तित विषाणूने जगभरात पाय पसरायला सुरुवात केली असून अनेक देशांमध्ये रुग्णसंख्येत वाढ होत आहे. अनेक देशांनी आंतरराष्ट्रीय विमानसेवा बंद केल्या आहेत. करोनाच्या अन्य उत्पादित विषाणूपेक्षा ओमायक्रॉन अधिक चिंताजनक असल्याबाबत संशोधकांनी मात्र अद्याप कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही.

जगभरात आतापर्यंत २६ कोटींहून अधिक जणांना करोनाची लागण झाली, तर ५० लाखांपेक्षा अधिक रुग्णांचा मृत्यू झाला. त्याचबरोबर अर्थव्यवस्थेवरही विपरित परिणाम झाला. त्यामुळे करोनाच्या या नव्या उत्परिवर्तित विषाणूमुळे अनेक देशांनी चिंता आणि भीती व्यक्त केली असून तातडीने पावले उचलायला सुरुवात केली आहे. इस्रायलने परदेशी नागरिकांना त्यांच्या देशात प्रवेश करण्यास बंदी घातली आहे, तर मोरोक्कोने दोन आठवड्यांसाठी परदेशातून येणारी सर्व विमाने रद्द केली आहेत. हाँगकाँगपासून युरोप ते उत्तर अमेरिकेपर्यंत बहुतेक देशांतील संशोधकांनी ओमायक्रॉन या उत्परिवर्तित विषाणूच्या असण्याला पुष्टी दिली आहे.

आंतरराष्ट्रीय विमानसेवा बंद करण्याचा विचार असल्याचे जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा यांनी सांगितले.

### अनेक देशांमध्ये रुग्ण

जगभरातील अनेक देशांमध्ये ओमायक्रॉनच्या रुग्णसंख्येत वाढ होत असून हॉलंडमध्ये रविवारी १३ रुग्णांना करोनाच्या नव्या उत्परिवर्तित विषाणूची लागण झाली आहे. शुक्रवारी दक्षिण आफ्रिकेतून परतलेल्या या १३ जणांची चाचणी केली असता त्यांना ओमायक्रॉनची लागणी झाल्याचे सिद्ध झाले. ॲमस्टरडॅमच्या विमानतळावर परदेशातून आलेल्यांची चाचणी केल्यानंतर ६१ जणांना करोनाची लागण झाली असून त्यांना विलगीकरणात ठेवण्यात आले आहे.

## स्मृतिभ्रंशाची गंभीरता रोखण्यासाठी ध्यानधारणा गुणकारी

### भारतीय मेंदूविकारतज्ज्ञांच्या संशोधनातील निष्कर्ष

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** स्मृतिभ्रंशाच्या आजाराचे (अल्झायमरचे) निदान लवकर झाल्यास त्याची वाढ रोखण्यासाठी ध्यानधारणा (मेडिटेशन) हा उपयुक्त पर्याय असल्याचे मेंदूविकारतज्ज्ञांच्या संशोधनातून समोर आले आहे. त्यामुळे विस्मरणासारख्या आजारांची सुरुवात असलेल्या नागरिकांना ध्यानधारणेला आपल्या दैनंदिन वेळापत्रकात स्थान द्यावे, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या सत्यम उपक्रमांतर्गत कोलकाता येथील अपोलो रुग्णालयाचे मेंदूविकार विभागाचे प्रमुख डॉ. अमिताभ घोष यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन करण्यात आले. स्मृतिभ्रंशाच्या प्राथमिक टप्प्यात किंवा विस्मरण होते आहे, अशी शंका आल्यास दररोज किमान ३० मिनिटे केलेले मेडिटेशन रुग्णांच्या मेंदूतील स्मृतिभ्रंश वाढवणारे बदल (स्ट्रक्चरल चेंजेस) संथ करण्यात यशस्वी ठरल्याचे डॉ. घोष यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले. डॉ. घोष म्हणाले, स्मृतिभ्रंशाचा आजार हा कधीही न बरा होणारा आजार आहे. त्यामुळे त्याच्या वाढीचा वेग संथ करणे एवढेच सध्या वैद्यकशास्त्राच्या हाती आहे. मेंदूशी संबंधित विकारांवर योगासने, नृत्य, कला अशा अनेक गोष्टींचा सहायक उपचार पद्धती म्हणून वापर केला जातो. त्याच प्रकारे मेडिटेशनचे परिणाम अभ्यासण्यासाठी हे संशोधन हाती घेण्यात आले. या संशोधनाला अधिकाधिक अचूक करण्यासाठी स्मृतिभ्रंशाची सुरुवात झालेले मेडिटेशन करणारे आणि न करणारे अशा दोन गटांतील रुग्णांच्या नियमित चाचण्या (एमआरआय) करून मेंदूतील बदलांचा तौलनिक अभ्यास केला. त्यातून स्मृतिभ्रंशाच्या वाढीला कारणीभूत ठरणाऱ्या ग्रे एरियाची वाढ रोखण्यात मेडिटेशनने महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसून आले आहे. या संशोधनाची दखल 'फ्रंटियर्स इन ह्युमन न्यूरोसायन्स' या वैद्यकीय नियतकालिकाकडून घेण्यात आली आहे.

> स्मृतिभ्रंशाची लक्षणे दिसल्यानंतर निदान होईपर्यंत बराच वेळ जातो. ५०-६० वर्षे या व्यक्तिगत, व्यावसायिक प्रगतीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर स्मृतिभ्रंशाची लक्षणे दिसल्याने अनेकांचे नुकसान होते. त्यामुळेच त्याची वाढ रोखण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहे. या संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या रुग्णांना विस्मरणाचे नुकतेच निदान झाले होते. त्यामुळे त्यांच्यामध्ये ध्यानधारणेचे उत्तम परिणाम दिसून आले. जीवनशैलीतील बदल हा आज सर्व आजारांचे मूळ ठरत आहे. नकारात्मक विचार, नैराश्य, ताणतणाव या गोष्टींवर नियंत्रण मिळवण्यासाठीही ध्यानधारणेचा उपयोग होतो.
>
> – डॉ. अमिताभ घोष, अपोलो रुग्णालय (कोलकाता), मेंदूविकार विभाग प्रमुख



## 'ई-पीक' पाहणी नोंदीत नागपूरची घसरण

### नागपूर विभाग माघारला; मराठवाड्याचा प्रथम क्रमांक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** पिकांची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या 'ई-पीक' पाहणी प्रकल्पावर सर्वाधिक नोंदी मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी केल्या असून विदर्भातील नागपूर विभाग हा शेवटून दुसऱ्या क्रमांकावर आहे.


मोबाईल अँपच्या माध्यमातून ही नोंदणी करावी लागते, याबाबत शेतकऱ्यांना तांत्रिक माहिती नसते तसेच इंटरनेटची सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध राहात नाही. त्यामुळे विलंब होत असल्याच्या तक्रारी आहेत.

१५ ऑगस्टपासून या प्रकल्पाला राज्यात सुरुवात झाली होती. महसूल आणि कृषी विभागाद्वारे तो राबवला जात आहे. या प्रकल्पानुसार पूर्वी तलाठ्याच्या माध्यमातून होणाऱ्या सातबारा उताऱ्यावरील पिकांच्या नोंदी आता शेतकऱ्यांनाच ऑनलाईन कराव्या लागतात. या नोंदीच्या आधारावर शेतकऱ्यांचे उत्पादन, जमिनीची प्रतवारी, अतिवृष्टी किंवा दुष्काळ यामुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज लावणे शक्य होते, असा दावा महसूल विभागाकडून केला जातो.

महसूल विभागाकडून प्राप्त माहितीनुसार राज्यभरात नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत ६४ लाख ४८ हजार ३६८ शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली त्यात मराठवाडा (औरंगाबाद विभाग) प्रथम क्रमांकावर आहे. तेथे २० लाख ७५ हजार १०८ पैकी १७ लाख २७ हजार ९१६ शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी प्रकल्पावर नोंदणी केली. नाशिक विभागात ही संख्या १३ लाख ८९ हजार ७५६ अमरावती विभागात ११.४७ लाख, पुणे विभागात ९.९४ लाख तर नागपूर विभागात ९.९३ लाख आहे. सर्वात शेवटचा क्रमांक कोकण विभागाचा असून तेथे केवळ १.४४ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी पूर्ण केली आहे.

### विभागनिहाय नोंदणी

१) औरंगाबाद- १७ लाख २७ हजार ९१६,
२) नाशिक- १३ लाख ८९ हजार ७५६
३) अमरावती-११ लाख ९७ हजार २७५
४) पुणे- ९ लाख ९४ हजार ७४७
५) नागपूर-९ लाख ९३ हजार ७०९
६) कोकण-१ लाख ४४ हजार ९६५



## रेमडेसिवीरच्या तीन लाख ६८ हजार कुप्या शिल्लक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात रेमडेसिवीरचा सुमारे तीन लाख ६८ हजार तर टोसिलीझुमॅबच्या ५८९ कुप्यांचा साठा शिल्लक आहे. तसेच प्राणवायूचा साठा करण्यासाठी १५६ टँक आणि २६८ पीएसए प्रकल्प पूर्ण झालेले आहेत.

दक्षिण आफ्रिकेसह अन्य काही देशांमध्ये ओमायक्रॉन हा करोनाचे उत्परिवर्तित रुप आढळल्यानंतर जगभरात सर्तकतेचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीर रुग्णसंख्या वाढल्यास राज्यात पुरेशी औषधे आणि प्राणवायूचा साठा शिल्लक असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे.

राज्यात रेमडेसिवीरची तीन लाख ६८ हजार इंजेक्शन शिल्लक असून दर दिवशी सुमारे १० टक्के साठा वापरला जातो. तर केंद्राने नियुक्त केलेल्या कंपन्यांमार्फत अजूनही काही साठा राज्याला पुरविला जात आहे. संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर केंद्राकडून राज्याला सुमारे पाच लाख रेमडेसिवीर इंजेक्शनचा साठा टप्प्याटप्प्याने दिला जात आहे.

राज्यात करोना उपचारात वापरल्या जाणारी मिथाईल प्रेडनीसोलन, आयव्हरमेक्टिन, हिपॅरिन या औषधांचाही पुरेसा साठा शिल्लक आहे. तर उपचारामध्ये दिल्या जाणाऱ्या फॅविपिराविरच्या सुमारे ७० लाख ८९ हजार गोळ्या शिल्लक आहेत. तसेच म्युकरमायकोसिसवरील एम्पोटेरेसिनच्या इंजेक्शनचाही पुरेसा साठा शिल्लक असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे.

राज्यभरात दहा लीटर क्षमतेचे ६७७० तर पाच लीटर क्षमतेचे १२ हजार ११२ ऑक्सिजन कॉन्संट्रेटर शिल्लक आहेत. या व्यतिरिक्त द्रवरुप वैद्यकीय प्राणवायू साठवून ठेवण्यासाठी १५६ टँक तयार झाले आहेत. यामध्ये सुमारे २ हजार ३०० मेट्रिक टन प्राणवायू साठविण्याची क्षमता आहे.

## द. आफ्रिकेतील विमान सेवेवर बंदी न घालण्याचे आवाहन

**एपी, जोहान्सबर्ग**

**करोनाच्या** ओमायक्रॉन या उत्परिवर्तित विषाणूच्या भीतीपोटी दक्षिण आफ्रिकेतील देशांतून होणाऱ्या हवाई वाहतुकीवर बंदी घालू नये, असे आवाहन जागतिक आरोग्य संघटनेने रविवारी जगभरातील देशांना केले.

प्रवासविषयक निर्बंध टाळण्यासाठी विज्ञानविषयक आणि आंतरराष्ट्रीय आरोग्यविषयक नियमावलीचे पालन करावे, असे आवाहन डब्ल्यूएचओचे आफ्रिकेसाठीचे विभागीय संचालक मात्शिदिसो मोएती यांनी सर्व देशांना केले. 'प्रवासविषयक निर्बंध करोना विषाणूचा फैलाव काहीसा कमी करण्यात भूमिका बजावू शकतात; मात्र त्यांच्यामुळे जीवन आणि उपजीविका यांवर फार मोठा बोझा पडतो', असे त्यांनी एका निवेदनात सांगितले. 'निर्बंधांची अंमलबजावणी करण्यात आली, तर ते अनावश्यकरीत्या आक्रमक किंवा अनाहुत नसावे, तर आंतरराष्ट्रीय आरोग्यविषयक नियमावलीनुसार शास्त्रीय आधारावर असावेत', अशी अपेक्षा मोएती यांनी व्यक्त केली.

आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमावलीचे पालन केल्याबद्दल आणि आपल्या राष्ट्रीय प्रयोगशाळेने ओमायक्रॉन उपप्रकार शोधून काढताच जागतिक आरोग्य संघटनेला कळवल्याबद्दल मोएती यांनी दक्षिण आफ्रिकेची प्रशंसा केली. नव्या उत्परिवर्तित विषाणूबद्दल जगाला माहिती देण्यात दक्षिण आफ्रिका व बोट्सवाना सरकारांची गती व पारदर्शकता कौतुकास्पद आहे, असे ते म्हणाले.

## शेतकऱ्यांचा कैवारी असलेल्या सारस संवर्धनासाठी तरुणांची धडपड

# गोंदिया जिल्ह्यातील सेवा संस्थेकडून ७८ गावांत जनजागृती

**लोकसत्ता, वार्ताहर**

**गोंदिया :** शेतकऱ्यांचा कैवारी म्हणून गणल्या जाणाऱ्या सारसांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊ लागल्याने त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी गोंदिया जिल्ह्यातील काही सुज्ञ तरुणांनी स्वीकारली आहे. गोंदिया, बालाघाट व भंडारा या तीन जिल्ह्यांतील 'सारस स्केप' मधील ७८ गावांत सारस बचावासाठी या तरुणांनी सेवा संस्था निर्माण केली. या संस्थेच्या माध्यमातून सदस्यांनी गावागावांतील नागरिकांना सारस संवर्धनासाठी लोकचळवळ उभी केली आहे. महाराष्ट्रात फक्त गोंदिया जिल्ह्यात सारस पक्षी पाहायला मिळतो. १७ वर्षांपूर्वी अत्यल्प असलेली सारसांची संख्या आता बऱ्यापैकी वाढली आहे. गोंदिया, भंडारा व मध्यप्रदेशच्या बालाघाट या तीन जिल्ह्यांतील सारस स्केपमधील संख्या आजघडीला ८० ते ८५ च्या दरम्यान आहे. या तीन जिल्ह्यांत सारसांचा अधिवास असल्याने या गावांमधील लोकांना सारसाचे महत्त्व पटवून देण्याबरोबर त्यांचे संवर्धन कसे करावे, हे सांगण्यासाठी सेवा संस्थेचे तरुण गावागावांत पोहोचत आहेत. मागील नऊ वर्षांपासून सेवा संस्थेच्या अविरत कार्यामुळे गावागावांत सारस संवर्धनासाठी आता नागिरकही पुढाकार घेत आहेत. सारस संवर्धनासाठी सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार, मुनेश गौतम, अभिजीत परिहार, अभय कोचर, भरत जसानी, मुकुंद धुर्वे, दुष्यंत रेभे, अंकित ठाकूर, प्रशांत लाडेकर, बबलू चुटे, राकेश डोये, दुष्यंत आकरे, अशोक पडोळे, डेलेंद्र हरिणखेडे, प्रवीण मेंढे, जलाराम बुधेवार, विशाल कटरे, कन्हैया उदापुरे, मोहन राणा, सलीम शेख, पिंटू वंजारी, रतिराम क्षीरसागर, रुचीर देशमुख, अनुराग शुक्ला असे अनेक तरुण परिश्रम घेत आहेत. शासन व प्रशासनाचे मात्र याकडे काहीसे दुर्लक्ष होत आहे. सेवा संस्थेच्या कार्याला शासनाच्या कार्याची जोड मिळाल्यास सारस संवर्धन जोमाने होईल. सारस पक्ष्यामुळे गोंदियाचे नाव जगभरात पोहोचले आहे.



> जेव्हा सारस बचाव अभियानाची सुरुवात झाली तेव्हा गावागावांत किंवा शासनस्तरावर जनजागृती होत नव्हती. सारसांचे महत्त्व त्यावेळी कळत नव्हते. आता ते कळू लागले आहे. शासनही याकडे लक्ष देत आहे. आमचे स्वयंसेवक न थकता मागील अनेक वर्षांपासून नियमित कार्य करीत आहेत. हे कार्य पुढे सुरूच राहील.
>
> – सावन बहेकार

क्रिकेटपटू शार्दूलचा साखरपुडा



भारताचा अष्टपैलू शार्दूल ठाकूरचा सोमवारी मिताली परुळकर हिच्याशी साखरपुडा संपन्न झाला. या वेळी क्रिकेटपटू रोहित शर्मा, धवल कुलकर्णी, अभिषेक नायर आदी उपस्थित होते.

**सकाळी १० वा.**
श्रीलंका वि. वेस्ट इंडिज
दुसऱ्या कसोटीचा दुसरा दिवस
थेट प्रक्षेपण : सोनी सिक्स

**सायंकाळी ७.३० वा.**
ओदिशा एफसी वि. एससी ईस्ट बंगाल
इंडियन सुपर लीग फुटबॉल
थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स २

## संक्षिप्त

### क्रिकेट : पाकिस्तानला विजयाची चाहूल

**चट्टोग्राम :** शाहीन शाह आफ्रिदीचा (५/३२) भेदक मारा, तसेच आबिद अली (नाबाद ५६) आणि अब्दुल्ला शफिक (नाबाद ५३) या सलामीवीरांच्या अप्रतिम फलंदाजीमुळे पाकिस्तानने बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीवर आपली पकड मजबूत केली. सलामीवीरांच्या नाबाद अर्धशतकांमुळे २०२ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानची चौथ्या दिवसअखेर दुसऱ्या डावात बिनबाद १०९ अशी धावसंख्या होती. अखेरच्या दिवशी विजयासाठी त्यांना ९३ धावांची गरज आहे.

### क्रिकेट : करुणारत्ने, निस्सांकाची शतकी भागी

**गॉल :** पथुम निस्सांका (१०९ चेंडूंत नाबाद ६१ धावा) आणि कर्णधार दिमुथ करुणारत्ने (९० चेंडूंत ४२) या सलामीवीरांनी रचलेल्या शतकी भागीदारीच्या बळावर श्रीलंकेने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात दमदार सुरुवात केली. अंधूक सूर्यप्रकाशामुळे ३४.४ षटकांनंतर खेळ थांबवण्यात आला, तेव्हा श्रीलंकेने १ बाद ११३ धावांपर्यंत मजल मारली होती. निस्सांका ६१, तर ओशादा फर्नांडो ६ धावांवर खेळत आहेत.

### फुटबॉल : भारतीय महिला संघ पराभूत

**मानौस (ब्राझील) :** भारतीय महिला संघाला चौरंगी आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेच्या सामन्यात चिलीकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला. आघाडीपटू मारिया उरुतियाने १४व्या मिनिटाला गोल करत चिलीला आघाडी मिळवून दिली. यानंतर भारताने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना गोलच्या फारशा संधी निर्माण करता आल्या नाहीत. अखेर इसिडोरा हर्नांडेझ (८४वे मि.) आणि कारेन अराया (८५वे मि.) यांनी गोल केल्यामुळे चिलीने हा सामना ३-० असा जिंकला. भारताचा अखेरचा सामना गुरुवारी व्हेनेझुएलाविरुद्ध होणार आहे.

### ‘एआयबीए’ची नियमांत सुधारणेची तयारी

**लोझान (स्वित्झर्लंड) :** ऑलिम्पिक स्पर्धांमधील बॉक्सिंगचे स्थान टिकून रहावे यासाठी स्वतंत्र गटाच्या शिफारसीनुसार आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग महासंघाने (एआयबीए) आपल्या प्रशासन कामकाजाच्या नियमांत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील वर्षी जूनपर्यंत निवडणूक घेण्याची, सरचिटणीसाला अतिरिक्त अधिकार देण्याची आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीसोबतचे (आयओसी) संबंध सुधारण्यासाठी संपर्काधिकारी नियुक्त करण्याची त्यांनी तयारी दर्शवली आहे. ‘आयओसी’ने २०१९ साली ‘एआयबीए’वर बंदी घातली होती.

### क्रिकेट : जश, सौरभ यांची झुंजार शतके

**विजयनगर :** कर्णधार जश गनिगा (२०३ चेंडूंत ११४ धावा) आणि सौरभ सिंग (१९५ चेंडूंत १०३) या मुंबईच्या सलामीवीरांनी सोमवारी झुंजार शतके झळकावली. त्यामुळे कूच बिहार करंडक क्रिकेट स्पर्धेतील (१९ वर्षांखालील) पुदुच्चेरीविरुद्धच्या चारदिवसीय साखळी सामन्याच्या पहिल्या दिवसअखेर मुंबईने ८६ षटकांत ४ बाद २९७ धावांपर्यंत मजल मारली. जश-सौरभ यांनी पहिल्या गड्यासाठी २०४ धावांची भागीदारी रचली. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावरील मुशीर खाननेसुद्धा (५१) दमदार अर्धशतक साकारले. ई-गटातील या सामन्याच्या पहिल्या दिवसअखेर वेदप्रकाश जैस्वाल २१, आयुष झिमरे शून्यावर खेळत आहे.

# भारताचा विजय निसटला!

## रचिन-एजाझच्या झुंजीमुळे न्यूझीलंडला कसोटी अनिर्णित राखण्यात यश; श्रेयस सामनावीर

**पीटीआय, कानपूर**

**रचिन रवींद्र** (९१ चेंडूंत नाबाद १८ धावा) आणि एजाझ पटेल (२३ चेंडूंत नाबाद २ धावा) या भारतीय वंशाच्या जोडीने सोमवारी भारताच्या विजयाचा घास हिरावला. पाचव्या दिवसातील अखेरच्या नऊ षटकांत विजयासाठी आवश्यक एक बळी मिळवण्यात भारतीय गोलंदाज अपयशी ठरल्याने न्यूझीलंडने पहिला कसोटी क्रिकेट सामना अनिर्णित राखण्यात यश मिळवले.

**भारत-न्यूझीलंड कसोटी मालिका**

अंधूक सूर्यप्रकाशामुळे चर्चेचा विषय ठरलेल्या या लढतीत भारताने दिलेल्या २८४ धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडने ९ बाद १६५ धावाच केल्या. परंतु फिरकीला पोषक खेळपट्टीवर ठाण मांडण्याचे कार्य न्यूझीलंडच्या फलंदाजांनी चोखपणे केले. उभय संघांतील दुसरी कसोटी शुक्रवार, ३ डिसेंबरपासून मुंबईत खेळवण्यात येणार आहे.

रविवारच्या १ बाद ४ धावांवरून पुढे खेळताना टॉम लॅथम (५२) आणि विल्यम समरव्हिले (३६) यांनी पहिल्या सत्रात अप्रतिम फलंदाजी करत भारताला एकही बळी मिळू दिला नाही. दुसऱ्या सत्रातील पहिल्याच चेंडूवर उमेश यादवने समरव्हिलेला बाद करून ही जोडी फोडली. समरव्हिलेने दुसऱ्या गड्यासाठी लॅथमसह ७६ धावांची भर घातली.

त्यानंतर कर्णधार केन विल्यम्सनने लॅथमच्या साथीने भारतीय गोलंदाजांना हैराण केले. परंतु सलग दुसरे अर्धशतक झळकावल्यावर लॅथम रविचंद्रन अश्विनच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला, तर रवींद्र जडेजाने रॉस टेलरला (२) पायचीत पकडून न्यूझीलंडची ४ बाद १२५ अशी अवस्था केली.

अखेरच्या सत्रात सहा बळींची आवश्यकता असताना जडेजाने धोकादायक विल्यम्सन (२४), कायले जेमिसन (५), टिम साऊदी (४) या तिघांनाही पायचीत पकडले. हेन्री निकोल्सला (१) अक्षर पटेलने आणि टॉम ब्लंडेलला (२) अश्विनने तंबूची वाट दाखवली. त्यामुळे न्यूझीलंडची ९ बाद १५५ धावा अशी तारांबळ उडाली; परंतु रचिन-एजाझ या अखेरच्या जोडीने ५२ चेंडू खेळून काढल्याने भारताचा विजय निसटला.



**द्रविडकडून मैदान कर्मचाऱ्यांना बक्षीस**

भारताचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडने सोमवारी कानपूर येथील ग्रीन पार्क स्टेडियमच्या मैदानाची देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ३५ हजार रुपये भेट म्हणून दिले. पाचव्या दिवसातील अखेरच्या सत्रापर्यंत लांबलेली कसोटी आणि फलंदाजी-गोलंदाजी दोघांनाही समान सहाय्य करणारी खेळपट्टी बनवल्यामुळे द्रविडने कर्मचाऱ्यांचे कौतुक करतानाच त्यांना ही रक्कम देत एक नवा आदर्श ठेवला.

**३** रविचंद्रन अश्विनने (४१९) भारतासाठी सर्वाधिक कसोटी बळी मिळवणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत तिसरे स्थान पटकावले. अनिल कुंबळे (६१९), कपिल देव (४३४) हे या यादीत पहिल्या दोन स्थानांवर विराजमान आहेत.

**७** श्रेयस अय्यर हा पदार्पणाच्या कसोटीत सामनावीर पुरस्कार पटकावणारा सातवा भारतीय खेळाडू ठरला असून यामध्ये एकूण चार मुंबईकरांचाही समावेश आहे. यापूर्वी प्रवीण अमरे, रुद्रप्रताप सिंग, रविचंद्रन अश्विन, शिखर धवन, रोहित शर्मा, पृथ्वी शॉ या सहा जणांनी अशी कामगिरी केली होती.

### संक्षिप्त धावफलक

- भारत (पहिला डाव) : ३४५
- न्यूझीलंड (पहिला डाव) : २९६
- भारत (दुसरा डाव) : ७ बाद २३४ डाव घोषित
- न्यूझीलंड (दुसरा डाव) : ९८ षटकांत ९ बाद १६५ (टॉम लॅथम ५२, विल्यम समरव्हिले ३६; रवींद्र जडेजा ४/४०)

# कायम राखण्यात येणाऱ्या खेळाडूंचा आज फैसला

**पीटीआय, नवी दिल्ली**



**इंडियन प्रीमियर** लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या १५व्या हंगामासाठी संघात कायम राखण्यात आलेल्या खेळाडूंची नावे जाहीर करण्याची मुदत मंगळवारी संपणार आहे. त्यामुळे आठही संघ नेमके कुणाकुणाला संघात ठेवणार, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

**इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट**

प्रत्येक संघाला जास्तीत जास्त चार खेळाडू संघात कायम राखण्याची परवानगी आहे. त्यामध्ये तीन भारतीय आणि एक विदेशी अथवा दोन भारतीय आणि दोन विदेशी अशा रचनेसह संघमालक खेळाडूंना कायम राखू शकतात. चेन्नई सुपर किंग्जने महेंद्रसिंह धोनी, रवींद्र जडेजा, ऋतुराज गायकवाड या तीन खेळाडूंना आधीच कायम राखल्याचे माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली; परंतु अन्य संघांतील खेळाडू मंगळवारीच स्पष्ट होतील.

‘आयपीएल’च्या नव्या हंगामात लखनऊ आणि अहमदाबाद या दोन नवीन संघांचा समावेश करण्यात आला आहे. अन्य संघांना नकोशा झालेल्या खेळाडूंमधून या नव्या संघांना तीन खेळाडूंची निवड करण्याची १ ते २५ डिसेंबरदरम्यान संधी आहे. मग जानेवारीमध्ये खेळाडूंची लिलावप्रक्रिया होईल.

- वेळ : सायंकाळी ५ वा.
- थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स वाहिन्यांवर

**या खेळाडूंची जागा पक्की?**

- मुंबई इंडियन्स : रोहित शर्मा, जसप्रीत बुमरा, किरॉन पोलार्ड, इशान किशन.
- चेन्नई सुपर किंग्ज : महेंद्रसिंह धोनी, रवींद्र जडेजा, ऋतुराज गायकवाड, मोईन अली.
- दिल्ली कॅपिटल्स : ऋषभ पंत, अक्षर पटेल, पृथ्वी शॉ, आनरिख नॉर्किए.
- रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरु : विराट कोहली, हर्षल पटेल, यजुर्वेद्र चहल, ग्लेन मॅक्सवेल.
- सनरायजर्स हैदराबाद : केन विल्यम्सन, भुवनेश्वर कुमार, रशीद खान.
- राजस्थान रॉयल्स : संजू सॅमसन, जोस बटलर.
- कोलकाता नाइट रायडर्स : वरुण चक्रवर्ती, आंद्रे रसेल, वेंकटेश अय्यर, सुनील नरिन.
- पंजाब किंग्ज : मयांक अगरवाल, मोहम्मद शमी, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग.

# प्रेक्षकांच्या वाट्याला फक्त दोन हजार तिकिटे



(संग्रहित छायाचित्र)

**मुंबई :** भारत-न्यूझीलंड यांच्यात मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणाऱ्या दुसऱ्या कसोटीसाठी सर्वसामान्य चाहत्यांच्या वाट्याला दोन हजार तिकिटेच येणार आहेत, अशी माहिती मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) विश्वसनीय सूत्रांनी दिली.

करोना साथीच्या पार्श्वभूमीवर घालण्यात आलेल्या नियमांमुळे ३ डिसेंबरपासून होणाऱ्या या सामन्यासाठी स्टेडियमच्या एकूण प्रेक्षकक्षमतेपैकी २५ टक्के प्रेक्षकांनाच प्रवेश देण्यात येणार आहे. वानखेडेची प्रेक्षकक्षमता ३३ हजार इतकी आहे. मात्र शासनाच्या नियमांनुसार ८,५०० तिकिटेच प्रत्यक्षात उपलब्ध असतील.

‘एमसीए’शी संलग्न असलेले ३२९ क्लब्स, माजी क्रिकेटपटू यांसाठी राखीव तिकिटे ठेवण्यात आली आहेत. त्याशिवाय गरवारे क्लबसाठी दीड हजार, संघटना आणि जिमखान्याच्या पदाधिकाऱ्यांसाठी एक हजार तिकिटे देण्यात येणार आहेत. त्यामुळे दर्दी क्रिकेटप्रेमींना उरलेल्या दोन ते अडीच हजार तिकिटांची नोंदणी करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

पाच वर्षांनी प्रथमच वानखेडेवर कसोटी सामन्याचे आयोजन करण्यात येत आहे. यापूर्वी २०१६मध्ये भारत-इंग्लंड यांच्यात येथे कसोटी खेळवण्यात आली होती. त्याशिवाय जानेवारी, २०२०नंतर प्रथमच वानखेडेवर आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे पुनरागमन होणार आहे. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरुद्ध येथे अखेरचा एकदिवसीय सामना झाला होता.

# भारताचा रामनाथन अजिंक्य

**पीटीआय, मनामा (बहारीन)**

**एटीपी चॅलेंजर टेनिस स्पर्धा**



**भारताच्या रामकुमार** रामनाथनने एटीपी चॅलेंजर टेनिस स्पर्धेचे पहिलेवहिले जेतेपद पटकावले. त्याला या जेतेपदासाठी कारकीर्दीत तब्बल १२ वर्षे वाट पाहावी लागली.

सहाव्या मानांकित रामकुमारने मनामा येथे झालेल्या स्पर्धेतील (एटीपी ८० दर्जा) एकेरीच्या अंतिम सामन्यात रशियाच्या एव्हग्नी कार्लोव्स्कीला ६-१, ६-४ अशी धूळ चारली. त्याला याआधी कारकीर्दीत सहा वेळा चॅलेंजर स्पर्धांच्या उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. २७ वर्षीय रामकुमारने मनामा येथे झालेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मात्र उत्कृष्ट खेळ केला.

त्याच्या आक्रमक सर्व्हिसचे कार्लोव्स्कीला प्रत्युत्तर देता आले नाही. त्यामुळे पहिला सेट त्याने ६-१ असा मोठ्या फरकाने जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये कार्लोव्स्कीने खेळात सुधारणा केली; पण रामकुमारने त्याला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी दिली नाही. या कामगिरीमुळे रामकुमारने ८० गुणांची कमाई केली असून जागतिक एकेरी क्रमवारीत तो अव्वल २०० खेळाडूंमध्ये प्रवेश मिळवू शकतो.

# महाराष्ट्राच्या तेजस-वर्दीहीला रौप्यपदक

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या तेजस ढेरे आणि वर्दीही या जोडीने ६४व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेतील १० मीटर एअर पिस्तूल प्रकाराच्या मिश्र दुहेरीतील युवा गटात रौप्यपदक पटकावले.

**राष्ट्रीय अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धा**

सुवर्णपदकाच्या लढतीत तेजस-वर्दीहीला हरयाणाच्या शिवा आणि शिखा जोडीकडून २-१६ असा पराभव पत्करावा लागला.

दुसरीकडे, पंजाबच्या अर्जुन सिंग चीमा आणि अर्शदीपने १० मीटर एअर पिस्तूल मिश्र दुहेरीतील मुख्य गटात सुवर्णपदकावर नाव कोरले. त्यांनी सौरभ चौधरी आणि देवांशी जोडीवर १७-१५ असा विजय मिळवला.

# महाराष्ट्राचे दोन्ही संघ दिमाखात उपांत्यपूर्व फेरीत

**क्रीडा प्रतिनिधी, मुंबई**

**राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा**

**उना (हिमाचल प्रदेश)** येथे सुरू असलेल्या किशोर-किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत सोमवारी महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी गटात अग्रस्थान पटकावण्यासह दिमाखात उपांत्यपूर्व फेरी गाठली. मंगळवारी महाराष्ट्राच्या मुलांसमोर तेलंगणाचे, तर मुलींसमोर हरयाणाचे कडवे आव्हान असणार आहे.

किशोर गटातील दिवसाच्या पहिल्या सामन्यात महाराष्ट्राने पंजाबचा १८-७ असा एक डाव आणि ११ गुणांनी पराभव केला. कर्णधार सोत्या वळवीने आक्रमणात चार गडी बाद केले. त्याला आशीष गौतम (३.४० मिनिटे), अथर्व पाटील (३ मि.) यांनी संरक्षणात उत्तम साथ दिली. दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्राने छत्तीसगडला १७-७ असे एक डाव आणि १० गुणांनी नमवले.

किशोरी गटात महाराष्ट्राने केरळचा २५-५ असा एक डाव आणि २० गुणांनी धुव्वा उडवला. अंकिता देवकरने आक्रमणात आठ गडी बाद केले. दुसऱ्या लढतीत महाराष्ट्राने कर्नाटकवर ८-४ अशी एक डाव आणि चार गुणांनी सरशी साधली.

### टेनिस : इव्हानिसेव्हिच प्रेरकाच्या भूमिकेत

**मुंबई :** माजी विम्बल्डन विजेते आणि जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या नोवाक जोकोव्हिचचे प्रशिक्षक गोरान इव्हानिसेव्हिच आगामी टेनिस प्रीमियर लीग स्पर्धेच्या निमित्ताने मुंबईत येणार असून राजस्थान टायगर्स संघाचे प्रेरक म्हणून कार्यरत असणार आहेत. भारताचा आघाडीचा टेनिसपटू प्रज्ञेश गुणेश्वरन, आर्यन गोवेस आणि डायना मार्किनकेव्हिका यांसारख्या खेळाडूंचा राजस्थानच्या संघात समावेश आहे. इव्हानिसेव्हिच यांच्या मार्गदर्शनात या खेळाडूंचा खेळ अधिक बहरेल अशी राजस्थान संघाला आशा आहे. टेनिस प्रीमियर लीगच्या तिसऱ्या पर्वाला १३ डिसेंबरपासून प्रारंभ होणार आहे.

**मागणी सूचना**

**एडेलवाईज ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड**
CIN-U67100MH2007PLC174759.
**रिटेल केंद्रीय व नोंद.कार्यालय:** एडेलवाईज हाउस, सी.एस.टी.मार्गाच्या पलीकडे, कलिना, मुंबई-400098

निम्नस्वाक्षरीकार हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत एडेलवाईज ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (‘ईएआरसी’)चे प्राधिकृत अधिकारी आहेत. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(2) अंतर्गत एक मागणी सूचना जारी केली जीत त्यांना पाठविण्यात आलेल्या संबंधित मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेल्या रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते आणि ते खाली देण्यात आलेले आहे. वरील संदर्भात कर्जदारांना पुन्हा एकदा सूचित करण्यात येते की त्यांनी सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत खाली नमूद रकमेचा सदर मागणी सूचनेत दिल्यानुसार खाली नमूद दिनांकापासून भरणा व/किंवा वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या सदर कर्जदाराने तयार केलेल्या दस्तावेजांसह वाचण्यात येणाऱ्या कर्ज करारांतर्गत देय असलेल्या पुढील व्याजासह भरणा करावा. कर्जाच्या परतफेडीची हमी म्हणून सदर कर्जदाराने ईएआरसी कडे पुढील मत्ता तारण म्हणून ठेवलेल्या आहेत.

| अ. क्र. | कर्जदार/ सह-कर्जदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक | मागणी सूचनेचा दिनांक व रक्कम | ट्रस्टचा व अभिहस्तांकन-कर्त्याचा तपशील |
|---|---|---|---|
| 1. | 1. **श्री अजित गणपत गोगावले** (कर्जदार) 2. **श्रीमती शुभांगी अजित गोगावले** (सह-कर्जदार) 3. **श्री गणपत एस गोगावले** (सह-कर्जदार) 4. **श्री सुजित जी. गोगावले** (सह-कर्जदार) **कर्ज खाते क्र.:** PUNHL17000354 | 18.10.2021 आणि रु. 73,04,036.91 पै | ईएआरसी ट्रस्ट एससी 396 आणि एलअँडटी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड |
| | **अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता):** प्लॉट क्र. 13, क्षेत्रफळ सुमारे 00 हे.08.6 आर आणि दोन आरसीसी फ्रेम असलेली बांधकामे/ संरचना, तळ मजल्याचे क्षेत्रफळ सुमारे 115.24 चौ.मी., पहिल्या मजल्याचे क्षेत्रफळ सुमारे 84.59 चौ.मी. आणि बाल्कनीचे क्षेत्रफळ सुमारे 5.47 चौ.मी., पुणे महानगर पालिका मालमत्ता क्र. पी आयएफ / 08 / 00039000 आणि तेथील जिल्हाधिकारी, पुणे यांनी मजूर केलेल्या ले-आउटमधील नेताजी सुभाष सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, स.क्र. 215/1, 215/2, 218, 219, 277/1 व 277/2, हडपसर, ता. हवेली, जि. पुणे, पुणे महानगर पालिकेच्या हद्दीत आणि उप-निबंधका, हवेली च्या अधिकार-क्षेत्रात, **चतुःसीमा:** पूर्वेस- शेतकरी संघाची मालमत्ता आणि कॅनल, दक्षिणेस- शेतकी संघाची आणि घुले यांची मालमत्ता, पश्चिमेस- अंतर्गत रस्ता आणि उत्तरेस- शतकी संघाची मालमत्ता आणि रस्ता. | | |
| 2. | 1. **श्री अमर मोहन शिंदे** (कर्जदार) 2. **श्रीमती वनिता मोहन शिंदे** (सह-कर्जदार) **कर्ज खाते क्र.** PUNHL150000050 | 18.10.2021 आणि रु. 21,17,701.71 पै | ईएआरसी ट्रस्ट एससी 396 आणि एलअँडटी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड |
| | **अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता):** सदनिका क्र. 401, क्षेत्रफळ सुमारे 757 चौ.फू. बिल्ट-अप, चौथा मजला, बिल्डींग क्र. ए, सुंदर संकुल, गट क्र. 3960, घ.क्र. 1, तळेगाव ढमढेरे, ग्रीन सिटीजवळ, पुणे. उत्तरेस - मोकळे, पूर्वेस- जिना, दक्षिणेस- मोकळे, पश्चिमेस- मोकळे. | | |

सदर कर्जदारांनी वर नमूद केल्याप्रमाणे ईएआरसी कडे भरणा न केल्यास ईएआरसी द्वारे संपूर्णपणे कर्जदारांच्या खर्चावर व त्यांना भोगाव्या लागणारया परिणामांवर सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) आणि लागू नियमांतर्गत वर नमूद अनामत मत्तांविरुद्ध कारवाई करण्यात येईल. सदर अधिनियमांतर्गत कर्जदारांना वर नमूद मत्तांविरुद्ध ईएआरसी च्या लेखी पूर्व-परवानगीशिवाय विक्री, भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करण्यास मज्जाव करण्यात येतो. कोणत्याही व्यक्तीने सदर नियमातील तरतुदींचे किंवा त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा तसे करण्यास चिथावल्यास ते कृत्य सदर अधिनियमातील तरतुदीनुसार तुरुंगवास किंवा/आणि दंडास पात्र ठरेल.

**दिनांक:** 29.11.2021
**स्थान:** पुणे
स्वा/- **प्राधिकृत अधिकारी**
**एडेलवाईज ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड करिता**

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
उप प्रादेशिक कार्यालय पुणे–२
**पर्यावरण विषयक जनसुनावणी सूचना**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लि. (महाराष्ट्र शासन उपक्रम, मुंबई) यांच्या पुणे शहराभोवतीच्या ‘पुणे रिंग रोड, पूर्व संरेखन YCEW वरती उर्से जवळ ०+००० पासून ते सोलू (SH-58 वरती) ३८.३४० पर्यंत’बाबतची प्रस्तावित जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. सदर जनसुनावणी ही केंद्रिय पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. ०९/०६/२०२१ रोजीच्या निवेदन पत्रानुसार खालील प्रमाणे आयोजित केलेली आहे. सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका–टिपणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

**सुनावणीचे ठिकाण : पुजा मंगल कार्यालय, जुना मुंबई–पुणे महामार्ग क्र. ०४, स.नं. ७४/२, ढोरे मळा, वडगाव मावळ, ता. मावळ, जि. पुणे.**
**सुनावणीची तारीख व वेळ : दि. ०६/०१/२०२२ (गुरुवार), दु. १२.०० वा.**

तसेच सदर कालावधीमध्ये कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन (Lockdown) असेल तर ही जनसुनावणी केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेशाचे पालन करुन Zoom Application व्दारे Online पध्दतीने घेण्यात येईल. ऑनलाईन जनसुनावणीमध्ये **https://zoom.us/j/9131710404?pwd=QkNQd3FCVzc2MUJjUDAwMFd XNHp5UT09** या लिंकव्दारे सहभाग घेता येईल.
**Meeting ID:** 913 171 0404, Passcode: PRREA@123

सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवासी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी सूचना, टिका–टिपणी तसेच आक्षेप तोंडी व लेखी स्वरुपात नोंदविता येतील.

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्यावर पाठविण्यात याव्यात–

**उप प्रादेशिक कार्यालय पुणे–२,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर,**
**२ रा मजला, पुणे–मुंबई रस्ता, वाकडेवाडी, पुणे– ४११ ००३.**
**E-mail: sropune2@mpcb.gov.in; ropune@mpcb.gov.in**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले मराठी व इंग्रजी दस्ताऐवज खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील, तसेच मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळी उपलब्ध असतील.

०१) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
०२) जिल्हा उद्योग केंद्र, पुणे.
०३) जिल्हा परिषद, पुणे.
०४) प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालय पुणे–२, मप्रनि मंडळ, जोग सेंटर, २ रा व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे–मुंबई रस्ता, पुणे-४११ ००३.
०५) मप्रनि मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन–माटुंगा स्किम रोड क्र. ७, ‘सिनेप्लॅनेट’समोर, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई–२२.
०६) झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर–४४० ००१.
०७) पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई–३२.
०८) तहसिल कार्यालय, मावळ व खेड, जि. पुणे
०९) मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद आळंदी, ता. खेड, जि.पुणे.
१०) मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद/ नगरपंचायत वडगाव मावळ, ता. मावळ, जि. पुणे.
११) ग्रामपंचायत कार्यालय, उर्से, कातवी, आंबी, वराळे, आकुर्डी, नाणोली तर्फे चाकण, इंदुरी, सुदवडी व सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे.
१२) ग्रामपंचायत कार्यालय खालुंब्रे, निघोजे, मोई, कुरुळी, चिंबळी, केळगाव, चऱ्होली खुर्द, धानोरे व सोळू, ता. खेड, जि. पुणे.

सही/–
**उप प्रादेशिक अधिकारी पुणे–२**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.**

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

**व्यवसाय**

चालू सुस्थितीतील व्यवसायामध्ये व्यवसाय वाढीसाठी भागीदार अथवा गुंतवणूकदार पाहिजेत. रोजचा निव्वळ नफा किमान दहा हजार- एक लाख रुपये. व्यवसाय स्वतः भेट देऊन खात्री करा. सर्व बाबी कायदेशीर पडताळून नोंदणीकृत करार करा - 09545152888/ 09699520711.
0070763131-1

**कॉम्प्युटर्स**

Laptop Repair specialist 100% guaranteed repair all brand Motherboard, Display, Ram, Keyboard, Touchpad, Battery Broken Hinges Fabrication Contact: 8888824744
0090294823-1

**नोकरीविषयक**

TELECOM 4G SMS SENDING JOB, घरातून काम करून आकर्षक पगार मासिक कमवा. दररोज पगार, टार्गेट नाही. संपर्क :- हिना- 9702935999
0070762063-1

**मालमत्ताविषयक**

Factory Shed on lease with 40HP power area 6000 to 20000sqft Sanaswadi Contact (m) 9823366661/ 9890084897.
0090294736-1

ऑफर फक्त 10 बुकिंगसाठी 2 लाख प्रतिकरात जमीन खरीदीवर शेतकरी दाखला मोफत मिळवा. संपर्क- 9867931341/ 8097641181.
0070762174-1

**नावात बदल**

मी, राहुल निळकंठ पाटील, राहणार रक्षकनगर फेज ३, फ्लॅट नं. १४, खराडी पुणे माझ्या पासपोर्टवरील माझ्या पत्नीचे प्रज्ञा राहुल पाटील हे नाव बदलून प्रज्ञा भगवान भांबिरे असे टाकत आहे. ॲफिडेविट नं. ३८७/२०२१ दिनांक २७/११/२०२१
0090294874-2

My old name Ranjna Vasant Gaikwad Changed to new name as Vaishali Shashikant Godase Vide Affidavit No 447/2021 Dated 27/21/2021
0090294880-3

My old name Shashi SinghChanged to new name as Shashi Pal Vide Affidavit No. 450/2021 Dated 29/11/2021
0090294880-1

My old name Sonaka Mahapatra Changed to new name as Sonaka Venugopal Vide Affidavit No.448/2021 Dated 27/11/2021
0090294880-2

I have changed my old name Surekha vishvas Lagoo to new name Surekha vishvas Lagu affidavit no4791
0090294877-2

I have change my old name Dattu Vitthal Barve to new name Dattatraya Vitthal Barve Affidavit no 4790
0090294877-1

I have changed my old name Asha Gulab Newale to new name Kavita Sanjay Datir affidavit no.477 dt. 29/11/2021
0090294875-1

I have changed my name Sunanda Narayan Pathak to Anjali Shripad Ghatpande as per aff No P-298/21 dated 29/11/21
0090294872-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

**वॉटरप्रूफिंग**

Without Breaking Toilet, Bathroom, 5Years Guarantee, Terrace 10Yrs Guarantee,All Leakage Work, Authorised Applicator Dr.Fixit9225534110 / 7666729911
0090289630-1

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
दर रविवारी लोकसत्ता’तून
जीवनसाथी

visit us at WWW.LOKSATTA.COM

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, ‘एक्स्प्रेस हाऊस’, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहमदनगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **सहायक संपादक : मुकुंद संगोराम** * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

## ‘ओमायक्रॉन’च्या सावटातही

# निर्देशांकांची कमाई

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** करोनाचा नवीन उत्परिवर्तित विषाणू ‘ओमायक्रॉन’च्या संभाव्य उद्रेकाने जगभरातील गुंतवणूकदार बिथरलेले असतानाही, सोमवारी निर्देशांकांनी वाढीसह सप्ताहाची सकारात्मक सुरुवात केली. रिलायन्स इंडस्ट्रीजसह, बँक आणि माहिती-तंत्रज्ञान समभागांना मिळालेल्या मागणीने निर्देशांकांना कमाईसह दिवसाची अखेर करता आली.

नवीन उत्परिवर्तित विषाणूचा विविध देशांमधील फैलाव पाहता, जगभरात अनेक देशांनी आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीवर निर्बंध घालण्यासह, विदेशांतून येणाऱ्या प्रवाशांच्या चाचण्यासंबंधी कठोर निर्बंध लागू केले आहेत. शुक्रवारी याचे सावट म्हणून भारतासह जगातील सर्वच भांडवली बाजारात मोठ्या पडझडीने गुंतवणूकदारांमध्ये हाहाःकार उडवून दिला होता. नवीन विषाणूची बाधा झालेल्या एकाही रुग्णाची नोंद भारतात सध्या तरी झालेली नाही.

शुक्रवारच्या भयानक घसरणीपश्चात, सोमवारी सकाळचा सत्रारंभ जगभरातील अन्य बाजारांतील कलाचे अनुकरण करीत सेन्सेक्सच्या ५०० हून अधिक अंशांच्या आपटीनेच झाला. तथापि उत्तरार्धात समभागांची खरेदी वाढल्याने ही घसरण भरून निघाली. मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने दिवसाची अखेर १५३.४३ अंशांची वाढ नोंदवत, ५७,२६०.५८ या पातळीवर केली. बरोबरीने निफ्टी निर्देशांकानेही शुक्रवारच्या बंद पातळीत २७.५० अंशांची भर घालत, १७,०५३.९५ या पातळीवर दिवसाच्या व्यवहारांना निरोप दिला.







## ‘ई-श्रम’ कार्डधारकांचा १० कोटींचा टप्पा

**पीटीआय, नवी दिल्ली**

**वेगवेगळ्या सामाजिक** सुरक्षितता योजनांचे लाभ असंघटित कामगारांपर्यंत पोहचावेत आणि श्रमिकांमधील या वंचित घटकाला ओळख व संघटित रूप मिळविता यावे यासाठी कार्यरत ई-श्रम संकेतस्थळावर कामगारांची नोंदणी लवकरच १० कोटींचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठेल अशी चिन्हे आहेत.

उपलब्ध तपशिलानुसार, सरलेल्या सप्ताहअखेर ई-श्रम संकेतस्थळावरील नोंदणी ९ कोटी ७० लाखांवर गेली असून, दररोज सरासरी १० लाख नोंदणीचे प्रमाण पाहता चालू सप्ताहात त्यात आणखी ३० लाखांहून अधिक भर पडून १० कोटींचा टप्पा गाठला जाणे अपेक्षित आहे. मागील सप्ताहात रविवारी १३.९७ लाख तर त्या आधी शनिवारी १४.९५ लाख कामगारांनी संकेतस्थळावर नोंदणी पूर्ण केली आहे.

केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाकडून ‘ई-श्रम पोर्टल’ विकसित करण्यात आले आणि २६ ऑगस्टला अनावरणानंतर, केवळ तीन महिन्यांत १० कोटींचा टप्पा उत्साहदायी असल्याचे सरकारने मत नोंदविले आहे. बांधकाम क्षेत्रातील कामगार, स्थलांतरित मजूर, फेरीवाले, घर कामगार, स्थानिक रोजंदारी कामगारांसह, भूमिहीन शेतमजूर व इतर काही असंघटित कामगारांची नोंदणी या संकेतस्थळावर सुरू आहे. केंद्रीय कामगार व रोजगारमंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते नुकतेच ई-श्रम संकेतस्थळाच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. केंद्र सरकारने देशभरातील विविध क्षेत्रांतील सुमारे ३८ कोटी असंघटित कामगारांची नोंदणी करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

नोंदणी केलेल्या ९.७ कोटींपैकी ५२.०८ टक्के महिला, ४७.९२ टक्के पुरुष आहेत. ७२.४६ टक्के हे अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय असे सामाजिकदृष्ट्या मागास घटकांतील आहेत.

लोकसत्ता आनंदी अर्थ वार्ता
Presented by
MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION
॥ उद्यमात सकल समृद्धि: ॥
MIDC

